जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, बुधवार २५ नोव्हेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

वैभव सूर्यवंशीचे २८ चेंडूत शतक

■ ५२ चेंडूत द्विशतक ■ दोन्ही वनडे वर्ल्ड रेकॉर्ड
■ ५३ चेंडूत २०४ धावा ■ सर्वाधिक २८ षटकार



दोहा/वृत्तसंस्था- १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने मंगळवारी एक स्फोटक खेळी केली. त्याने २८ चेंडूंमध्ये शतक आणि ५२ चेंडूंमध्ये द्विशतक झळकावले. हे दोन्ही ५० षटकांच्या क्रिकेटमधील विश्वविक्रम आहेत.रायझिंग स्टार्स आशिया कपमध्ये युएईविरुद्ध वैभव ५३ चेंडूमध्ये २०४ धावांवर बाद झाला. या खेळीत २८ षटकार आणि ७ चौकारांचा समावेश होता.वैभवच्या खेळीमुळे इंडिया 'अ' संघाने रायझिंग स्टार्स आशिया कपमध्ये युएईचा ७ गडी राखून पराभव केला. संघाने २५० धावांचे लक्ष्य १४.२ षटकांत ३ गडी गमावून पूर्ण केले. तत्पूर्वी, युएईने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत ५० षटकांत ९ गडी गमावून २४९ धावा केल्या. हरप्रीत सिंग भाटियाने १३० धावांची खेळी केली. त्याने १२ चौकार आणि ४ षटकार मारले.

वैभव सामनावीर ठरला-इंडिया 'अ' संघाने सामना ७ गडी राखून जिंकला. इंडिया 'अ' संघाने युएईविरुद्ध १४.२ षटकांत २५० धावांचे लक्ष्य पूर्ण केले. रिंकू सिंगने बेसिल हमीदच्या गोलंदाजीवर डीप मिडविकेटवरून षटकार मारून संघाला विजय मिळवून दिला.

वैभव सूर्यवंशी २०४ धावांवर बाद झाला- बेसिल हमीदने १३ व्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर वैभव सूर्यवंशीला बाद केले. वैभवने लाँग ऑफवरून फटका मारण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू हवेत उंच गेला. लाँग ऑफला उभ्या असलेल्या आर्यश शर्माने सोपा झेल घेतला. वैभवने ५३ चेंडूंमध्ये २०४ धावा केल्या. त्याच्या या खेळीत ७ चौकार आणि २८ षटकारांचा समावेश होता.

लिस्ट ए मध्ये सर्वात जलद १५० धावा- वैभवने ४० चेंडूंमध्ये आपल्या १५० धावा पूर्ण केल्या. चेंडूंच्या संख्येनुसार, लिस्ट ए क्रिकेटमधील या सर्वात जलद १५० धावा आहेत. ➪(पान २ वर)

पेपरफुटी करणाऱ्यांची आता खैर नाही

१० कोटींचा दंड, १० वर्षांचा कारावास व मालमत्ता जप्त

मुंबई/प्रतिनिधी- राज्यात गेल्या काही महिन्यांत स्पर्धा परीक्षा आणि नोकरभरती परीक्षांच्या पेपरफुटीच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांमधील गैरप्रकारांमुळे परीक्षा व्यवस्थेच्या पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर पेपरफुटी आणि परीक्षांमधील संघटित गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी राज्य सरकारने कठोर पावले उचलण्याच्या दिशेने हालचाली सुरू केल्या आहेत. पेपरफुटी करणाऱ्यांना आता १० कोटी रुपयांपर्यंत दंड आणि १० वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा देण्याची शिफारस करण्यात आली आहे. भरती आणि स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी राज्य सरकारने स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीचा दुसरा अहवाल २३ नोव्हेंबर २०२६ रोजी शासनाला सादर करण्यात आला. या अहवालात परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी स्वतंत्र आणि कठोर कायदा करण्यासह परीक्षा व्यवस्थेत व्यापक प्रशासकीय सुधारणा सुचवण्यात आल्या आहेत.



समितीच्या शिफारशीनुसार, पेपरफुटीच्या संघटित गुन्हेगारीत सहभागी असलेल्या व्यक्ती आणि संस्थांना सात ते दहा वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा होऊ शकते. याशिवाय किमान १० कोटी रुपयांचा दंड आणि संबंधितांची मालमत्ता जप्त करण्याची तरतूद करण्याचे सुचवण्यात आले आहे. परीक्षांमध्ये अनुचित साधनांचा वापर करणाऱ्यांना पाच ते दहा वर्षे कारावास आणि ५० लाख रुपयांपर्यंत दंड ठोठावण्याची शिफारस आहे. तसेच गैरप्रकारांमध्ये सहभागी असलेल्या सेवा पुरवठादार संस्थांना पाच कोटी रुपयांपर्यंत दंड आणि आठ वर्षांपर्यंत बंदी घालण्याची तरतूद सुचवण्यात आली आहे. परीक्षांमधील गैरप्रकारांचा तपास वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली करण्याची शिफारसही अहवालात करण्यात आली आहे. गंभीर स्वरूपाच्या प्रकरणांचा तपास करण्यासाठी विशेष कृती दल अर्थात एसटीएफ स्थापन करण्याची सूचना आहे. अशा प्रकरणांतील खटले दीर्घकाळ प्रलंबित राहू नयेत, यासाठी विशेष न्यायालयांची स्थापना करण्याचाही प्रस्ताव मांडण्यात आला आहे. या अहवालात उमेदवारांच्या हिताच्या दृष्टीने काही महत्त्वपूर्ण शिफारशी करण्यात आल्या आहेत. परीक्षा दिल्यानंतर ➪(पान २ वर)

पावणे चार कोटींच्या दरोड्याचा पोलिसांनी लावला छडा

■ शेतात भुसाखाली सापडले ४ कोटी ■ ३ पोत्यांमध्ये लपवून ठेवले होते





नागपूर/प्रतिनिधी- शांतीनगरात झालेल्या ३.७५ कोटी रुपयांच्या लुटीचे धागेदोरे बालाघाट जिल्ह्यातील डोरली गावाशी जोडले गेले आहेत. मंगळवारी सकाळी गुन्हे शाखेचे पथक एका आरोपीला सोबत घेऊन डोरली गावात पोहोचले आणि त्याच्या सांगण्यावरून शेतात लपवून ठेवलेल्या तीन पोत्यांमधील रोकड जप्त केली. जप्त केलेली रक्कम ४ कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे सांगितले जात आहे.

आरोपीने सुमारे चार दिवसांपूर्वी रोकड तीन पोत्यांमध्ये भरून गावातील एका परिचिताच्या शेतात कडब्याच्या ढिगाऱ्यात लपवून ठेवली होती. मंगळवारी सकाळी नागपूर गुन्हे शाखेचे पथक आरोपीला घेऊन डोरली येथे पोहोचले. आरोपीने दाखवलेल्या ठिकाणी केलेल्या शोधमोहीमेत तिन्ही पोती जप्त करण्यात ➪(पान २ वर)

हांगझोऊ आर्चरी एशिया कपमध्ये अमरावतीचा झेंडा

मानव जाधवला रौप्य, तर अभ्युदय पखालेला कांस्यपदक

अमरावती/प्रतिनिधी- चीनमधील हांगझोऊ येथे पार पडलेल्या 'आर्चरी एशिया कप – वर्ल्ड रँकिंग टूर्नामेंट (स्टेज-३)' या आंतरराष्ट्रीय तिरंदाजी स्पर्धेत अमरावतीच्या क्रीडा प्रबोधिनीच्या दोन प्रतिभावान खेळाडूंनी ऐतिहासिक कामगिरी करत देशाचा गौरव वाढवला आहे. युवा तिरंदाज मानव गणेशराव जाधव याने पुरुष कंपाउंड सांघिक गटात रौप्यपदक, तर अभ्युदय अमोल पखाले याने पुरुष रिकर्व्ह सांघिक गटात कांस्यपदक पटकावले आहे. मानव जाधव याने स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच आपला दबदबा निर्माण केला होता. वैयक्तिक पात्रता (क्वालिफिकेशन) फेरीत ७२० पैकी तब्बल ७११ गुणांची कमाई करत त्याने ४३ आंतरराष्ट्रीय स्पर्धकांमध्ये अव्वल स्थान पटकावले. त्यानंतर पुरुष कंपाउंड सांघिक गटात मानव जाधव, गणेश मणी रत्नम थिरुमुरु आणि मोहित भाटी या भारतीय त्रिकुटाने उपांत्यपूर्व फेरीत चायनीज तैपेईचा २३४-२३० असा, तर उपांत्य फेरीत सिंगापूरचा २३१-२२४ असा पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली. सुवर्णपदकाच्या लढतीत ऑस्ट्रेलियाकडून २३४-२२९ अशी निसटती हार पत्करावी लागल्याने भारतीय संघाला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. दुसरीकडे, क्रीडा प्रबोधिनीचा खेळाडू अभ्युदय अमोल पखाले याने पुरुषांच्या रिकर्व्ह सांघिक ➪(पान २ वर)

क्रीडा प्रबोधिनीच्या खेळाडूंची ऐतिहासिक कामगिरी



मानव जाधवला



अभ्युदय पखाले

शरद पवार कधीही थांबणार नाहीत, त्यांच्या निवृत्तीची चर्चा करणे अयोग्य

मुंबई / प्रतिनिधी- राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार येत्या १२ डिसेंबर रोजी आपल्या वाढदिवसानिमित्त राजकारणातून निवृत्ती जाहीर करणार असल्याच्या चर्चांना राज्यात मोठे उधाण आले आहे. शरद पवार १२ डिसेंबरला निवृत्तीची घोषणा करतील आणि एनडीए प्रवेशाबाबत निर्णय होईल, या राजकीय वर्तुळातील चर्चांवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला. शरद पवार साहेबांची कार्यशैली आणि कामाचा उत्साह मी जवळून पाहिला आहे. ते सतत नवनवीन प्रकल्पांत कार्यरत असतात. अशा कार्यशील नेत्याच्या निवृत्तीची चर्चा करणे योग्य नसून, अशा प्रकारच्या चर्चा करण्याचे कोणतेही कारण नाही, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.कोयनेचे पाणी मुंबईला वळवण्याच्या प्रस्तावावरून महायुतीतील काही नेत्यांनी आणि पश्चिम महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींनी केलेल्या विरोधाचा मुख्यमंत्र्यांनी समाचार घेतला. ते म्हणाले, पहिली गोष्ट म्हणजे कोयनेचे पाणी आत्ताच वळवण्याचा विषय नाही, तर त्यावर केवळ प्राथमिक अभ्यास सुरू आहे. कोणताही अभ्यास न करता अनेक लोक या विषयावर बोलत आहेत.कोयना प्रकल्प उभारल्यापासून गेल्या ५० ते ६० वर्षांत वीजनिर्मिती केल्यानंतर सोडले जाणारे सुमारे ६० ते ८० टीएमसी पाणी थेट समुद्राला जाऊन मिळते. या पाण्याचा एक थेंबही सिंचनासाठी (इरिगेशन) वापरला जात नाही. हेच वाया जाणारे पाणी उचलून मुंबईला देता येईल का, याचा अभ्यास सुरू आहे; जेणेकरून कोकणातील प्रकल्पांवरचा ताण कमी होऊन मुंबई स्वयंपूर्ण होईल.



शंभराव्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. शरणकुमार लिंबाळे

पुणे/प्रतिनिधी- शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक आणि सरस्वती सन्मानप्राप्त डॉ. शरणकुमार लिंबाळे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या मार्गदर्शक बैठकीत त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आल्याची घोषणा महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी मंगळवारी केली. शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रांगणात २७ ते ३० जानेवारीदरम्यान होणार आहे. या ऐतिहासिक संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी महामंडळाच्या बैठकीत दहा साहित्यिकांच्या नावांवर चर्चा झाली. यामध्ये चंद्रकांत भोंजाळ, श्रीकांत देशमुख, उमा कुलकर्णी, शेषराव मोरे, पी. एस. लोक, सुधाकर गायधनी, प्रवीण दवणे, मंगला गोडबोले, बाबा भांड आणि डॉ. शरणकुमार लिंबाळे यांचा समावेश होता. सर्व नावांचा विचार केल्यानंतर महामंडळाने एकमताने डॉ. शरणकुमार लिंबाळे यांच्या नावाची निवड केली. संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी डॉ. शरणकुमार लिंबाळे यांच्यासह रमेश पतंगे, विजय कुवळेकर आणि बाबा भांड यांच्या नावांची चर्चा होती. मात्र, महाराष्ट्र साहित्य परिषदेतील अंतर्गत मतभेदांमुळे अध्यक्ष निवडीची प्रक्रिया चर्चेत आली ➪(पान २ वर)

कोण आहेत डॉ. शरणकुमार लिंबाळे?



डॉ. शरणकुमार लिंबाळे हे मराठीतील महत्त्वाचे आंबेडकरवादी साहित्यिक म्हणून ओळखले जातात. एका छोट्या गावातील संघर्षमय बालपणापासून साहित्य क्षेत्रातील प्रतिष्ठेच्या 'सरस्वती सन्मान'पर्यंतचा त्यांचा प्रवास प्रेरणादायी मानला जातो. जातीय भेदभाव, गरिबी आणि सामाजिक विषमता यांचे अनुभव त्यांच्या लेखनातून प्रभावीपणे व्यक्त झाले आहेत. त्यांनी आत्मकथन, कादंबरी, कथा, कविता आणि समीक्षेच्या माध्यमातून मराठी साहित्याला समृद्ध केले आहे. त्यांची ४० हून अधिक पुस्तके प्रकाशित झाली असून, त्यांपैकी अनेक साहित्यकृतींचे विविध भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत.डॉ. लिंबाळे यांचा जन्म १ जून १९५६ रोजी सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील हन्नूर येथे झाला. बालपणापासूनच त्यांना जातीयता, गरिबी आणि सामाजिक विषमतेचा सामना करावा लागला. या अनुभवांनी त्यांच्या साहित्यिक जडणघडणीवर मोठा प्रभाव टाकला. त्यांनी कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठातून मराठी विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. 'मराठी दलित साहित्य आणि अमेरिकन ब्लॅक लिटरेचर : एक तौलनिक अभ्यास' या विषयावर त्यांनी पीएच.डी. मिळवली. 'अस्मितादर्श' या नियतकालिकातून त्यांच्या लेखनप्रवासाला सुरुवात झाली.

पंजाबमध्ये भाजप-अकाली युती

मुख्यमंत्री अकाली दलाचा :गृहमंत्री अमित शहा

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- पंजाब विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मंगळवारी भाजप आणि शिरोमणी अकाली दलाच्या युतीची अधिकृत घोषणा केली. महत्वाचे म्हणजे, शहा यांनी मुख्यमंत्रिपदाच्या चेह-यासंदर्भातही मोठी घोषणा करत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. पंजाबमध्ये अकाली दल मोठ्या भावाच्या भूमिकेत राहील. आम्ही सर्व ११७ जागांवर एकत्रितपणे निवडणूक लढवू. मोठा भाऊच मुख्यमंत्री असेल. अर्थात अकाली दलाचा नेताच मुख्यमंत्रिपदाचा चेहरा असेल, असे अमित शहा यांनी स्पष्ट केले आहे.

यावेळी शहा यांनी दोन्ही पक्षांच्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना अकाली दलासोबत मिळून निवडणुकीच्या मैदानात उतरण्याचा संदेश दिला. मात्र, अद्याप अकाली दल आणि भाजप यांनी जागावाटपासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही.



जागावाटपासंदर्भात बोलताना अमित शहा म्हणाले, आम्ही दोघे एकत्रितपणे ते ठरवू. आजपासून अकाली दल राजकारणात एनडीएचा अधिकृत सहकारी आहेत. यावेळी, शिरोमणी अकाली दलाचे अध्यक्ष आणि माजी उपमुख्यमंत्री सुखबीर सिंह बादल म्हणाले, पंजाबमध्ये ही अशी युती आहे जी जनतेच्या भावना दर्शवते. पंजाबमध्ये अकाली दल आणि भाजपने एकत्र यावे, ही समाजातील प्रत्येक वर्ग आणि प्रत्येक धर्माच्या लोकांची इच्छा आहे.

या मुद्यांवर लढणार निवडणूक- ही युती नशामुक्ती, भ्रष्टाचारापासून मुक्ती आणि राष्ट्रवादी शक्तींना चालना देण्याच्या मुद्यांवर ➪(पान २ वर)

शरद पवार निवृत्त होणार नाहीत, राज्यसभेचा ५ वर्षांचा कार्यकाळ बाकी

मुंबई / प्रतिनिधी- राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी राजकारणातून निवृत्ती घ्यावी आणि त्यानंतर पक्षाने भाजपप्रणीत एनडीएमध्ये सहभागी व्हावे, अशी चर्चा सुरू असल्याचे वृत्त समोर आले. या वृत्तामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. मात्र, खासदार सुप्रिया सुळे यांनी या चर्चांना स्पष्ट शब्दांत उत्तर दिले आहे. शरद पवार कोणत्याही परिस्थितीत निवृत्त होणार नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. एका वृत्तसंस्थेने शरद पवार यांच्या राजकीय निवृत्तीबाबत बातमी प्रसिद्ध केली होती. या बातमीत पक्षातील काही नेत्यांकडून भाजपसोबत जाण्याच्या पर्यायावर चर्चा सुरू असल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, सुप्रिया सुळे यांनी हे वृत्त फेटाळून लावत अशा बातम्या संतापजनक असल्याचे म्हटले आहे. शरद पवार यांच्या राज्यसभेच्या सदस्यत्वाचा अजून पाच वर्षांचा कार्यकाळ बाकी आहे. मग ते निवृत्त कसे होतील? कोण राजकारणातून निवृत्त व्हायचे, हे काही मोजके लोक ठरवणार नाहीत. त्याचा निर्णय जनता घेईल, अशी भूमिका ➪(पान २ वर)





१६ डिसेंबरला महामार्ग ताब्यात घेण्याचा आवामी लीगचा इशारा

शेख हसीना बांगलादेशात परतणार

ढाका / वृत्तसंस्था- गेल्या दोन वर्षांहून अधिक काळ भारतात आश्रयाला असलेल्या बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी येत्या १६ डिसेंबर रोजी मायदेशी परतण्याची अधिकृत घोषणा केल्यानंतर बांगलादेशातील राजकीय वातावरण प्रचंड तापले आहे. १६ डिसेंबर हा दिवस बांगलादेशात १९७१ च्या मुक्तिसंग्रामातील विजयाचा वर्धापनदिन म्हणून साजरा ➪(पान २ वर)

■ बुधवार २५ नोव्हेंबर २०२६
paper www.janmadhyam.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त काँग्रेसची 'अभिवादन यात्रा'



पद्मश्री डॉ. सुखदेव थोरात यांचे मार्गदर्शन

-के. राजू, मुकुल वासनिक, विश्वजित कदम यांची राहणार प्रमुख उपस्थिती

अमरावती/प्रतिनिधी - भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त काँग्रेस पक्षाच्या वतीने शनिवार, दि. ६ डिसेंबर २०२६ रोजी 'अभिवादन यात्रेचे' आयोजन करण्यात आले आहे. 'भारत जोडो' यात्रेतून प्रेरणा घेत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने सलग पाचव्या वर्षी या यात्रेचे आयोजन केले जात आहे.



शनिवारी सकाळी ठीक ९:०० वाजता अमरावती येथील इरविन चौकातून या अभिवादन यात्रेला प्रारंभ होईल. ही यात्रा पंचवटी, शेगाव नाका, कठोरा नाका, नवसारी, वलगाव मार्गे नया अकोला येथील पवित्र 'श्रद्धाभूमी' (डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थी स्मारक) येथे पोहोचेल. अस्थी स्मारक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सामूहिक अभिवादन केल्यानंतर, सकाळी ११ वाजता नया अकोला येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात 'अभिवादन सभा' पार पडेल.

या अभिवादन सभेमध्ये प्रख्यात अर्थतज्ज्ञ आणि विचारवंत पद्मश्री डॉ. सुखदेव थोरात हे उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. या सोहळ्याला मुख्य अतिथी म्हणून काँग्रेसचे झारखंड प्रभारी सन्मा. के. राजू, राज्यसभा खासदार मुकुल वासनिक, राष्ट्रीय सचिव श्रीवेल्ला प्रसाद आणि आमदार डॉ. विश्वजित कदम उपस्थित राहणार आहेत.

तसेच, या कार्यक्रमास माजी मंत्री व आमदार ॲड. यशोमती ठाकूर, खासदार बळवंत वानखडे, माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख, जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, शहराध्यक्ष बबलू शेखावत आणि माजी आमदार प्रा. विरेंद्र जगताप यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. संविधान आणि लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी व महामानवाला अभिवादन करण्यासाठी या अभिवादन यात्रेत आणि सभेत नागरिकांनी व काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

पान १ व १० वरून

आणखी दोन बालकांची विक्री

पुढे आली आहे.

चार बालकांचा शोध अद्याप लागेना - पोलिसांच्या तपासात आतापर्यंत आठ नवजात बालकांची विक्री झाल्याची माहिती समोर आली असली, तरी प्रत्यक्षात केवळ चार बालकांपर्यंतच पोलिसांना पोहोचता आले आहे. उर्वरित चार बालकांबाबत काही माहिती मिळाली असली, तरी त्यांचा ठावठिकाणा अद्याप लागलेला नाही. या बालकांचा शोध घेण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस विविध बाजूंनी तपास करीत असून, आणखी कोणते धागेदोरे हाती लागतात, याकडे लक्ष लागले आहे.

दंडाच्या मेसेजमागे सायबर

ई-चलानचे संदेश 'CP-MHPECH-S' किंवा 'MHPECH' या प्रेषक ओळखीवरून प्राप्त होतात. मात्र, अनोळखी मोबाईल क्रमांकांवरून येणाऱ्या संदेशांमध्ये संशयास्पद लिंक दिलेली असू शकते. अशा लिंकवर क्लिक केल्यास वैयक्तिक माहिती किंवा बँकिंग तपशीलांचा गैरवापर होऊन आर्थिक फसवणूक होण्याचा धोका आहे. त्यामुळे केवळ संदेश प्राप्त झाला म्हणून तो अधिकृत असल्याचे गृहीत धरू नये. वाहनावरील दंडाची खात्री करण्यासाठी अनोळखी लिंकचा आधार घेण्याची गरज नाही. वाहनधारकांनी प्ले स्टोअरवरून अधिकृत 'महा ट्रॅफिक' ॲप डाउनलोड करून त्यामध्ये वाहनाची नोंदणी करावी. त्याद्वारे प्रलंबित ई-चलानची माहिती तपासता येते. दंड भरताना केवळ अधिकृत शासकीय संकेतस्थळ किंवा ॲपचाच वापर करावा. अनोळखी लिंकवर बँक खाते, एटीएम कार्ड, ओटीपी किंवा अन्य गोपनीय माहिती देऊ नये. ई-चलानच्या नावाखाली होणाऱ्या संभाव्य सायबर फसवणुकीपासून वाहनधारकांनी स्वतःचे आर्थिक नुकसान टाळावे. कोणताही संदेश आल्यास त्याची सत्यता पडताळल्याशिवाय पुढील प्रक्रिया करू नये, असे आवाहन सहायक पोलीस आयुक्त तथा वाहतूक विभागाचे अधिकारी संजय खताळे यांनी केले आहे.

फिनले मील कामगार सुनील

काल २४ नोव्हेंबर रोजी पुन्हा एका मिल कामगाराने आत्महत्या केल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.आतापर्यंत एकूण १७ कामगारांनी कोरोना काळापासून मील बंद झाल्यानंतर मानसिक व आर्थिक अडचणीमुळे जीवन संपविले आहे .यावर केंद्र शासन ठोस निर्णय कधी घेणार ? हा प्रश्न निर्माण झाला आहे.

४० ह्वावाशी असणाऱ्या बसची विश्व

टोलनाक्यावर बस थांबविली.आणि बसची काच फोडली.यामुळे प्रवाशी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले.पोलिस कर्मचारी सुद्धा दाखल झाले होते.यामुळे मध्य प्रदेशात कायदा ,सुव्यवस्थेच्या प्रश्न चव्हाट्यावर आल्याचे मत नील महेश्वरी यांनी व्यक्त केले आहे. बस चालकाकडून झालेल्या अपघातानंतर विश्व हिंदू परिषदेच्या सदस्यांनी बस थांबवित बसचे काच फोडून प्रवासी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण करण्याच्या अधिकार कोणी दिला ? आणि त्यांच्या वर कारवाई कधी ?हा प्रश्न सुद्धा अचलपूर नगर परिषदेचे स्वीकृत नगरसेवक नील महेश्वरी यांनी मांडला आहे.त्या बस मध्ये महिला ,पुरुष आणि लहान मुले सह ४० प्रवाशी होते.

विश्व हिंदू परिषदेचे जितेंद्र पांचाल यांच्यासह सहकाऱ्यांनी बसचा काच फोडून प्रवाशी वर्गावर हल्ला करण्याचा त्यांच्या हेतू असल्याचा आरोप ही नील महेश्वरी यांनी केला आहे. यावेळी पोलिस कर्मचारी सुद्धा उपस्थित होते.मात्र प्रवाशी वर्गाच्या सुरक्षेच्या दृष्टीने कारवाई न करता जितेंद्र पांचाल यांची बाजू पोलिस कर्मचारी घेत असल्याचा आरोप ही अचलपूर नगर परिषदेचे स्वीकृत नगरसेवक नील महेश्वरी यांनी केला आहे .बस चालकाकडून झालेला अपघात दुर्दैवी आहे .आम्ही आमची सामाजिक बांधिलकी समजून ८ हजार रुपयाचा भरणा पोलिसांसमोर केला आहे .मात्र जितेंद्र पांचाल यांनी बस ची काच फोडण्याचा अधिकार कोणी दिला ? आम्ही भूमिका घेतली नसती तर प्रवाशी वर्गाच्या सुरक्षेच्या प्रश्न निर्माण झाला होता. यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी अचलपूर नगर परिषद चे स्वीकृत नगरसेवक नील महेश्वरी यांनी सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हिडिओतून केली आहे.

तपोवन संस्थेला डॉ.रमेश गोडबोले

नावलौकिक प्राप्त केला होता. बडनेरा येथील जुन्या वस्तीतील त्यांचे रुग्णालयात सर्व स्तरावरील रुग्णांना उत्तम वैद्यकीय उपचार मिळायचे. त्यांनी संपूर्ण आयुष्य अल्प दरात रुग्णसेवा केली. त्यांच्या वैद्यकीय कारकिर्दीत देशातील अनेक तज्ज्ञांशी निकटचा संपर्क होता. डॉ. गोडबोले यांचा वैद्यकीय सेवे सोबतच धर्म कार्यातही व आध्यात्मिक क्षेत्रात पुढाकार असायचा. उत्तम कीर्तनकार असल्याने ते दत्त मंदिर, अंबापेट श्रीराम मंदिर, गोपाळकृष्ण मंदिर, अंबादेवी एकवीरा देवी मंदिर या ठिकाणी त्यांनी विश्वस्त म्हणून आपल्या सेवा दिल्या आहे. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी देखील त्यांनी अंतिम श्वासापर्यंत समर्थपणे सांभाळली आहे. बडनेरा येथे त्यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनात संत गाडगेबाबा रक्तपेढी सुरू करण्यात आली आहे. डॉक्टर गोडबोले यांचे व्यक्तिमत्व सेवा परमो धर्म या प्रवृत्तीचे होते. त्यांच्या कार्याची स्मृती कायम राहावी व त्यांच्या पश्चात राहिलेले सेवा कार्य सतत पुढे जावे. याकरिता स्व. रमेश गोडबोले स्मृती गौरव पुरस्कार सुरू करण्यात आलेला आहे. पुरस्काराचे हे दुसरे वर्ष आहे. मागील वर्षी प्रज्ञा प्रबोधनी संस्थेला पुरस्कार देण्यात आला होता तर यावर्षी तपोवन संस्थेची निवड करण्यात आलेली आहे. पुरस्कार सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन प्रतिष्ठानाच्या वतीने करण्यात आले आहे.

जुगार अड्डयांवर गुन्हे शाखेचे छापे

सुशील सोनटक्के (वय ३२), लक्ष्मण आमटे (वय ४४) आणि राहिल शफाकत (वय २४) यांचा समावेश आहे. या ठिकाणाहून पोलिसांनी ३० हजार ९१० रुपये रोख जप्त केले. याच पोलीस ठाण्याच्या हद्दीत दुसरी कारवाई करत लालखडी येथील फईम अहमद (वय ३२) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून २ हजार २०० रुपये रोख आणि जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. तर तिसऱ्या कारवाईत हबीब नगर येथील शेख जुबेर (वय ३९) याला जुगार खेळताना पकडण्यात आले. त्याच्याकडून २ हजार ४७० रुपये रोख आणि जुगाराचे साहित्य हस्तगत करण्यात आले.

दरम्यान, गुन्हे शाखेच्या पथकाने अवैध देशी दारूविक्रीविरोधातही दोन ठिकाणी कारवाई केली. नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रतनगंज येथील शीला धुनेधार (वय ५५) हिच्याकडून देशी दारूच्या ३२ बाटल्या जप्त करण्यात आल्या. तर गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जिजाऊ नगर येथील प्रदीप जांभुळकर (वय ५५) याच्याकडून देशी दारूच्या ३६ बाटल्या हस्तगत करण्यात आल्या. या प्रकरणी संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली.

पैसे कमवायला ह्वान्सला जातो

अज्ञाताविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. शुभमचा मोबाईल लोकेशन मुंबईमध्ये मिळाली आहे.फोन स्विच ऑफ येत असल्याने तांत्रिक तपासात मर्यादा येत आहेत. सध्या मोर्शी पोलीस शुभमचा कसून शोध घेत आहेत.शुभम बडनेरा येथील एका अभियांत्रिकी महाविद्यालयाचा विद्यार्थी असल्याचेही समोर आले आहे.या प्रकरणात पोलीस तपास करत आहे.

अवैध रेती तस्करीह्वाकरणी

केली जात आहे. या ठिकाणी लाल रंगाच्या महिंद्रा ५७५ डीआय ट्रॅक्टरच्या (क्रमांक एमएच २७ एल ८४८१) ट्रॉलीमध्ये (क्रमांक एमएच २७ ईजे १२७९) कोबेल्को कंपनीच्या एक्स्कॅव्हेटर मशीनच्या साहाय्याने रेती भरली जात असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने महसूल विभागाचे मंडळ अधिकारी आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने घटनास्थळी छापा टाकला. यावेळी दोघांना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. कारवाईदरम्यान ट्रॅक्टर-ट्रॉली, सुमारे २० लाख रुपये किमतीची एक्स्कॅव्हेटर मशीन आणि चार ब्रास रेती असा एकूण २५ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी बडनेरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अवैध रेती उत्खनन आणि तस्करीच्या अनुषंगाने पुढील तपास सुरू आहे.

अदानींच्या ह्वाकल्पासाठी मेळघाटला

प्रकल्प लादले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

अमरावती एमआयडीसीमध्ये यापूर्वी औष्णिक वीज प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात जागा देण्याचा प्रयत्न झाला होता. अशा प्रकल्पांमुळे स्थानिक नैसर्गिक साधनसंपत्ती, पाणी आणि पर्यावरणावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या विकासाच्या नावाखाली पर्यावरणाची हानी करणारे निर्णय घेऊ नयेत, अशी भूमिका त्यांनी मांडली.

आडनदी प्रकल्पाबाबत शासनाने वृक्षतोडीचे संभाव्य प्रमाण, वन्यजीवांच्या अधिवासावरील परिणाम आणि पर्यावरणीय नुकसान यांचे स्वतंत्र मूल्यांकन सार्वजनिक करावे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील वन्यजीवांच्या संचारमार्गांचा अभ्यास करावा. स्थानिक आदिवासींच्या ग्रामसभांची संमती आणि पारंपरिक वनहक्कांचे संरक्षण सुनिश्चित करावे. रोजगारांच्या दाव्याचा तपशील व स्थानिक युवकांसाठी रोजगाराची लेखी हमी द्यावी, अशा मागण्या देशमुख यांनी केल्या आहेत. त्यामुळे शासनाने या प्रकल्पाबाबत तातडीने स्पष्ट भूमिका जाहीर करावी. अन्यथा काँग्रेसच्या वतीने प्रकल्पाविरोधात रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी दिला.

टेबलावर ठेवलेले मंगळसूत्र गायब

झाल्याने त्यांनी टेबलावर शोध घेतला. मात्र, तेथे मंगळसूत्र आढळून आले नाही. यानंतर त्यांनी मुलगी श्रेया (वय २६) हिच्याकडे विचारणा केली. मात्र, तिलाही मंगळसूत्राबाबत काही माहिती नसल्याचे तिने सांगितले. घरात शोध घेऊनही मंगळसूत्र मिळून न आल्याने अखेर भुकुसे यांनी पोलिसांत धाव घेत तक्रार नोंदविली.

या तक्रारीवरून खोलापुरी गेट पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३०५ अन्वये अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. चोरीला गेलेल्या मंगळसूत्राचा शोध घेण्याचे काम पोलीस करीत आहेत.

ओडिशातून गांजाची खेप घेऊन

किंमत पाच लाख रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. सुपर एक्स्प्रेस हायवे मार्गावरील एका शोरूमसमोर ही कारवाई करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर आणि त्यांच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली होती. अब्दुल समीर हा ओडिशातून गांजाची खेप घेऊन बडनेरा येथे पोहोचला असून, तेथून सुपर एक्स्प्रेस हायवे मार्गाने अमरावतीच्या दिशेने येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे गुन्हे शाखा युनिट-२ च्या पथकाने न्यू बायपास परिसरात पाळत ठेवून सापळा रचला. काही वेळातच संशयित आरोपी त्या मार्गाने येताना दिसताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे १० किलो गांजा आढळून आला. पोलिसांनी गांजाची खेप जप्त करून आरोपीला अटक केली.

दरम्यान, ओडिशातून आणलेला हा गांजा नेमका कोणासाठी आणण्यात आला होता, त्याची मागणी कोणी केली होती आणि या तस्करीमागे आणखी कोणाचे जाळे कार्यरत आहे, याचा शोध गुन्हे शाखेकडून घेतला जात आहे. ओडिशातील गांजा पुरवठादारांपासून ते स्थानिक पातळीवरील वितरकांपर्यंतचे धागेदोरे तपासण्याचे काम पोलिसांनी सुरू केले आहे.

नांदेड येथील युवकांच्या

कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्यावर एक वार्षिक वेतनवाढ संचयी परिणाम न होता रोखण्याची शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्याची बदली करण्याबाबतचा प्रस्ताव पंचायत समिती दर्यापूरमार्फत विभागीय आयुक्त, अमरावती विभाग यांच्याकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे. ग्रामपंचायत मधिल कथित भष्ट्राचार विरोधात उपोषणाला बसलेले. हर्षद नेहर, साजीद शेख, गोपाल वसू,रुपेश देवके यांना खासदार बळवंत वानखडे, आमदार गजानन लवटे, सुनिल गावंडे, संजय बेलोकार, बबनराव विल्हेकर यांनी निबू शरबत देऊन उपोषण सोडविले. यावेळी गावातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

वैभव सूर्यवंशीचे २८ चेंडूत

त्याने स्वतःचाच विक्रम मोडला, जो त्याने २०२५ मध्ये बिहारकडून अरुणाचल प्रदेशविरुद्ध ५९ चेंडूंमध्ये प्रस्थापित केला होता.इंडिया 'अ' संघाने ११ व्या षटकात २०० धावांचा टप्पा ओलांडला. वैभव सूर्यवंशीने बेसिल हमीदच्या षटकातील दुसऱ्या चेंडूवर षटकार मारला. चौथा चेंडू वाईड होता, त्यानंतर वैभवने पुढच्याच चेंडूवर आणखी एक षटकार मारला. मात्र, पाचव्या चेंडूवर त्याचा झेल सुटला. रिंकू सिंगने शेवटच्या चेंडूवर चौकार मारून संघाच्या २०० धावा पूर्ण केल्या. इंडिया 'अ' संघाने या षटकात १९ धावा केल्या. ११ षटकांनंतर धावसंख्या २०२/२ आहे. वैभव ४४ चेंडूंमध्ये १६४ धावांवर खेळत होता.

वैभवने ३६ चेंडूंमध्ये १३५ धावा केल्या- वैभव सूर्यवंशीने ९व्या षटकात दोन षटकारही मारले. त्याने उद्दिश सुरीच्या पहिल्याच चेंडूवर लाँग-ऑनच्या दिशेने षटकार लगावला. त्यानंतर रिंकू सिंगने चौथ्या चेंडूवर षटकार ठोकला. वैभवने षटकाच्या शेवटच्या चेंडूवर आणखी एक षटकार मारला.

१० कोटींचा दंड:

उमेदवारांना संपूर्ण परीक्षा शुल्क परत मिळावे, अशी सूचना आहे. तसेच उत्तरतालिकेवर उमेदवाराने घेतलेली हरकत योग्य ठरल्यास त्या हरकतीसाठी भरलेले शुल्कही परत करण्याची शिफारस करण्यात आली आहे. दरवर्षी ऑक्टोबर महिन्यापर्यंत पुढील वर्षाचे वार्षिक परीक्षा वेळापत्रक जाहीर करण्याची सूचनाही समितीने केली आहे. उमेदवारांना आधार किंवा महाआयडीच्या माध्यमातून एकदाच नोंदणी करता यावी, अशी सुविधाही प्रस्तावित आहे.

परीक्षा प्रक्रियेवर प्रभावी देखरेख ठेवण्यासाठी त्रिस्तरीय कमांड अँड कंट्रोल सेंटर उभारण्याची शिफारस करण्यात आली आहे. त्याचबरोबर रिक्त पदांची माहिती वेळेत उपलब्ध व्हावी आणि भरती प्रक्रियेत विलंब होऊ नये, यासाठी 'इंटिग्रेटेड रिक्विझिशन पोर्टल' विकसित करण्याचा प्रस्ताव आहे. विविध शासकीय विभागांनी सप्टेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत भरतीसाठीची मागणीपत्रे एमपीएससीकडे पाठवावीत, अशी सूचना करण्यात आली आहे.

परीक्षा आयोजनाची जबाबदारी अधिक परिणामकारकपणे पार पाडण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली स्वतंत्र परीक्षा शाखा स्थापन करण्याची शिफारस आहे. याशिवाय परीक्षा केंद्रांची स्वतंत्र यादी अर्थात 'व्हेन्यू बँक' तयार करण्याचे सुचवण्यात आले आहे. परीक्षा केंद्रांची निवड आणि त्यांचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपवण्याचा प्रस्तावही अहवालात आहे. परीक्षा प्रक्रियेतील डिजिटल गैरप्रकार रोखण्यासाठी स्वतंत्र तंत्रज्ञान आणि सायबर सुरक्षा कक्ष स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली आहे.राज्यातील भरती परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि विश्वासार्ह करण्याच्या उद्देशाने ४ सप्टेंबर २०२६ रोजी या उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली होती. समितीने सादर केलेल्या दुसऱ्या अहवालात कठोर कायदेशीर तरतुदींसोबतच परीक्षा व्यवस्थेतील तांत्रिक आणि प्रशासकीय सुधारणांवर भर दिला आहे. या शिफारशींची शासनाकडून अंमलबजावणी झाल्यास राज्यातील स्पर्धा परीक्षा आणि नोकरभरती प्रक्रियेत मोठे बदल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या अहवालातील शिफारशींवर सरकार पुढे कोणता निर्णय घेते, याकडे लाखो परीक्षार्थींचे लक्ष लागले आहे.

पावणे चार कोटींच्या दरोड्याचा

आली. जप्त केलेली रोकड ग्रामपंचायत डोरली येथे ठेवण्यात आली आहे, जिथे क्राइम ब्रँचचे पथक नोटांची मोजणी करण्यात व्यस्त आहे. लूट ३.७५ कोटी रुपयांची असल्याचे सांगितले जात होते; मात्र जप्त केलेली रोकड ४ कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याची चर्चा सुरू झाल्याने गावात आणि आसपासच्या परिसरात खळबळ उडाली आहे. १८ नोव्हेंबरच्या रात्री नागपूरच्या तुळशी नगरमध्ये सशस्त्र दरोडेखोरांनी व्यापारी सुरेश परमार यांच्या कर्मचाऱ्यांकडून रोकडने भरलेली कार लुटली होती. त्या कारमध्ये ३.७५ कोटी रुपये ठेवले होते. दरोडेखोरांनी कार कामठी रोडवरील खैरी परिसरात सोडून दिली आणि रोकड घेऊन फरार झाले. तेव्हापासून नागपूर पोलिस आरोपी आणि रकमेचा शोध घेत होते.

मध्यप्रदेशकडे पळाले होते आरोपी- लुटमार केल्यानंतर दरोडेखोर मध्यप्रदेश राज्याच्या दिशेने पळताना सीसीटीव्हीत दिसले होते. त्यांचा माग घेतला असता टोलनाक्यावरील सीसीटीव्ही फुटेजवरुनही दरोडेखोरांना माग लागला होता. डोरली येथे रोकड जप्त झाल्यानंतर पोलिस या प्रकरणाशी संबंधित इतर पैलूंची चौकशी करत आहेत. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, जप्त केलेली रक्कम ३.७५ कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे आरोपींनी इतर ठिकाणीही गुन्हे केले असावेत, अशी शक्यता आहे.

हांगझोऊ आर्चरी एशिया

गटात चमकदार कामगिरी केली. अभ्युदयसह उज्ज्वल धामा आणि गोल्डी मिश्रा यांचा समावेश असलेल्या भारतीय संघाने उपांत्यपूर्व फेरीत इंडोनेशियावर ५-३ अशी मात केली. कांस्यपदकासाठी झालेल्या अत्यंत चुरशीच्या लढतीत भारत आणि चायनीज तैपेई यांच्यात ४-४ अशी बरोबरी झाली. मात्र, त्यानंतर झालेल्या 'शूट-ऑफ'मध्ये भारतीय संघाने बाजी मारत कांस्यपदकावर नाव कोरले.

एकाच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत अमरावती क्रीडा प्रबोधिनीच्या दोन खेळाडूंनी मिळवलेल्या या दुहेरी यशामुळे जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे. या यशाबद्दल क्रीडा प्रबोधिनीचे प्राचार्य तथा अमरावती विभागाचे क्रीडा उपसंचालक अविनाश पुंड, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, प्रशिक्षक अमर जाधव तसेच प्रबोधिनीतील खेळाडू व पालक वर्गाने त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

शंभराव्या मराठी साहित्य

होती. शासकीय निधीच्या हिशेबावरून आणि आर्थिक अनियमिततेच्या मुद्द्यावरून परिषदेतील वाद चिघळला होता. मसापचे अध्यक्ष योगेश सोमण, प्रमुख कार्यवाह स्वाती महाळंक आणि कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर यांच्याविरोधात कार्यकारिणीतील २१ सदस्यांनी अविश्वास ठराव दाखल केला होता. हे तिघेही साहित्य महामंडळाचे प्रमुख पदाधिकारी असल्याने त्यांना कामकाजाचा नैतिक आणि कायदेशीर अधिकार राहिला नसल्याचा दावा या सदस्यांनी केला होता. त्यामुळे या गटाने महामंडळाचे उपाध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम सप्रे यांना पत्र पाठवून लिंबाळे यांच्यासह अन्य नावांचा अध्यक्षपदासाठी विचार करण्याची मागणी केली होती.

'अक्करमाशी'ने मिळवून दिली वेगळी ओळख- २० जुलै १९८४ रोजी प्रकाशित झालेल्या 'अक्करमाशी' या आत्मकथनामुळे डॉ. लिंबाळे यांचे नाव साहित्यविश्वात विशेष चर्चेत आले. जातिव्यवस्थेचे वास्तव, सामाजिक विषमता आणि व्यक्तीच्या अस्तित्वाचा संघर्ष यांचे प्रामाणिक चित्रण या पुस्तकात करण्यात आले आहे. या आत्मकथनाने मराठी साहित्याला नवा दृष्टिकोन दिला. पुढे ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने 'ऊप ध्लूँ' या नावाने त्याचा इंग्रजी अनुवाद प्रकाशित केला.

आकाशवाणीपासून मुक्त विद्यापीठापर्यंतचा प्रवास- १९८६ ते १९९२ या काळात डॉ. लिंबाळे यांनी सोलापूर आकाशवाणी केंद्रावर उद्घोषक म्हणून काम केले. त्यानंतर नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात सहायक संपादक म्हणून त्यांनी कार्यभार स्वीकारला. पुढे प्राध्यापक आणि संचालक या पदांवरही त्यांनी काम केले. या विद्यापीठातून ते सेवानिवृत्त झाले.

दलित साहित्याच्या सौंदर्यशास्त्राची मांडणी- डॉ. लिंबाळे यांनी साहित्यनिर्मितीबरोबरच दलित साहित्याच्या वैचारिक आणि सैद्धांतिक मांडणीतही महत्त्वाचे योगदान दिले आहे. 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र' हा त्यांचा समीक्षाग्रंथ विशेष गाजला. या ग्रंथाचा इंग्रजी अनुवाद 'Towards an Aesthetics of Dalit Literature' या नावाने प्रसिद्ध झाला. दलित साहित्यामध्ये कल्पनेपेक्षा प्रत्यक्ष जीवनानुभवाला महत्त्व असले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. त्यांच्या या विचारांचा अभ्यास विविध विद्यापीठांमध्ये केला जातो.२०११ मध्ये नांदेड येथे झालेल्या बाराव्या अखिल भारतीय आंबेडकरवादी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद डॉ. लिंबाळे यांनी भूषवले होते. त्यांच्या साहित्यिक योगदानाची दखल राष्ट्रीय स्तरावरही घेण्यात आली.२०१८ मध्ये प्रकाशित झालेल्या 'सनातन' या ऐतिहासिक कादंबरीसाठी त्यांना के. के. बिर्ला फाऊंडेशनचा २०२० चा प्रतिष्ठेचा 'सरस्वती सन्मान' जाहीर झाला. हा सन्मान मिळवणारे ते पहिले दलित साहित्यिक ठरले. या कादंबरीचा इंग्रजी अनुवाद २०२४ मधील जेसीबी साहित्य पुरस्काराच्या अंतिम यादीतही समाविष्ट झाला. सामाजिक न्याय आणि साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल जुलै २०२५ मध्ये त्यांना केरळमधील 'चिंता रवींद्रन पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

विविध साहित्यप्रकारांत विपुल लेखन- डॉ. शरणकुमार लिंबाळे यांचे लेखन केवळ आत्मकथनापुरते मर्यादित नाही. 'अक्करमाशी', 'पुन्हा अक्करमाशी', 'बारामाशी' आणि 'राणीमाशी' ही त्यांची आत्मकथनात्मक पुस्तके वाचकांच्या परिचयाची आहेत. 'सनातन', 'हिंदू', 'बहुजन', 'झुंड', 'दंगल', 'उपल्या', 'रामराज्य' आणि 'ओ' या त्यांच्या कादंबऱ्यांनीही साहित्यविश्वात लक्ष वेधले.

'हरिजन', 'रथयात्रा', 'उद्रेक' आणि 'गावकुसाबाहेरील कथा' हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र', 'प्रज्ञासूर्य', 'दलित पँथर', 'दलित ब्राह्मण', 'ब्राह्मण्य', 'वादंग' आणि 'दलित फाईल्स' या ग्रंथांतून त्यांनी सामाजिक, वैचारिक आणि साहित्यिक विषयांवर भाष्य केले आहे.

लेखनाचे वेगळेपण- डॉ. लिंबाळे यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक वास्तवाचे थेट आणि निर्भीड चित्रण. वंचित समाजाचे जगणे, जातीय विषमता आणि सामाजिक अन्याय यांचे अनुभव त्यांनी कोणताही आडपडदा न ठेवता शब्दबद्ध केले. त्यांच्या साहित्यामुळे दलित जीवनाचे वास्तव व्यापक वाचकवर्गापर्यंत पोहोचले. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या साहित्याची दखल घेतली गेली.आता शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांच्या साहित्यिक प्रवासात आणखी एक महत्त्वाचा टप्पा जोडला गेला आहे. मराठी साहित्याच्या शतकमहोत्सवी संमेलनाचे अध्यक्ष म्हणून ते कोणती भूमिका मांडतात, याकडे साहित्यप्रेमींचे लक्ष लागले आहे.

पुणे ग्रँड टूरमुळे संमेलनाच्या तारखांत बदल- शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यापूर्वी २८ ते ३१ जानेवारीदरम्यान आयोजित करण्याचे नियोजन होते. मात्र, याच कालावधीत पुणे ग्रँड टूरचे आयोजन होणार असल्याने संमेलनाच्या तारखांमध्ये बदल करण्यात आला. त्यानुसार आता हे संमेलन २७ ते ३० जानेवारीदरम्यान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रांगणात होणार असल्याचे योगेश सोमण यांनी जाहार केले.

पंजाबमध्ये भाजप-अकाली युती

निवडणूक लढवेल, असे अमित शहा यांनी सांगितले. तसेच, ३१ डिसेंबर २०२९ पर्यंत पंजाबमधून नशाखोरी पूर्णपणे संपुष्टात आणू, असेही शहा यांनी म्हटले आहे. खरे तर, पंजाबमध्ये भाजप आणि अकाली दलाची दीर्घकाळ युती होती; मात्र शेतक-यांच्या मुद्द्यावरून २०२० मध्ये अकाली दलाने भाजपसोबतची युती तोडली होती. यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत दोन्ही पक्षांना मोठा फटका बसला होता. त्या निवडणुकीत भाजपला केवळ २ तर अकाली दलाला केवळ ३ जागाच मिळाल्या होत्या.

शरद पवार निवृत्त होणार नाहीत,

सुप्रिया सुळे यांनी मांडली. त्यांच्या या विधानामुळे राष्ट्रवादीतील राजकीय हालचालींबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.

मोदींच्या फोनमुळे चर्चा- काही दिवसांपूर्वी प्रकृती अस्वास्थ्यामुळे शरद पवार यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फोन करून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली होती. या संभाषणादरम्यान मोदी यांनी, आपण विश्रांती घ्या, सुप्रिया आणि आम्ही देश सांभाळू, असे म्हटल्याचे सांगितले जात आहे.

शरद पवार असे कधीही करणार नाहीत : संजय राऊत

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनीही अत्यंत तिखट शब्दांत संताप व्यक्त केला आहे. शरद पवारांचे संपूर्ण आयुष्य धर्माधं शक्तीं

जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ बुधवार, २५ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

न्यायालयात जमीन वाद प्रलंबित, तरीही दुसऱ्या शेतकऱ्याने घेतली शेतात बोअरवेल!

न्यायालयात जमीन वाद प्रलंबित, तरीहीमूळ खातेदाराच्या जमिनीवर कथित बेकायदेशीर हस्तक्षेप

तहसीलदार व ठाणेदारांकडे लेखी तक्रार, न्याय न मिळाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

■ प्रतिनिधी | रिसोड ■

तालुक्यातील कंकरवाडी शेतशिवारात न्यायालयात जमीनविषयक प्रकरण प्रलंबित असतानाही दुसऱ्याच शेतकऱ्याने वादग्रस्त शेतजमिनीत कथितरीत्या जबरदस्तीने बोअरवेल घेतल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकरणामुळे शेतकरी वर्गात चर्चा सुरू झाली आहे.

प्राप्त माहितीनुसार, कंकरवाडी शिवारातील गट क्रमांक १०६ व १०७ मधील कुळ वहिवाटीच्या शेतजमिनीचा सातबारा संभाजी महादू जाधव (रा. घोसरवाडी, ता. रिसोड) यांच्या नावावर आहे. अशोक मुंजाजी जाधव हे सदर जमिनीवर बेकायदेशीररीत्या ताबा मिळविण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे.



यासंदर्भात संभाजी जाधव यांनी वाशिम येथील प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांच्या न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४३/२०२६ अन्वये संभाजी जाधव व इतर विरुद्ध लिंबाजी जाधव व इतर असे प्रकरण दाखल केले असून, ते सध्या न्यायप्रविष्ट आहे.

विशेष म्हणजे, जमिनीचा वाद न्यायालयात प्रलंबित असताना आणि सातबारा आपल्या नावावर असतानाही अशोक मुंजाजी जाधव यांनी कोणतीही परवानगी न घेता शेतात जबरदस्तीने बोअरवेल घेतल्याचा आरोप संभाजी जाधव यांनी केला आहे. बोअरवेलसाठी संबंधित विभागाची परवानगी आवश्यक असताना ती घेतली नसल्याचेही तक्रारीत नमूद केले आहे.

या प्रकरणी तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर आघाव व ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्याकडे लेखी तक्रार देऊन संबंधितांवर तातडीने योग्य ती कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने दखल न घेतल्यास संबंधित विभागासमोर आमरण उपोषण करण्याचा इशाराही तक्रारदाराने दिला आहे.

आता या गंभीर तक्रारीची प्रशासन कितपत दखल घेते आणि तक्रारदाराला काय न्याय मिळतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

कास्ट्राईब महासंघाचे आज मुंबईत धरणे आंदोलन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मागासवर्गीय अधिकारी, कर्मचारी आणि शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कास्ट्राईब कर्मचारी महासंघ व कास्ट्राईब शिक्षक संघटनेच्या वतीने २५ नोव्हेंबर २०२६ रोजी मुंबईतील आझाद मैदानावर राज्यव्यापी धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. राज्याध्यक्ष कृष्णा इंगळे यांच्या नेतृत्वाखाली होणार आहे.

पदोन्नतीतील आरक्षण लागू करणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे, रिक्त पदांचा अनुशेष भरणे, टीईटीची सक्ती रद्द करणे, मुख्यालयी राहण्याची अट रद्द करणे, शिक्षकांना १०, २०, ३० आश्वासित प्रगती योजना लागू करणे, बीएलओ व अशैक्षणिक कामांतून शिक्षकांना मुक्त करणे, सर्व पदवीधर शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी लागू करणे तसेच सेवानिवृत्त शिक्षक व कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडविणे या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे.

कुपटा, कवठळ येथे क्षयरोग व एड्स तपासणी शिबिरांचे आयोजन

दोन्ही शिबिरांत १२४ संशयितांची एक्स-रे तपासणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हा क्षयरोग केंद्र, वाशिम यांच्या वतीने १९ नोव्हेंबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र कुपटा तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र मोहरी अंतर्गत आरोग्य उपकेंद्र कवठळ येथे क्षयरोग व एड्स तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांना नागरिकांचा प्रतिसाद मिळाला.

प्राथमिक आरोग्य केंद्र कुपटा येथे आयोजित शिबिराचे नियोजन जिल्हा क्षयरोग केंद्राचे आरोग्य निरीक्षक रामदास गवई यांनी केले. यावेळी क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी सतीश सैबेवार यांनी ४७ संशयितांची एक्स-रे तपासणी केली, तर २१ जणांचे थुंकी नमुने (स्पुटम) संकलित करण्यात आले.तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र मोहरी अंतर्गत आरोग्य उपकेंद्र कवठळ येथे



आयोजित शिबिरात टेक्निशियन कार्तिक शिरसाठ यांनी ७७ संशयितांची एक्स-रे तपासणी केली. यावेळी १२ जणांचे थुंकी नमुने संकलित करण्यात आले. लिंक वर्कर प्रज्ञा भगत यांनी ४० व्यक्तींची एचआयव्ही (एड्स) तपासणी केली. दोन्ही ठिकाणी आयोजित शिबिरांमध्ये आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. यावेळी उपस्थित नागरिकांना क्षयरोग तसेच डेंग्यू आजाराची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि आरोग्यविषयक काळजी याबाबत मार्गदर्शन करून जनजागृती करण्यात आली. कुपटा येथील शिबिरात फार्मसी ऑफिसर, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, आरोग्य निरीक्षक, आरोग्य सहाय्यिका, आरोग्य सेवक, गटप्रवर्तक, वाहनचालक, परिचर व आशा कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. तर कवठळ येथील शिबिरात डॉ. शिल्पा राऊत, अशोक भगत, संतोष बल्लाळ, प्रशांत हागे, चंचल गायकवाड, अर्चना ठाकरे, मनीष जाधव यांच्यासह आशा कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

अकोला महानगरपालिका, अकोला
विद्युत विभाग

निविदा सुचना क्र. ०४ (सन २०२६-२७)

अकोला महानगरपालिकेच्या विद्युत विभागा मार्फत मनपा निधी (सन २०२६-२७) अंतर्गत प्र.क्र. १९ मधील शिव शक्ति श्रीगणेशघाट व देवि घाट तसेच शहरातील ईतर श्रीगणेशघाटा वर जुने विद्युत खांब दुरुस्त करून त्यावर पथदिवे बसविणे.

या कामा करीता सार्वजनिक बांधकाम विभाग विद्युत महाराष्ट्र शासन यांचे कडे नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून निविदा मागण्यात येत आहे संबंधित इच्छुकांनी विस्तृत माहिती करिता खालील नमूद संकेतस्थळावर भेट द्यावी.

Portal https://amcakola.in

स्वा/-
शहर अभियंता
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमपा/विद्युत/१३४/२०२६, विद्युत विभाग
अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : २३/११/२०२६

अकोला महानगरपालिका, अकोला
विद्युत विभाग

निविदा सुचना क्र. ०३ (सन २०२६-२७) (दुसरी वेळ)

अकोला महानगरपालिकेच्या विद्युत विभागा मार्फत विशिष्ट नागरी सेवा सुविधा निधी (सन २०२४-२५) अंतर्गत प्रभाग क्रमांक १३ मध्ये शिवर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे सौंदर्यीकरण करणे या कामा करीता सार्वजनिक बांधकाम विभाग विद्युत महाराष्ट्र शासन यांचे कडे नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडुन निविदा मागण्यात येत आहे संबंधित इच्छुकांनी विस्तृत माहिती करिता खालील नमूद संकेतस्थळावर भेट द्यावी.

Portal https://amcakola.in

स्वा/-
शहर अभियंता
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./अमपा/विद्युत/१३३/२०२६, विद्युत विभाग
अकोला महानगरपालिका, अकोला.
दिनांक :-२३ / ११ /२०२६

जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार भारतीय स्टेट बँक यांच्या कडून श्री अविनाश मधुकर मनवर हे त्यांच्या मालकीचे मौजे काळी, ता. कारंजा (लाड), जि. वाशीम येथील शेत सर्वे / गट नंबर १७२, कृष्णा कॉलनी भाग २ मधील प्लॉट नंबर १० याचे एकंदर क्षेत्रफळ १३५.०० चौरस मीटर जागेवर कर्ज घेत आहे. परंतु सदर प्लॉटचा जुना खरेदीखताचे दस्त कारंजा दुय्यम निबंधक कार्यालया मध्ये नोंदविला असून त्याच दस्त क्र. २३२/२०२३ दिनांक १२/०१/२०२३ हा आहे, या मूळ खरेदीखताच्या दस्ता दिनांक १५/११/२०२६ रोजी श्री अविनाश मधुकर मनवर यांच्या राहते घरून म्हणजेच रा. पो. प्रियदर्शनी कॉलनी, कारंजा (लाड), ता. कारंजा (लाड), जि. वाशीम येथून गहाळ झाले असुन, त्या स्वरूपाची तक्रार श्री अविनाश मधुकर मनवर यांनी पोलीस स्टेशन कारंजा (शहर) ता. कारंजा (लाड), जि. वाशीम येथे दिनांक १५/११/२०२६ रोजी दिली असून त्याचा साना क्र. २९/२०२६ असा आहे.

तरी सदरहु वरील क्रमांकाचे मुळ खरेदीखताबाबत कोणाला कोणत्याही प्रकार दावा अथवा इतर अधिकार असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ८ दिवसाचे आंत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा जर विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही. सदरहु वरील वर्णनाच्या मुळ खरेदीखता दस्त कोणासही मिळाल्यास खालील नमुद पत्यावर ८ दिवसाचे आत आणुन देण्यात यावे याची नोंद घ्यावी. करीता ही जाहीर नोटीस.

सही
ॲड. व्ही. व्ही. ठाकरे
शॉप नं. एल १०, वर्धमान प्लाझा,
स्टेट बँक समोर, कारंजा (लाड), जि. वाशीम
मो. नं. ९७६६८८०७६४, ९१४६०४८३१४

शिक्का

करवाढी संदर्भात दुष्काळी परिस्थितीचा विचार करा

मालेगाव : दुष्काळी प्रसिद्धी असल्याने करवाडी संदर्भात पुनर्विचार करावा व लोकांचा कर कमी करावा अशी मागणी नगरपंचायतच्या नगरसेविका रजु गजानन काळे यांनी मुख्याधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. त्यात त्यानी असे नमूद केले आहे की नगर पंचायत मालेगाव येथे प्रशासकीय काळात करवाढीचा ठराव मंजूर करण्यात आलेला आहे. मात्र, सध्याची दुष्काळी परिस्थिती व सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक परिस्थिती विचारात घेता सदर करवाढीमुळे नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता आहे. तरी जनहिताच्या दृष्टीने प्रशासकीय काळात मंजूर झालेल्या करवाढीच्या विषयाचा नगर पंचायतमधील नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवक यांच्या सर्वसाधारण सभेत विषयपत्रिकेवर समावेश करून ठराव मांडण्यात यावा करवाढीचा पुनर्विचार करून योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

कलावंतानी दलालां पासून सावध राहावे -श्रावण जाधव

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

राजश्री शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजनेचा लाभ मिळवून देण्याच्या नांवावर काही दलाल गोरगरीब जनते कडून आर्थिक देवाणघेवाण करुन फसवणूक करत असल्याची बाब निदर्शनास येत आहे.

वाशिम जिल्ह्यात हि योजना अत्यंत पारदर्शकपणे राबविली जात असून योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थीनी कोणालाही सुद्धा पैसे देऊ नये व दलाला पासून सावध राहण्याचे आवाहन राजश्री शाहू महाराज कलावंत मानधन समीतीचे सदस्य श्रावण जाधव गुरुजी यांनी केले आहे

आपली 'कला हेच जिवन समजून' आयुष्यभर लोककलेला आयुष्य समर्पित करणाऱ्या जातिवंत आणि पारंपरिक लोककला साहित्य जपणाऱ्या लोक कलाकाराचा व जास्त वय असलेल्या वयोवृद्ध कलावंतांनाच



या योजनेच्या लाभासाठी प्राधान्य देण्यात येते मात्र योजनेचे निकष पूर्ण न करणाऱ्या नागरिकां लाभ मिळवून देण्याच्या भुलथापा देऊन

त्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण काही दलालांच्या माध्यमातून सुरू असल्याचा प्रकार उघडकीस येत आहे

राजश्री शाहू महाराज कलावंत मानधन सन्मान योजने मध्ये या अगोदर काही दलालांनी आर्थिक देवाणघेवाण करुन कलावंतांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे बरेच कलावंता कडून तुम्हाला योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी अनेक महिन्यां पासून कोणा कडुन सहा तर कोणा कडुन विस हजार रुपयां पर्यंतची रोख रक्कम घेतली परंतु ज्या कलावंतांनी अपेक्षेपोटी पैसे दिलेत त्यांची नावे फेब्रुवारी महिन्यात पार पडलेल्या समीतीच्या बैठकीत पात्र ठरली नाहीत त्यामुळे दलालांचे पितळ उघडे पडले असुन अनेक लाभार्थी दलालां कडे पैसे वापस देण्याचा तगादा लावत असतांना या मिटींगला टार्गेट कमी होते त्यामुळे तुमचे काम झाले नाही पुढच्या मिटींग मध्ये नक्की होणार म्हणून लाभार्थ्यांना भुलथापां देत असल्याचे समजते काही दलालांनी तर एका-एका गावांतुन ५० ते ६० जणां कडुन सहा ते विस हजार रुपयांची रक्कम सुध्दा जमा केल्याचा प्रकार घडल्याचे समोर येत आहे या दलालां पासून सावध राहुन त्यांच्या कोणत्याही भुलथापांना बळी न पडण्याचे आवाहन राजश्री शाहू महाराज कलावंत मानधन समीतीचे सदस्य श्रावण जाधव यांनी केले आहे.

आयआरएस अधिकारी समीर वानखेडे यांची आदर्श आपले सरकार सेवा केंद्राला सदिच्छा भेट



नागरिकांना शासकीय सेवा सुलभतेने आणि जलद गतीने उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या या केंद्राच्या कार्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून झालेले कौतुक केंद्राच्या टीमसाठी प्रेरणादायी ठरले.

आदर्श आपले सरकार सेवा केंद्र, तहसील कार्यालय, रिसोड.

■ प्रतिनिधी | रिसोड ■

भारतीय महसूल सेवेतील (IRS) अपर आयुक्त समीर वानखेडे यांनी रिसोड तहसील कार्यालय परिसरातील आदर्श आपले सरकार सेवा केंद्राला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी केंद्राच्या कामकाजाची पाहणी करून नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या विविध शासकीय सेवांची माहिती जाणून घेतली.

आदर्श आपले सरकार सेवा केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना जात प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, जात वैधता, नॉन क्रिमिलेअर, राजपत्र, रेशन कार्ड यांसह विविध शासकीय दाखले आणि ऑनलाइन सेवांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिला जात आहे. या भेटीदरम्यान समीर वानखेडे यांनी केंद्रातील सेवा व्यवस्था, कामकाजाची पद्धत आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सुविधांची माहिती घेतली. तसेच केंद्राच्या कामकाजाचे कौतुक केले. यावेळी केंद्र संचालक विशाल खडसे आणि केंद्र चालक रुपेश बाजड यांनी समीर वानखेडे यांचे स्वागत करून केंद्राच्या विविध उपक्रमांची व सेवा सुविधांची माहिती दिली.

कचरा व्यवस्थापनाच्या नावाखाली कोणाचे 'व्यवस्थापन'?



■ प्रतिनिधी | अकोट ■

शहरातील कचरा उचलायचा आहे की कंत्राटदारांची पात्रता तपासण्याच्या नावाखाली त्यांचीच साफसफाई करायची आहे? अकोट नगरपरिषदेच्या पावणे सात कोटींच्या घनकचरा व्यवस्थापन निविदेतील अटी-शर्ती पाहिल्यानंतर हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. शहराच्या स्वच्छतेसाठी ६ कोटी ७३ लाख रुपयांचा ठेका देण्याची प्रक्रिया सुरू झाली; मात्र निविदेतील अटींचा असा काही गुंता निर्माण झाला आहे की, प्रत्यक्ष कामापेक्षा कागदपत्रे आणि प्रमाणपत्रांचे ओझेच अधिक असल्याचे चित्र दिसत आहे. कचरा संकलन आणि वाहतुकीच्या कामासाठी IT/ITES एम्पॅनेलमेंटची सक्ती, RDF विल्हेवाट प्रमाणपत्र, प्री-बिड बैठकीतील अनिवार्य उपस्थिती, विविध तांत्रिक पात्रता निकष आणि निविदा भरण्यासाठी अवघे ११ दिवस! या अटींचा नेमका फायदा कोणाला होणार, हा आता लाखमोलाचा प्रश्न बनला आहे. निविदा खुल्या स्पर्धेसाठी की एखाद्या मर्जीतील कंत्राटदाराच्या सोयीसाठी, अशी चर्चा अकोटमध्ये रंगू लागली आहे.

नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागाने १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून शहरातील घरोघरी, हॉटेल, बाजारपेठ, भाजी मार्केट, मटण मार्केट, कत्तलखाना, आठवडी बाजार आणि सार्वजनिक परिसरातील कचरा संकलन, वाहतूक, वर्गीकरण व प्रक्रियेसाठी ही निविदा प्रसिद्ध केली आहे. शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी महत्त्वाचीच; पण त्यासाठी निविदेच्या अटींचा बडगा उगारून स्पर्धेचे मैदानच मर्यादित केले जात असेल, तर

पावणे सात कोटींची निविदा संशयाच्या भोव–यात

बायोमायनिंगचा हिशेब गुलदस्त्यात; नव्या ठेक्यात पुन्हा तोच 'कचरा'?

डंपिंग ग्राउंडवरील जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट लावल्याचा दावा करणाऱ्या बायोमायनिंग प्रकल्पाची चर्चा अद्याप थांबलेली नाही. संबंधित प्रकल्पात प्रत्यक्ष किती कचरा उपलब्ध होता, किती कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आली, किती कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली आणि त्यातून किती RDF तयार झाले, याचा संपूर्ण लेखाजोखा कागदपत्रांसह स्पष्ट होणे आवश्यक आहे. मात्र, मिळालेल्या माहितीनुसार मोजमाप, विल्हेवाट आणि RDF प्रमाणपत्रासह अनेक महत्त्वाची कागदपत्रे नगरपरिषदेच्या संबंधित विभागाकडे अद्याप सादर झालेली नाहीत.ष्वशेष म्हणजे, निविदेत नमूद केलेल्या कचऱ्याच्या क्षमतेपेक्षा हजारो मेट्रिक टन अतिरिक्त कचऱ्यावर प्रक्रिया केल्याचा दावा करीत संबंधित कंत्राटदाराने देयकाची मागणी केल्याची माहिती आहे. मग अतिरिक्त कचरा नेमका कुठून आला? त्याचे मोजमाप कोणी केले? प्रत्यक्ष प्रक्रिया झाल्याचे पुरावे कोणते? देयकाची मागणी करताना या बाबींची खातरजमा झाली का? हे प्रश्न प्रशासनाने स्पष्ट करणे गरजेचे आहे. जुन्या बायोमायनिंग प्रकल्पातील कागदपत्रे आणि प्रत्यक्ष कामाची पडताळणी पूर्ण झाली आहे का, याचा खुलासा न करता नव्या निविदेत RDF विल्हेवाट प्रमाणपत्राची सक्ती केली जात आहे. दुसऱ्यांसाठी नियमांचा बडगा आणि जुन्या कामाच्या हिशेबावर मौन, असे चित्र निर्माण होऊ नये. आधी जुन्या प्रकल्पाचा संपूर्ण लेखाजोखा जनतेसमोर ठेवा आणि मगच नव्या पावणे सात कोटींच्या ठेक्याचा कारभार पुढे न्या, अशी संतप्त प्रतिक्रिया यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

त्याचा जाब विचारला जाणारच! सार्वजनिक निधीतून होणाऱ्या कामात पारदर्शकता आणि समान संधी अपेक्षित असताना पात्रतेचे निकषच संशयाच्या भोवऱ्यात सापडणे ही बाब गंभीर आहे. यासंदर्भात नगर परिषदेची बाजू जाणून घेण्यासाठी मुख्याधिकारी यांना संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

कचरा उचलण्यासाठी IT कंपनीची पात्रता कशाला?

निविदेतील IT/ITES एम्पॅनेलमेंटची अट म्हणजे आश्चर्याचा धक्काच! प्रत्यक्ष काम कचरा संकलन, वाहतूक, वर्गीकरण आणि प्रक्रिया करण्याचे. मग माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील एम्पॅनेलमेंट प्रमाणपत्राची सक्ती कशासाठी? घनकचरा व्यवस्थापनाचा अनुभव, वाहने, मनुष्यबळ आणि प्रक्रिया करण्याची क्षमता याऐवजी IT क्षेत्रातील पात्रतेला इतके महत्त्व देण्यामागे नेमका तांत्रिक आधार कोणता? कोणत्या समितीने ही अट सुचविली? त्याचा अभ्यास अहवाल आहे का? की कंत्राटदारांच्या पात्रतेची चौकटच विशिष्ट पद्धतीने आखण्यात आली आहे? या प्रश्नांवर प्रशासनाने मौन सोडणे गरजेचे आहे.

प्रमाणपत्रांचा डोंगर; स्पर्धेचे मैदान आखूड!

तीन वर्षांचा घनकचरा व्यवस्थापनाचा अनुभव, ISO प्रमाणपत्र, आर्थिक उलाढाल, निव्वळ मूल्य, EPF, ESIC, PAN, PTRC, RDF विल्हेवाट प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्रे आणि PWD अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची नोंदणी अशा अटींची लांबलचक यादी निविदेत आहे. यातील प्रत्येक अट आवश्यक असल्याचे प्रशासनाला वाटत असेल, तर त्यामागील तांत्रिक कारण स्पष्ट करावे. मात्र, अटींच्या नावाखाली अनुभवी कंत्राटदारांनाच स्पर्धेपासून दूर ठेवण्याची वेळ आली, तर या निविदेच्या उद्देशावर प्रश्नचिन्ह निर्माण होणारच.

प्री-बिड बैठक की पात्रतेचा आणखी एक अडथळा?

निविदेपूर्व बैठकीला उपस्थित राहण्याची सक्ती करण्यात आली आहे. या बैठकीला सुमारे २३ ते २४ कंत्राटदार उपस्थित असल्याची माहिती आहे. मात्र, बैठकीत उपस्थित झालेल्या प्रश्नांची उत्तरे आणि प्रशासनाची भूमिका याबाबत काही कंत्राटदारांनी आक्षेप नोंदविले आहेत. निविदेतील अटींबाबत शंका विचारण्याचा

अटी-शर्तींचा असा काही 'खेळ' की स्पर्धेपूर्वीच कंत्राटदारांची छाटणी?

मर्जीतील ठेकेदारासाठीच निविदेचा घाट असल्याची चर्चा

अधिकार कंत्राटदारांना असताना बैठकीतील उपस्थितीच पात्रतेचा निकष बनविण्याची गरज काय, हा प्रश्नही अनुत्तरित आहे.

QR कोडपासून RDF पर्यंत कागदावरच शंभर टक्के?

दररोज १०० टक्के QR कोड स्कॅनिंग, कचऱ्याचे चार प्रकारांत वर्गीकरण, MRF केंद्राचे संचालन, RDF विल्हेवाट आणि ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट निर्मिती अशा अत्याधुनिक व्यवस्थेची जबाबदारी कंत्राटदारावर टाकण्यात आली आहे. ऐकायला सर्व काही छान! पण प्रत्यक्षात या कामाची पडताळणी कोण करणार?

QR कोड स्कॅनिंगची स्वतंत्र नोंद कोण ठेवणार?

कचऱ्याचे वजन आणि प्रक्रिया यांचा ताळमेळ कसा तपासणार? RDF ची विल्हेवाट अधिकृतरीत्या झाली की नाही, याची खातरजमा कोण करणार? केवळ निविदेतील आकर्षक तरतुदींनी शहर स्वच्छ होणार नाही; त्यासाठी सक्षम देखरेख आणि उत्तरदायित्व सुद्धा आवश्यक आहे.

दंडाचा बडगा मात्र आधीच तयार!

कामगारांनी गणवेश अथवा ओळखपत्र वापरले नाही तर महिन्याच्या बिलातून १० टक्के कपात, पर्यायी व्यवस्था केल्यास संपूर्ण खर्चासह अतिरिक्त १० टक्के दंड, दररोज १०० टक्के कचरा प्रक्रियेची सक्ती आणि सुरक्षा अनामतीच्या विविध अटी अशा तरतुदी करण्यात आल्या आहेत. कामात कसूर करणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे; परंतु त्यासाठीचे निकषही व्यवहार्य आणि प्रमाणबद्ध असावेत. एका बाजूला कंत्राटदारांवर दंडात्मक अटींचा भडिमार आणि दुसऱ्या बाजूला निविदेच्या अटींतील विसंगतींबाबत मौन, ही दुहेरी भूमिका नेमकी कोणासाठी आहे असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्ष १४ ■ अंक ३५७ ■ बुधवार २५ नोव्हेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

सहा संस्थांनी उचलले ५.०७२ दलघमी पाणी; धामचा साठा ४८.५१ वर

पाणी पाजता पाजता धामची पातळी घटली; आता काटकसरीची वेळ

वर्धा जनमाध्यम : जिल्ह्यात यंदा अल्पपर्जन्यमान झाल्याने जलसाठ्यांवर पाणीटंचाईचे सावट गडद होऊ लागले आहे. वर्धा शहरासह पिपरी (मेघे) आणि धाम नदीकाठच्या गावांची तहान भागविणाऱ्या महाकाळी येथील धाम प्रकल्पातील पाणीसाठाही झपाट्याने कमी होत आहे. जुलै ते २२ नोव्हेंबर या कालावधीत धाम प्रकल्पातून नदीपात्रात सोडलेल्या ७.१३ दलघमी पाण्यापैकी तब्बल ५.०७२ दलघमी पाण्याची सहा संस्थांनी उचल केली. नागरिकांची तहान भागविण्यासाठी हा पाणीवापर झाला असला, तरी आता जलाशयात केवळ ४८.५१ दलघमी पाणी शिल्लक आहे. जिल्ह्यात दमदार पाऊस होईपर्यंत हाच साठा पुरवायचा असल्याने आगामी काळात पाण्याचे नियोजन प्रशासनासाठी मोठे आव्हान ठरणार आहे. दुसरीकडे नदीपात्रातून सोडलेले पाणी जमिनीत मुरणे आणि तापमानामुळे त्याचे बाष्पीभवन होणे, यामुळे पाण्याची नासाडीही वाढत आहे. त्यामुळे यंदा पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याची वेळ आली असताना नागरिकांसह प्रशासनालाही काटकसरीचे धोरण स्वीकारावे लागणार आहे.

प्राप्त माहितीनुसार, महाकाळी येथील धाम प्रकल्पाची एकूण पाणी साठवण क्षमता ८७.६७ दलघमी असून, त्यात ९.९५ दलघमी मृत जलसाठ्याचा समावेश आहे. यातील १७.७८ दलघमी पाणी पिण्यासाठी, तर ६.४१ दलघमी पाणी औद्योगिक वापरासाठी आरक्षित आहे. सिंचनासाठीही या जलाशयातील पाणी राखीव ठेवण्यात आले आहे. मात्र, यंदा मान्सून काळात जिल्ह्यात अपेक्षित पाऊस झाला नाही. परिणामी, धाम प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरू शकला नाही. मान्सून काळात जलाशयात ७३.९८ दलघमी पाणीसाठा जमा झाला. पावसाळा संपल्यानंतर ही पातळी ५७.५० दलघमी नोंदविण्यात आली होती. आता त्यात आणखी घट होऊन सध्याचा साठा ४८.५१ दलघमीवर आला आहे.

भविष्यातील पाणीटंचाईचे संकट लक्षात घेता जिल्हा प्रशासनाने उपलब्ध जलसाठ्याचे नियोजन करताना सिंचनासाठी पाणी सोडण्याला दुय्यम प्राधान्य दिले आहे. जुलै ते २२ नोव्हेंबरदरम्यान धाम प्रकल्पातून नदीपात्रात एकूण ७.१३ दलघमी पाणी सोडण्यात आले. त्यापैकी ५.०७२ दलघमी पाणी वर्धा नगरपालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, रेल्वे विभाग, आंजी



ग्रामपंचायत, पवनार ग्रामपंचायत आणि औद्योगिक वसाहत वर्धा या सहा संस्थांनी उचलले. या पाण्याचा वापर नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी करण्यात आला. याशिवाय विविध उद्योगांनी औद्योगिक वापरासाठी १.०८ दलघमी पाण्याची उचल केली आहे.

वर्धा शहरासह परिसरातील गावांची तहान भागविण्यासाठी धाम प्रकल्प महत्त्वाचा जलस्रोत आहे. मात्र, उपलब्ध पाणीसाठा आणि आगामी उन्हाळ्यातील संभाव्य मागणी यांचा ताळमेळ घालणे आता आवश्यक झाले आहे. पावसाळा सुरू होईपर्यंत पाणी पुरवायचे असल्याने प्रशासनाला पुरवठ्याचे वेळापत्रक बदलण्याची तयारी करावी लागत आहे. पाणीटंचाईचे संकट दारात उभे असताना नागरिकांनीही पाण्याचा अपव्यय टाळून उपलब्ध जलसाठ्याचे महत्त्व ओळखण्याची गरज निर्माण झाली आहे.

पाणी पुरवठ्याच्या वेळापत्रकाला कात्री

धाम प्रकल्पातील मर्यादित जलसाठा लक्षात घेता आगामी काळात वर्धा नगरपालिका आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणीपुरवठ्याच्या वेळापत्रकात मोठे बदल होण्याची शक्यता आहे. वर्धा नगरपालिका येळाकेळी आणि पवनार येथून, तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण येळाकेळी येथील धाम नदीपात्रातून पाणी उचलून नागरिकांना पुरवठा करते. मात्र, उपलब्ध साठा पुढील पावसाळ्यापर्यंत टिकविण्याचे आव्हान असल्याने जिल्हा प्रशासनाकडून पाण्याचे काटेकोर नियोजन केले जात आहे. त्यामुळे नागरिकांच्या नळाला पाणी येण्याच्या वेळेत किंवा पुरवठ्याच्या कालावधीत कपात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

नदीपात्रात सोडलेले पाणीही जाते वाया धाम प्रकल्पातून नदीपात्रात सोडण्यात येणारे पाणी केवळ मानवी वापरासाठीच नव्हे, तर वन्यजीवांची तहान भागविण्यासाठीही उपयुक्त ठरते. मात्र, अल्पपर्जन्यमानामुळे जमिनीतील ओलावा कमी झाला आहे. परिणामी, नदीपात्रातून सोडलेले पाणी मोठ्या प्रमाणात जमिनीत मुरते, तर वाढत्या तापमानामुळे काही पाण्याचे बाष्पीभवन होते. त्यामुळे प्रत्यक्ष उचल आणि वापरापर्यंत पाण्याचे नुकसान होत आहे. मर्यादित जलसाठ्याच्या पार्श्वभूमीवर हा मुद्दा पाणी नियोजनासाठी चिंतेचा ठरत आहे.

पोलीस चौक्यांचा घाट घालता, आधी पोलिसांची भरती तरी करा

आष्टी तालुक्यात नवीन चौक्यांचे नियोजन : विद्यमान ठाण्यांतच मनुष्यबळाचा ठणठणाट, कर्मचारी आणणार कोठून?

इमारती उभारून नागरिकांना सुरक्षा मिळणार की फक्त फलकांची शोभा वाढणार रिक्त पदे भरण्याची मागणी जोरात

आष्टी शहीद जनमाध्यम- एकीकडे आष्टी तालुक्यातील पोलीस ठाण्यांमध्ये कर्मचाऱ्यांची कमतरता, तर दुसरीकडे नवीन पोलीस चौक्या उभारण्याचा घाट! आधीच उपलब्ध मनुष्यबळावर कायदा व सुव्यवस्थेचा गाडा ओढताना पोलिसांची दमछाक होत असताना नव्या चौक्यांसाठी कर्मचारी आणणार कोठून, हा कळीचा प्रश्न निर्माण झाला आहे. चौक्यांच्या इमारती उभारण्यापेक्षा त्या चालविण्यासाठी पोलीस कर्मचारी उपलब्ध करून देण्याची इच्छाशक्ती प्रशासनाने दाखवावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. पोलीस चौक्या वाढविण्यापूर्वी पोलिसांची संख्या वाढवा, असा संतप्त सूर आता उमटू लागला आहे.

आष्टी तालुक्यात आष्टी आणि तळेगाव अशी दोन पोलीस ठाणी कार्यरत आहेत. या दोन्ही पोलीस ठाण्यांच्या कार्यक्षेत्रात अनेक गावे येतात. ग्रामीण भागातील कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्ह्यांचा तपास करणे, अवैध धंद्यांवर कारवाई करणे, नियमित गस्त घालणे आणि नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करणे, अशा अनेक जबाबदाऱ्या पोलिसांवर आहेत. मात्र, दोन्ही पोलीस ठाण्यांमध्ये मनुष्यबळाची कमतरता असल्याची बाब वारंवार समोर येत आहे. उपलब्ध कर्मचाऱ्यांनाच अनेक आघाड्यांवर काम करावे लागत असल्याने पोलिसांवरील कामाचा ताण वाढत आहे. अशा परिस्थितीत तालुक्यात नवीन पोलीस चौक्या सुरू करण्याची चर्चा पुढे येत आहे. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस चौक्या आवश्यक असतील, तर त्याचे स्वागतच; मात्र त्या चालविण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ नसेल तर या चौक्यांचा उपयोग काय केवळ इमारती बांधून, उद्घाटन करून आणि फलक लावून गुन्हेगारीला आळा बसणार आहे काय की कागदोपत्री पोलीस यंत्रणेचा विस्तार दाखविण्यापुरतच हे नियोजन मर्यादित राहणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

विद्यमान ठाण्यांचे मनुष्यबळ कापून नवीन चौक्या भरणार काय

नवीन पोलीस चौक्या सुरू झाल्यानंतर तेथे अधिकारी आणि कर्मचारी नियुक्त करावे लागतील. त्यासाठी स्वतंत्र पदे मंजूर झाली आहेत काय नवीन भरती होणार आहे की आष्टी आणि तळेगाव पोलीस ठाण्यांमधील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करून चौक्या सुरू केल्या जाणार आहेत? याबाबत कोणतीही स्पष्टता दिसत नाही. विद्यमान ठाण्यांमधूनच कर्मचारी कमी करून नवीन चौक्या भरल्या गेल्या, तर आधीच अपुऱ्या मनुष्यबळावर चालणाऱ्या पोलीस ठाण्यांचा कारभार आणखी कोलमडण्याची भीती आहे.

अवैध धंदे फोफावले तर जबाबदार कोण

ग्रामीण भागात अवैध धंद्यांच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. अशा धंद्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमित गस्त, गोपनीय माहिती संकलन आणि तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता असते. मात्र, कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असेल तर प्रत्येक गावात पोलिसांची प्रभावी उपस्थिती कशी राहणार एका बाजूला अवैध धंद्यांवर कारवाईची अपेक्षा आणि दुसऱ्या बाजूला अपुरे मनुष्यबळ, अशा कात्रीत पोलीस यंत्रणा सापडली आहे. याचा थेट परिणाम ग्रामीण भागातील नागरिकांच्या सुरक्षिततेवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पोलीस चौक्या हव्यात, पण आधी पोलिसांना बळ द्या

नवीन पोलीस चौक्या उभारण्यास कोणाचाही विरोध नाही. उलट ग्रामीण भागातील नागरिकांना जवळच पोलीस मदत मिळणे ही काळाची गरज आहे. मात्र, चौकी म्हणजे केवळ चार भिंती नव्हेत. तेथे चोवीस तास उपलब्ध राहणारे कर्मचारी, तक्रारींची दखल घेणारी यंत्रणा, नियमित गस्त आणि गुन्हेगारांवर कारवाई करण्याची क्षमता असणे आवश्यक आहे. अन्यथा चौकीच्या इमारती उभ्या राहतील; पण नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न तसाच कायम राहील.

हप्तेखोरी थांबली तरच अवैध धंद्यांना लगाम

आष्टी तालुक्यातील अवैध व्यवसायांना आळा घालायचा असेल, तर केवळ नवीन पोलीस चौक्या उभारून उपयोग नाही. हप्तेखोरीच्या संशयाला पूर्णविराम देत अवैध धंद्यांविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेणे गरजेचे आहे. अवैध व्यवसायांना कोणाचेही अभय मिळता कामा नये. पोलिसांची मानसिकता बदलून हप्तेखोरीला थारा न देता प्रामाणिकपणे कारवाई झाली, तरच अवैध धंदे बंद होतील आणि सामान्य नागरिकांना दिलासा मिळेल.

गिरडमध्ये दोन कारची जोरदार टक्कर 'महाराष्ट्र शासन'च्या पाटीने खळबळ

२०० मीटरपर्यंत फरफट, चिमुकल्यासह चौघे गंभीर

डगिरड जनमाध्यम हिंगणघाट-उमरेड मार्गावरील गिरड येथे दोन कारची समोरासमोर झालेली भीषण धडक आणि त्यानंतर अपघातग्रस्त इन्होवा कारवर आढळलेली 'महाराष्ट्र शासन'ची पाटी यामुळे परिसरात चर्चेला उधाण आले आहे. संत गजानन महाराज महाविद्यालयाजवळ मंगळवारी (ता. २४) दुपारी दोन वाजताच्या सुमारास झालेल्या या अपघातात एका वर्षाच्या चिमुकल्यासह चौघे गंभीर जखमी झाले, तर अन्य तिघांना किरकोळ दुखापत झाली. धडकेची तीव्रता इतकी भीषण होती की दोन्ही कार सुमारे २०० मीटर अंतरापर्यंत फरफटत गेल्या. मात्र, इन्होवा कारवर शासकीय पाटी नेमकी कोणत्या कारणाने लावण्यात आली होती, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.

नागपूर जिल्ह्यातील बोरखेडी येथील निखिल कमलाकर अराडे (३३), साक्षी सचिन चिकणकर (२३), प्रतिभा सुरेश ढोके (४४) आणि एक वर्षाचा हवित सचिन चिकणकर हे स्विफ्ट डिझायर (एमएच ३२ वाय ५२४४) कारने



गिरडहून बोरखेडीच्या दिशेने जात होते. दरम्यान, संत गजानन महाराज महाविद्यालयाजवळ समुद्रपूरकडून खुर्सापारकडे जाणाऱ्या इन्होवा (एमएच ४९ सीडब्ल्यू ०१७२) कारने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. धडकेनंतर इन्होवा कार रस्त्यालगतच्या झाडावर जाऊन आदळली.

या भीषण अपघातात स्विफ्टमधील निखिल अराडे, साक्षी चिकणकर, प्रतिभा ढोके आणि चिमुकला हवित गंभीर जखमी झाले. तर इन्होवा कारमधील चालक संदेश मेश्राम (२७) आणि रोशन रामकृष्ण ठाकरे (३०) किरकोळ जखमी झाले. पवन रूपचंद राऊत हा सुदैवाने बचावला.

अपघाताची माहिती मिळताच गिरड पोलीस ठाण्याचे ठाणेदार विकास गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक गोमेद पाटील, दत्ता मोरे आणि जयपाल सूर्यवंशी यांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने गिरड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर गंभीर जखमी असलेल्या चौघांना पुढील उपचारासाठी सेवाग्राम रुग्णालयात पाठविण्यात आले.

इन्होवावरील पाटीने वाढवले गूढ- या अपघातानंतर सर्वाधिक चर्चा सुरू झाली ती इन्होवा कारवरील लाल अक्षरांत लिहिलेल्या 'महाराष्ट्र शासन' या पाटीची. खासगी नोंदणी असलेल्या या वाहनावर शासकीय ओळख दर्शविणारी पाटी कोणत्या अधिकाराने लावण्यात आली होती, हे वाहन कोणत्या शासकीय विभागाच्या अधिकारी अथवा कर्मचाऱ्याच्या वापरात होते, की शासकीय पाटीचा अनधिकृत वापर केला जात होता? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. मात्र, वाहनाच्या मालकीबाबत किंवा शासकीय वापराबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

ठाणेदार विकास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली गिरड पोलीस अपघाताचा तपास करीत आहेत. अपघाताचे नेमके कारण, वाहनांचा वेग आणि इन्होवावरील शासकीय पाटीचे रहस्य तपासातूनच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे या अपघातातील जखमींच्या प्रकृतीसोबतच 'महाराष्ट्र शासन'च्या पाटीमागचे सत्य काय, याकडेही परिसराचे लक्ष लागले आहे.

कोट्यवधींची योजना, देखरेख मात्र वाऱ्यावर आष्टीत पाणी योजनेचा सावळागोंधळ

३३ कोटींची पाणीपुरवठा योजना अभियंत्यांविना रामभरोसे

आष्टी शहीद जनमाध्यम- शहरवासीयांना मुबलक आणि नियमित पाणीपुरवठा करण्याच्या उद्देशाने मंजूर झालेली तब्बल ३३ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना सध्या नियोजनशून्य कारभाराच्या विळख्यात अडकली आहे. दोन वर्षांचा कालावधी उलटूनही योजनेचे काम पूर्णत्वास गेलेले नाही. त्यातच प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी अनुभवी अभियंत्याची उपस्थिती नसल्याचे चित्र असून, पाईपलाईनचे काम तांत्रिक देखरेखीशिवाय सुरू असल्याचा आरोप होत आहे. एकीकडे कोट्यवधींचा निधी खर्ची पडत असताना दुसरीकडे खोदलेले रस्ते, उघड्या पाईपलाईन आणि अपुऱ्या कामांमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे ३३ कोटींच्या योजनेचा कारभार नेमका कोणाच्या भरवशावर सुरू आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

आष्टी हे तालुक्याचे ठिकाण असून नगरपंचायत क्षेत्रातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी ही महत्त्वाकांक्षी योजना मंजूर करण्यात आली. अप्पर वर्धा धरणाच्या पिलापूर-येणाडा परिसरात पाण्याच्या टाकीची उभारणी करण्यात येत आहे. मात्र, दोन वर्षांनंतरही या टाकीचे काम पूर्ण झालेले नाही. पाईपलाईन टाकण्याचे कामही अत्यंत संथगतीने सुरू असल्याने योजनेच्या पूर्णत्वाबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे.

शहरातील अनेक भागांत रस्ते खोदून पाईपलाईन टाकण्यात आली. मात्र, काही ठिकाणी पाईपला आवश्यक बुश लावण्यात आले नसल्याची बाब समोर येत आहे. काही ठिकाणी पाईप उघड्यावर सोडून मजूर निघून जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अनेक भागांत पाईपलाईन टाकूनही नवीन नळजोडण्या करण्यात आलेल्या नाहीत. विशेष म्हणजे, दोन वर्षांपासून संथगतीने सुरू असलेले काम आता पुन्हा खोदकामाच्या नव्या फेऱ्यात अडकले आहे. त्यामुळे योजनेचे



नियोजन नेमके कसे करण्यात आले, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

खोदलेले रस्ते नागरिकांच्या जीवावर- रहदारीच्या रस्त्यांवर खोदकाम करताना सूचना फलक, सुरक्षिततेची साधने आणि पर्यायी मार्गांची व्यवस्था करणे आवश्यक असते. मात्र, अनेक ठिकाणी कोणतेही सूचना फलक लावलेले दिसत नाहीत. दिवसभर खोदकाम करून सायंकाळी पाच वाजता मजूर निघून जातात आणि खोदलेले रस्ते तसेच उघडे राहतात. परिणामी दुचाकीस्वार, वाहनचालक आणि पादचाऱ्यांना अपघाताचा धोका पत्करून मार्गक्रमण करावे लागत आहे. रात्रीच्या वेळी तर हे उघडे खड्डे अधिक धोकादायक ठरत आहेत.

अभियंता कुठे देखरेख कोणाची- पाईपलाईन टाकताना जुन्या नळजोडण्या तुटणे, सिमेंट रस्त्यांचे खोदकाम आणि तांत्रिक अडचणी निर्माण होणे स्वाभाविक आहे. मात्र, अशा वेळी अनुभवी अभियंत्याचे मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष उपस्थिती अत्यंत महत्त्वाची असते. कामाच्या ठिकाणी जबाबदार अभियंता दिसत नसल्याने कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. पाईपलाईनची जोडणी, बुश बसविणे आणि खोदकामानंतर रस्त्यांची दुरुस्ती या कामांची तपासणी कोण करीत आहे, याचे उत्तर नागरिकांना मिळत नाही.

दरम्यान, संबंधित शासकीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देऊन पाहणी करणे अपेक्षित असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. आष्टी शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सोनू भार्गव यांनी पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या असहकार्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क होऊ शकला नसल्याचे त्यांनी सांगितले.

३३ कोटींचा निधी, पण जबाबदारी घेणार कोण

दोन वर्षांपासून रखडलेल्या या योजनेमुळे नागरिकांच्या अपेक्षांवर पाणी फिरण्याची वेळ आली आहे. कामाचा दर्जा तपासला जात आहे का? तांत्रिक मंजुरीनुसार काम सुरू आहे का? खोदकामानंतर रस्ते पूर्ववत करण्याची जबाबदारी कोणाची? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, या संपूर्ण योजनेवर प्रत्यक्ष नियंत्रण कोणाचे आहे? असे प्रश्न आता ऐरणीवर आले आहेत.

जाहीर नोटीस

माझे अशील श्री. सुधीर ज्ञानेश्वर डोरले व सौ. रिटा सुधीर डोरले हे मौजा बोरगाव मेघे, मौजा क्र. १००, पी. एच. क्र. १९, तहसील व जिल्हा वर्धा येथील ग्रामपंचायत बोरगाव मेघे हद्दीतील शेत सर्व्हे क्र. ९९ मधील प्लॉट क्र. १५, क्षेत्रफळ १३५.०० चौ. मी. म्हणजेच १४५३.०० चौ. फूट या मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत. सदर मिळकतीच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेत.

पूर्वेस : लेआऊट रोड
पश्चिमेस : प्लॉट क्र. २२,
उत्तरेस : प्लॉट क्र.१६,
दक्षिणेस : प्लॉट क्र. १४,

सदर प्लॉट क्र. १५, क्षेत्रफळ १३५.०० चौ. मी. म्हणजेच १४५३ चौ. फूट ही मिळकत मालिनी पुरुषोत्तम ठाकरे, शुभम संजय एकापुरे, अमृता संजय एकापुरे व संजय संतोष एकापुरे यांनी माझे अशील श्री. सुधीर ज्ञानेश्वर डोरले व सौ. रिटा सुधीर डोरले यांना दिनांक २०/०२/२०२४ रोजी दस्त क्र. ७५१/२०२४ अन्वये दुय्यम निबंधक, वर्धा यांचे कार्यालयात नोंदणीकृत विक्रीखताद्वारे विक्री केली आहे. त्यानंतर माझ्या अशिलांनी सदर मिळकतीबाबत फेरफार नोंद क्र. १६२६२दिनांक २१/०१/२०२५अन्वये महसूल अभिलेखात आपली नावे नोंदवून घेतलेली आहेत.

माझे अशील श्री. सुधीर ज्ञानेश्वर डोरले व सौ. रिटा सुधीर डोरले यांचे सदर मिळकतीच्या पूर्वीच्या मालकी हक्काशी संबंधित श्री. रविंद्र भोजराज उगेमुगे यांचे दिनांक २७/११/२०१३ रोजीचे नोंदणीकृत विक्रीखत, दस्त क्र. ८४५०/२०१३ हे मूळ दस्तऐवज हरवलेले आहेत. सदर मूळ विक्रीखत हरविल्याबाबत माझ्या अशिलांनी पोलीस ठाण्यात तक्रार (एफ.आय.आर) दाखल केलेली आहे.

माझ्या अशिलांनी सदर मिळकतीवर द टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमीटेड यांच्याकडून कर्ज घेण्याकरिता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी, सर्व जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद मिळकतीबाबत किंवा सदर व्यवहारांबाबत कोणत्याही व्यक्तीचा कोणत्याही प्रकारचा हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, हरकत, बोजा, तारण, गहाण, लियन, अन्य भार किंवा कायदेशीर अधिकार असल्यास अथवा हरवलेले मूळ विक्रीखत कोणास मिळून आल्यास, त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांच्या आत आपला लेखी दावा अथवा हरकत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर आवश्यक कागदपत्रांसह सादर करावी.निर्धारित मुदतीत कोणतीही लेखी हरकत किंवा दावा प्राप्त न झाल्यास, सदर मिळकतीबाबत कोणाचाही दावा अथवा हरकत नाही असे समजून माझे अशील व कर्ज देणारी वित्तीय संस्था पुढील कायदेशीर कार्यवाही करतील. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही दाव्याची अथवा हरकतीची दखल घेतली जाणार नाही.

ॲड. आर. आर. तिवारी
रामनगर, वर्धा.
मो.९९२२४२६१६८

नावात बदल

माझे पूर्वी PRAVEEN AJAJ KHAN असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील PARVIN AJAJ KHAN नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे. पत्ता: शिवाजी नगर नालवाडी वर्धा ४४२००१

तुळशी विवाहानंतर आजपासून लग्नसराईचा बार उडणार

विवाह सोहळ्यांची धूम; मंगल कार्यालये, लॉन्स, हॉटेल्सच्या बुकिंगला वेग

वर्धा प्रतिनिधीतुळशी विवाहाचा मंगल सोहळा संपताच आता सर्वत्र लग्नसराईची धामधूम सुरू होणार आहे. आज २५ नोव्हेंबरपासून विवाह मुहूर्तांना सुरुवात होत असून, घराघरांत सनई-चौघड्यांचे सूर घुमणार आहेत. वधू-वरांच्या कुटुंबीयांमध्ये लग्नाच्या तयारीची लगबग सुरू झाली असून, मार्च २०२७ पर्यंत विवाहासाठी अनेक शुभ तारखा उपलब्ध आहेत. त्यामुळे आगामी चार महिन्यांत जिल्ह्यात विवाह सोहळ्यांची मोठी रेलचेल पाहायला मिळणार आहे.

यंदाच्या लग्नसराईत डिसेंबर महिना सर्वाधिक गजबजलेला राहण्याची शक्यता आहे. डिसेंबरमध्ये १५, फेब्रुवारीमध्ये १४ तर मार्चमध्ये १२ विवाह मुहूर्त असल्याने या काळात विवाह सोहळ्यांची मोठी धूम राहणार आहे. अनेक कुटुंबांनी विवाहाच्या तारखा निश्चित करण्यास सुरुवात केली असून, काही ठिकाणी लग्नपत्रिका छपाई, खरेदी आणि पाहुण्यांच्या स्वागताची तयारीही सुरू झाली आहे. लग्नाच्या तारखा निश्चित होताच मंगल कार्यालये, लॉन्स, हॉटेल्स, केटरिंग, फुलांची सजावट, फोटोग्राफी, व्हिडिओग्राफी, बँडपथक आणि इतर विवाहविषयक सेवांसाठी बुकिंग सुरू झाले आहे. विवाह सोहळ्यांसाठी चांगली व्यवस्था मिळावी म्हणून कुटुंबीयांकडून आधीच नियोजन केले जात आहे. विशेषतः डिसेंबर महिन्यात विवाह मुहूर्तांची संख्या अधिक असल्याने मंगल कार्यालये आणि लॉन्सच्या बुकिंगसाठी धावपळ होण्याची



शक्यता आहे. लग्नसराईमुळे बाजारपेठेतही चैतन्य निर्माण होणार आहे. कपडे, दागिने, संसारोपयोगी वस्तू, भेटवस्तू, सजावटीचे साहित्य आणि लग्नासाठी लागणाऱ्या विविध वस्तूंच्या खरेदीला वेग येणार आहे. सोनार, कापड व्यावसायिक, फुलविक्रेते, केटरर्स, मंडप व्यावसायिक, बँडपथक, छायाचित्रकार आणि वाहन व्यावसायिकांनाही या हंगामातून व्यवसायाची संधी मिळणार आहे. विवाह सोहळ्यांमुळे बाजारपेठेतील आर्थिक उलाढाल वाढण्याची अपेक्षा आहे.

यंदा सिंहस्थ काळाच्या पार्श्वभूमीवर विवाह मुहूर्तांचे अत्यावश्यक, आपत्कालीन आणि शुद्ध असे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे विवाहाची तारीख निश्चित करताना कुटुंबीयांकडून पंचांग आणि मुहूर्तांची माहिती घेतली जात आहे. सिंहस्थ काळातील काही विशिष्ट कालावधीतील मुहूर्त आपत्कालीन, तर योग्य कालावधीतील मुहूर्त शुद्ध म्हणून निश्चित करण्यात आले आहेत. त्यामुळे विवाह सोहळ्याचे नियोजन करताना मुहूर्ताला विशेष महत्त्व दिले जात आहे.

विवाहाचे शुभ मुहूर्त

जानेवारी २०२७ : २७, २९
फेब्रुवारी २०२७ : २, ३, १०, ११, १२, १५, १६, २१, २२, २३, २४, २५, २७, २८
मार्च २०२७ : २, ४, १०, ११, १४, २०, २३, २४, २५, २७, २९, ३१

विवाहाची तारीख निश्चित करण्यापूर्वी स्थानिक पंचांगानुसार मुहूर्ताची खातरजमा करावी.

विरुळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात चपराशीच नाही

विरुळ आकाजी जनमाध्यम शेतकऱ्यांच्या पशुधनाला वेळेवर उपचार मिळावेत म्हणून उभारलेल्या विरूळ येथील पशुवैद्यकीय दवाखान्याची अवस्था कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे दयनीय झाली आहे. चपराशाचे पद रिक्त असल्याने जनावरांवर उपचार करण्याऐवजी डॉक्टरांनाच दवाखान्याची साफसफाई करावी लागत असल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. मग पशुधनाची काळजी घेणार कोण, असा प्रश्न पशुपालक उपस्थित करीत आहेत.आर्वी तालुक्यातील विरूळ येथे पशुवैद्यकीय श्रेणी एकचा सुसज्ज दवाखाना आहे. विरूळसह रसुलाबाद, सोरटा, सालफळ, पिंपळगाव, वडाळा, हुसेपूर, बोरी, बार्हा, निजामपूर, टाकळी, रामपूर, कृष्णापूर, पाचोड, खैरी, टेंभरी, परसोडी आदी गावांतील पशुपालक या दवाखान्यावर अवलंबून आहेत. परिसरात पशुधनाची संख्या मोठी असतानाही पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नाही.अनेक दिवस डॉक्टरच नसल्याने दवाखाना बंद ठेवण्याची वेळ आली होती. नागरिकांच्या मागणीनंतर सात ते आठ महिन्यांपूर्वी डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली. मात्र, नियुक्त डॉक्टरांनाही पुलगाव आणि नांदपूर येथील अतिरिक्त प्रभारी जबाबदारी देण्यात आली आहे. सहाय्यक डॉक्टर तीन दिवस विरूळ तर तीन दिवस नांदपूर येथे सेवा देतात.

■ बुधवार २५ नोव्हेंबर २०२६
paper www.janmadhyam.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

'ड्रॅगन पॅलेस टेम्पल'मुळे नागपूरची जागतिक स्तरावर ओळख-मुख्यमंत्री







■ 'ड्रॅगन पॅलेस टेम्पल'चा वर्धापनदिन आणि महोत्सवाचे उद्घाटन ■ भारत-जपानच्या सांस्कृतिक व धम्मविषयक संबंधांचा गौरव

नागपूर/प्रतिनिधी- भगवान गौतम बुद्धांनी जगाला प्रज्ञा, करुणा आणि शील याचा संदेश दिला. त्यांच्या विचारांवर आधारित बौद्ध धम्म आज जगभर पोहोचला असून, जपानसह अनेक देशांमध्ये बौद्ध धर्माचे अनुयायी मोठ्या संख्येने आहेत. भारत आणि जपान यांच्यात राजकीय संबंधांसोबतच सांस्कृतिक आणि वैचारिक नातेदेखील दृढ आहे. नागपूरची पवित्र दीक्षाभूमी आणि 'ड्रॅगन पॅलेस टेम्पल'मुळे शहराला जागतिक स्तरावर बौद्ध धम्माचे महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून ओळख मिळत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

कामठी येथील 'ड्रॅगन पॅलेस टेम्पल' परिसरात २७ वा वर्धापन दिन कार्यक्रम आणि महोत्सवाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी 'धम्मभूमी ड्रॅगन पॅलेस टेंपल' या स्मरणिकेचे प्रकाशन तसेच विविध विकासकामांचा डिजिटल पद्धतीने शुभारंभ त्यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ओगावा सोसायटीच्या अध्यक्षा तथा माजी राज्यमंत्री सुलेखा कुंभारे, इंटरनॅशनल निचिरेन-शू फेलोशिप असोसिएशनचे अध्यक्ष भंते कानसेन मोचिदा, टोकियो (जपान) येथील मिनोबुसान कुओंजी टेम्पलचे व्हेनेरेबल तायवेन आओयामा, बुद्धगया येथील महाबोधी विहाराच्या इंटरनॅशनल त्रिपिटक चॅटिंग सेरेमनीच्या मुख्य संरक्षक वांगमो डिक्सी, आमदार डॉ. राजीव पोतदार, माजी आमदार जोगेंद्र कवाडे, यांच्यासह जपान येथील बौद्ध भिक्षू संघाच्या प्रतिनिधींची विशेष उपस्थिती होती.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भगवान गौतम बुद्धांनी प्रज्ञा, ज्ञान आणि करुणेच्या माध्यमातून मानवतेला नवा विचार दिला. प्रेम, करुणा आणि बंधुतेचा संदेश देणारे त्यांचे विचार आज जगभर स्वीकारले जात आहेत. भारत आणि जपान यांच्यातील संबंधांमध्येही भगवान गौतम बुद्धांच्या विचारांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.नागपूरला दीक्षाभूमीची पवित्र परंपरा लाभली आहे. त्यासोबतच ड्रॅगन पॅलेस टेम्पलने नागपूरची ओळख जागतिक स्तरावर पोहोचविण्याचे कार्य केले आहे. 'सेव्हन वंडर्स ऑफ लँड' ही संकल्पना पुढे येत असून, यामुळे जगभरातील बौद्ध अनुयायी आणि पर्यटक नागपूरकडे आकर्षित होतील. ड्रॅगन पॅलेस टेम्पलच्या नावाने स्थानिक परिसरातील मेट्रो स्थानकाला देण्यात आलेली ओळखही या स्थळाचे महत्त्व अधोरेखित करणारी आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ओगावा सोसायटीच्या अध्यक्षा तथा माजी राज्यमंत्री सुलेखा कुंभारे यांनी केले. त्यांनी ड्रॅगन पॅलेस टेम्पलच्या २७ वर्षांच्या वाटचालीची आणि धम्मप्रसाराच्या कार्याची माहिती दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ड्रॅगन पॅलेस टेम्पल परिसराच्या विकासासाठी दिलेल्या योगदानाचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला व मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. राज्य शासनाच्या वतीने दिलेल्या आर्थिक मदतीच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध विकास कार्यांची त्यांनी यावेळी माहिती दिली. सोहळ्याला विविध क्षेत्रांतील मान्यवर, बौद्ध धम्माचे अनुयायी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शासकीय कार्यालयांतील व्हॉट्सअप वेबच्या वापराबाबत गृह मंत्रालयाचा सतर्कतेचा इशारा

गोपनीय शासकीय माहितीच्या देवाणघेवाणीसाठी व्हॉट्सअप वेबचा वापर टाळा

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : शासकीय कार्यालयांमध्ये संगणकावरून व्हॉट्सप वेबचा वापर करताना अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन केंद्रीय गृह मंत्रालयाने केले आहे. व्हॉट्सप वेबच्या लॉगिन सत्राचा गैरवापर करून वापरकर्त्यांच्या खात्यांमध्ये अनधिकृत प्रवेश मिळविण्याचा धोका भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राच्या (I4C) राष्ट्रीय सायबर गुन्हे धोका विश्लेषण विभागाने अधोरेखित केला आहे. या पार्श्वभूमीवर गृह मंत्रालयाने सायबर सुरक्षेबाबत सतर्कतेचा इशारा दिला आहे.

व्हॉट्सप वेबच्या लॉगिन सत्रावर सायबर गुन्हेगारांनी अनधिकृत ताबा मिळवल्यास संबंधित खात्यातील संदेश वाचणे, वापरकर्त्याच्या नावाने संदेश पाठविणे, संपर्क क्रमांक आणि ग्रुपमधील संभाषणांची माहिती मिळविणे शक्य होते. अशा प्रवेशाचा वापर करून शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांची ओळख धारण करणे, आर्थिक फसवणूक करणे, फिशिंगद्वारे माहिती मिळविणे तसेच अन्य सायबर गुन्हे घडविण्याचा धोका आहे.शासकीय कामकाजाशी संबंधित कागदपत्रे, प्रशासकीय माहिती, आर्थिक व्यवहारांचा तपशील, गोपनीय पत्रव्यवहार आणि संभाव्य सायबर घुसखोरीची लक्षणे असू शकतात. त्यामुळे अशा बाबींकडे दुर्लक्ष न करता तातडीने आवश्यक

अनधिकृत प्रवेश, माहितीची चोरी आणि सायबर फसवणुकीचा धोका

अधिकारी-कर्मचाऱ्यांना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन

माहितीची देवाणघेवाण व्हॉट्सप वेबद्वारे करू नये, असा स्पष्ट सल्ला देण्यात आला आहे. कार्यालयीन संगणकावर व्हॉट्सप वेबचे लॉगिन कायमस्वरूपी सुरू ठेवू नये. प्रत्येक वापरानंतर खात्यातून लॉगआऊट करणे आवश्यक आहे. तसेच सार्वजनिक संगणक, सायबर कॅफे, हॉटेलमधील बिझनेस सेंटर किंवा अविश्वसनीय संगणकांवरून व्हॉट्सप वेब वापरणे टाळावे.

संशयास्पद हालचालींकडे लक्ष देण्याचे निर्देश- व्हॉट्सप खात्यावरून आपल्या नकळत संदेश पाठविले जाणे, संपर्क व्यक्तींकडून अनपेक्षित प्रतिसाद मिळणे किंवा खात्यात अन्य संशयास्पद हालचाली आढळणे, ही खबरदारी घ्यावी. कार्यालयीन संगणकांची ऑपरेटिंग सिस्टिम, इंटरनेट ब्राउझर आणि सुरक्षा प्रणाली नियमितपणे अद्ययावत ठेवावी. अनोळखी फाइल्स, संशयास्पद डाउनलोड, क्रॅक सॉफ्टवेअर तसेच अविश्वसनीय स्रोतांमधून प्राप्त झालेल्या फाइल्स उघडू नयेत, असेही सूचित करण्यात आले आहे. शासकीय माहितीची गोपनीयता, कार्यालयीन पत्रव्यवहाराची सुरक्षितता आणि डिजिटल यंत्रणांचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सायबर सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करावे आणि डिजिटल संवाद साधताना विशेष दक्षता बाळगावी, असे आवाहन केंद्रीय गृह मंत्रालयाने केले आहे.

चांदूर बाजार येथे शुक्रवारी कृषी कर्ज मेळावा

अमरावती/प्रतिनिधी- जिल्ह्याची अग्रणी बँक असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांच्या वतीने शुक्रवार, दि. २७ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता चांदूर बाजार येथील गोविंदप्रभू मंगल कार्यालय येथे देशव्यापी कृषी कर्ज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या मेळाव्यास सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या केंद्रीय कार्यालयाचे महाव्यवस्थापक कौशल कुमार काला उपस्थित राहणार आहे. तसेच बँकेचे अमरावती क्षेत्रीय प्रबंधक पद्मम कुमार, नाबार्डच्या जिल्हा विकास व्यवस्थापक रश्मिता पंचाळे उपस्थित राहणार आहेत.या कृषी कर्ज मेळाव्यामध्ये सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या विविध कृषी कर्ज योजनांची माहिती शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे. पीक कर्ज, किसान क्रेडिट कार्ड, कृषी गुंतवणूक कर्ज तसेच शेतीपूरक व्यवसायांसाठी उपलब्ध असलेल्या विविध कर्ज योजनांची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर मेळाव्याच्या ठिकाणीच कर्ज मंजुरी देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.याशिवाय प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेतर्गत लाभार्थ्यांना विमा दाव्यांच्या रकमेचे धनादेश वितरित करण्यात येणार आहेत. त्यामुळे हा मेळावा शेतकऱ्यांसाठी केवळ कर्जवाटपाचा कार्यक्रम नसून आर्थिक समावेशन आणि सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.सेंट्रल बँक ऑफ इंडिया शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी कटिबद्ध असून बँकेच्या विविध कृषी कर्ज योजनांचे व्याजदर अत्यंत स्पर्धात्मक व किफायतशीर आहेत. शेतकऱ्यांनी आधुनिक शेती, कृषी यांत्रिकीकरण, सिंचन सुविधा तसेच शेतीपूरक व्यवसायांसाठी बँकेच्या योजनांचा लाभ घ्यावा. चांदूर बाजार व परिसरातील शेतकरी, कृषी उद्योजक, कृषीपूरक व्यवसाय करणारे व्यापारी, तसेच इच्छुक कर्जदारांनी या मेळाव्यास उपस्थित राहून बँकेच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अग्रणी जिल्हा व्यवस्थापक नरेश हेडाऊ यांनी केले आहे.

उत्तर प्रदेश निवडणुकीत एकनाथ शिंदेंची एन्ट्री!

३५ जागांवर उमेदवार देण्याची तयारी

मुंबई/ प्रतिनिधी- महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामुळे भाजपची डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे. कारण एकनाथ शिंदे आता भाजपला टक्कर देणार आहेत. उत्तर प्रदेशच्या आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये एकनाथ शिंदे यांची शिवसेना निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे. या निवडणुकीमध्ये शिंदेंची शिवसेना उमेदवार उतरवणार आहे. त्यामुळे फक्त भाजपच नाही तर उत्तर प्रदेशमधील मोठ्या पक्षांचे टेन्शन वाढणार आहे.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, उत्तर प्रदेशात शिंदेंची शिवसेना निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहे. उत्तर प्रदेशात ३५ विधानसभा जागांवर शिंदेसेना उमेदवार देण्याची तयारी करत आहे. या निवडणुकीत शिंदे गटाचा हिंदुत्वाचा अजेंडा असेल. प्रयागराजमध्ये राष्ट्रीय सचिव कॅप्टन अभिजीत अडसूळ यांनी याबाबत मोठी घोषणा केली. महाराष्ट्रात भाजपसोबत पण यूपीमध्ये स्वतंत्र राजकीय भूमिका शिवसेना घेणार आहे. शिवसेना शिंदे गटाचे नेते अभिजीत अडसूळ यांनी मथुरा मुद्द्यावर सांगितले की, मथुरा भाजपचा मुद्दा, शिवसेनेचा मुद्दा हिंदुत्व असणार आहे. या निवडणुकीत शिंदेसेना भाजपला तगडी फाईट देणार असल्याची चर्चा सध्या होत आहे. उत्तर प्रदेशच्या राजकारणात शिंदे गटाच्या एन्ट्रीमुळे नवे राजकीय समीकरण तयार होणार का? यावर आता चर्चा सुरू झाली आहे. शिंदेंच्या या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाल्या आहेत.



एनसीसीच्या प्रजासत्ताक दिन तयारीची गैरसोय

पुणे : नवी दिल्लीतील प्रजासत्ताक दिन संचलनासाठी राज्याचे प्रतिनिधित्व करणा-या राष्ट्रीय छात्र सेनेला (एनसीसी) देण्यात येणारा निधी राज्य सरकारकडून अद्याप उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. त्यामुळे प्रजासत्ताक दिन संचलनाची तयारी करताना एनसीसीला गैरसोयीला तोंड द्यावे लागत आहे.महाराष्ट्र संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल विवेक त्यागी यांनी याबाबतची माहिती दिली. प्रजासत्ताक दिन संचलनाच्या तयारीबाबत त्यागी यांनी पाहणी केल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधला. राज्यभरातील महाविद्यालये, विद्यापीठांतील एनसीसी छात्रांतून निवड झालेल्या १२८ छात्रांचे प्रशिक्षण सुरू आहे. प्रजासत्ताक दिन संचलनामध्ये महाराष्ट्राने आजवर दमदार सांघिक कामगिरी केली आहे. तसेच गेली सलग तीन वर्षे सर्वोत्कृष्ट महिला छात्र पुरस्कार राज्यातील महिला छात्रांनी मिळवला आहे.

शेतकरी अग्रिम मदतीपासून वंचित राहणार नाहीत

केंद्राकडे वाढीव मदतीसाठी फेरप्रस्ताव; कृषिमंत्री भरणे

नांदेड/प्रतिनिधी- राज्यातील दुष्काळग्रस्त शेतक-यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असून, कोणत्याही शेतक-याला वा-यावर सोडले जाणार नाही. राज्यातील ९७ लाख शेतक-यांपर्यंत पाच हजार रुपयांची अग्रिम मदत पोहोचली आहे. मात्र, ई-केवायसी किंवा अन्य तांत्रिक अडचणींमुळे काही शेतक-यांना अद्याप ही रक्कम मिळालेली नाही. अशा सर्व पात्र शेतक-यांना ही मदत दिली जाईल, अशी ग्वाही कृषिमंत्री दत्ता भरणे यांनी दिली.राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर राज्य सरकारने केंद्राकडे मदतीची मागणी केली होती. मात्र, केंद्राकडून मदत मिळण्यास विलंब झाला. दरम्यान, केंद्र सरकारने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (एनडीआरएफ) अंतर्गत मदतीच्या रकमेत तसेच हेक्टरी मदतीच्या निकषांत वाढ केली आहे. त्यामुळे राज्य सरकारला यापूर्वी पाठविलेला प्रस्ताव दुरुस्त करून नव्याने केंद्राकडे पाठवावा लागणार आहे. लवकरच हा फेरप्रस्ताव सादर केला जाईल, असेही भरणे यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच





दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी शेतक-यांना तातडीचा दिलासा मिळावा, या उद्देशाने पाच हजार रुपयांची अग्रिम मदत जाहीर केली होती. ही रक्कम अनेक शेतक-यांपर्यंत पोहोचली असून, उर्वरित पात्र शेतक-यांनाही ती मिळेल. राज्य सरकारकडून कोणत्याही प्रकारच्या त्रुटी राहिलेल्या नाहीत. केंद्राने मदतीच्या रकमेत वाढ केल्यामुळे फेरप्रस्ताव पाठविण्याची प्रक्रिया करावी लागत असल्याचे त्यांनी सांगितले.नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचे तीन हप्ते अद्याप मिळाले नसल्याच्या प्रश्नावर बोलताना भरणे यांनी सांगितले की, या योजनेच्या निधीसंदर्भातील प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात आला आहे. या योजनेची फाईल अर्थ विभागाकडे पाठविण्यात आली असून, संबंधित रक्कम लवकरच शेतक-यांना मिळेल. पाच हजार रुपयांची अग्रिम मदत आणि नमो शेतकरी योजनेचा निधी या दोन्ही स्वतंत्र बाबी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

आता शौचालयेही स्वच्छ करणार एआय!

नागपुरात देशातील पहिला स्मार्ट टॉयलेट प्रकल्प

नागपूर/प्रतिनिधी- कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर आता केवळ उद्योग, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रापुरता मर्यादित राहिलेला नाही. सार्वजनिक स्वच्छतेच्या व्यवस्थेतही एआय तंत्रज्ञानाची मदत घेतली जाणार आहे. नागपूर महापालिकेने रेशीमबाग मैदानावर देशातील पहिल्याच प्रकारची कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित स्वयंचलित स्मार्ट शौचालय सुविधा सुरू केली आहे. या सुविधेमुळे शौचालयाची स्वच्छता, देखभाल, वापर आणि दुर्गंधी नियंत्रण यांचे निरीक्षण आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून केले जाणार आहे. महापालिकेने हा देशातील पहिलाच प्रकल्प असल्याचा दावा केला आहे.

रेशीमबागेत अत्याधुनिक स्मार्ट शौचालय- सार्वजनिक स्वच्छता सुविधांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्याच्या उद्देशाने महापालिकेने हा उपक्रम राबविला आहे. या स्मार्ट शौचालयाची निर्मिती स्मार्टआयआर सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने केली आहे. यामध्ये स्टेनलेस स्टीलची स्वयंचलित यंत्रणा बसविण्यात आली आहे. महिला आणि पुरुषांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली असून नागरिकांना ही सुविधा मोफत वापरता येणार आहे. स्वच्छता आणि देखभालीच्या दृष्टीनेही या शौचालयात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.

एआय, आयओटी आणि सेन्सरद्वारे नियंत्रण- या शौचालयाचे वैशिष्ट्य म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), स्वयंचलित फ्लशिंग, स्मार्ट वायुवीजन, दुर्गंधी नियंत्रण आणि मानवी मलविघटन व्यवस्थेचा समावेश आहे. या तंत्रज्ञानामुळे शौचालयातील वापराची स्थिती, स्वच्छतेची पातळी आणि देखभालीची आवश्यकता यांचे निरीक्षण करणे शक्य होणार आहे. दुर्गंधी नियंत्रण यंत्रणाही बसविण्यात आली आहे. त्यामुळे स्वच्छतेची स्थिती अधिक प्रभावीपणे राखण्यास मदत होईल.

क्यूआर कोड स्कॅन करा, तक्रार थेट नोंदवा- नागरिकांना या सुविधेबाबत



तक्रार किंवा अभिप्राय नोंदविण्यासाठी क्यूआर कोडची व्यवस्था करण्यात आली आहे. क्यूआर कोड स्कॅन करून नागरिक आपले मत, वापराची स्थिती आणि देखभालीसंदर्भातील गरजा ऑनलाइन नोंदवू शकतात. स्वतंत्र ऑनलाइन सर्वेक्षण प्रणालीही विकसित करण्यात आली आहे. एआय आधारित विश्लेषण प्रणालीच्या माध्यमातून तक्रारी, वापराची आकडेवारी आणि देखभालीचे नियोजन करता येणार आहे.

पहिल्या दोन दिवसांत २०० नागरिकांचा वापर- महापालिकेच्या झोपडपट्टी विभागाच्या अधिकृत माहितीनुसार, रेशीमबाग मैदानावर ही स्मार्ट शौचालय सुविधा सुरू करण्यात आली आहे. उद्घाटनानंतर पहिल्या दोन दिवसांत सुमारे २०० नागरिकांनी या सुविधेचा वापर केला. महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक, प्रवासी आणि परिसरातील रहिवाशांना स्वच्छ व मोफत सार्वजनिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. डिजिटल तक्रार निवारण, स्वयंचलित देखभाल आणि एआयच्या मदतीने सार्वजनिक स्वच्छता व्यवस्थापन अधिक कार्यक्षम करण्याच्या दिशेने नागपूर महापालिकेचा हा महत्त्वपूर्ण प्रयोग ठरणार आहे.

भारत-अमेरिका व्यापार करारावर नवा पेच! अमेरिकेच्या नवीन टॅरिफ धोरणाची प्रतीक्षा

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने भारत, चीन आणि युरोपियन युनियनसह १६ देशांवर आयात शुल्क वाढवण्याची तयारी सुरू केल्याची माहिती समोर आली आहे. 'द वॉल स्ट्रीट जर्नल'च्या अहवालानुसार, सरकारी सबसिडी आणि इतर आर्थिक मदतीद्वारे देशांतर्गत उद्योगांना बळ दिल्याच्या आरोपामुळे या देशांवर नवे किंवा अधिकचे टॅरिफ लादण्याचा विचार सुरू आहे. या संभाव्य निर्णयाचा फटका भारतालाही बसण्याची शक्यता वर्तवली जात असून, भारत-अमेरिका व्यापार कराराच्या दृष्टीने हा टप्पा अत्यंत संवेदनशील मानला जात आहे.अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी जॅमिसन ग्रीर या आठवड्यात या तपासाचे निष्कर्ष जाहीर करू शकतात, असे अहवालात म्हटले आहे; मात्र या घोषणेच्या वेळेत बदलही होऊ शकतो. या तपासात चीन, भारत, जपान, दक्षिण कोरिया, व्हिएतनाम, युरोपियन युनियन आणि इतर अर्थव्यवस्थांच्या उत्पादन क्षेत्रातील धोरणांची व सबसिडींची छाननी करण्यात आली आहे.अमेरिकेच्या मते, परदेशी सरकारांकडून मिळणारी सबसिडी, सवलती किंवा धोरणात्मक मदत यामुळे त्या देशांतील उत्पादक कमी खर्चात वस्तू तयार करू शकतात आणि मोठ्या प्रमाणावर जागतिक बाजारपेठेत उतरवतात. त्यामुळे अमेरिकेतील देशांतर्गत उत्पादनावर आणि स्पर्धेवर विपरीत परिणाम होतो, असा दावा ट्रम्प प्रशासनाकडून केला जात आहे.प्रस्तावित टॅरिफमध्ये संबंधित देशांकडून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या बहुतांश वस्तूंचा समावेश असू शकतो. मात्र, पोलाद, ॲल्युमिनियम आणि ऑटोमोबाइल यांसारख्या वस्तूंना यातून वगळण्याची शक्यता आहे, कारण त्यावर राष्ट्रीय सुरक्षेच्या आधारावर आधीच स्वतंत्र शुल्क लागू आहे.अंतिम दर अद्याप निश्चित झाले नसले तरी, २०२५ मध्ये लादण्यात आलेल्या शुल्काच्या जवळपास दर ठेवण्याचा प्रशासनाचा कल असल्याचे



सांगितले जाते. जपान, दक्षिण कोरिया आणि युरोपियन युनियनवर १५ टक्के किंवा त्याहून कमी शुल्क लागू होऊ शकते, तर भारत आणि व्हिएतनामवर तुलनेने अधिक शुल्क आकारले जाण्याची शक्यता अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. सर्वाधिक सबसिडीच्या मुद्द्यावरून चीनवर सर्वात जास्त शुल्क लागू होण्याचा अंदाज आहे.भारत आणि अमेरिका यांच्यात द्विपक्षीय व्यापार कराराबाबत चर्चा सुरू असून, या वर्षाच्या सुरुवातीला (फेब्रुवारी २०२६ मध्ये) अंतरिम आराखड्याची घोषणा झाली होती. मात्र, त्यानंतर अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने पूर्वीच्या काही टॅरिफ तरतुदी रद्द केल्यानंतर अमेरिकेची शुल्क रचना नव्याने आकार घेत आहे. वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनीही अलीकडेच स्पष्ट केले होते की, अमेरिकेची नवीन टॅरिफ रचना स्पष्ट झाल्याशिवाय करारावर औपचारिक स्वाक्षरी करणे शक्य होणार नाही. त्यामुळे अमेरिकेच्या नव्या निर्णयाकडे भारतीय उद्योग आणि व्यापार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

एकनाथ शिंदे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन

मुंबई/प्रतिनिधी- धुळे जिल्हा कारागृहाचे अधीक्षक एकनाथ शिंदे यांच्या आकस्मिक निधनाने कारागृह प्रशासनासह संपूर्ण शहरावर शोककळा पसरली आहे. हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या अचानक जाण्याने शिंदे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, विविध स्तरांतून हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी सायंकाळच्या सुमारास एकनाथ शिंदे यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. त्यामुळे ते घरी गेले होते. घरी पोहोचल्यानंतर त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. ही बाब लक्षात येताच नातेवाईक आणि सहकाऱ्यांनी त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्यांना मृत घोषित केले.एकनाथ शिंदे हे मितभाषी, मनमिळावू आणि कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून परिचित होते. त्यांच्या स्वभावामुळे आणि कामातील तत्परतेमुळे त्यांनी सहकारी व परिचितांमध्ये आपुलकीचे स्थान निर्माण केले होते. त्यांच्या अकाली निधनामुळे कारागृह प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये शोक व्यक्त होत असून, धुळे शहरातही हळहळ व्यक्त केली जात आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

निर्माता देश आणि संधी

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात गेमिंग क्षेत्राला मोठ्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. भारताकडे कुशल तंत्रज्ञ, कोट्यवधी गेमर्स आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा असताना जागतिक गेमिंग बाजारपेठेत स्वतःची ओळख निर्माण करण्याची हीच योग्य वेळ आहे.तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी कल्पकतेला पर्याय नसतो. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात मानवी सर्जनशीलतेचे महत्त्व अधोरेखित होत असतानाच, भारतासमोर जागतिक गेमिंग क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करण्याची मोठी संधी आहे. गरज आहे ती केवळ तंत्रज्ञानाची नव्हे, तर आपल्या सांस्कृतिक सामर्थ्याची जाणीव असलेल्या दूरदृष्टीची. एकेकाळी चित्रपट आणि संगीत ही मनोरंजनाची प्रमुख साधने मानली जात होती; मात्र आता व्हिडिओ गेमिंगने या दोन्ही क्षेत्रांना मागे टाकत स्वतंत्र आणि प्रचंड मोठी जागतिक बाजारपेठ निर्माण केली आहे. 'ग्रँड थेफ्ट ऑटो' अर्थात 'जीटीए' या व्हिडिओ गेमच्या नव्या आवृत्तीने जगभरात निर्माण केलेली उत्सुकता आणि त्यासाठी झालेली अब्जावधी डॉलरची गुंतवणूक हे या बदलाचे ठळक उदाहरण आहे. तंत्रज्ञान, कला, कल्पकता, व्यवसाय आणि रोजगार यांचा संगम असलेले हे भविष्यातील महत्त्वाचे उद्योगक्षेत्र आहे. या बदलत्या वास्तवात भारताने आपली भूमिका काय ठेवायची, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. भारतासाठी ही बाजारपेठ विशेष महत्त्वाची आहे. सुमारे ५५ कोटी खेळाडू असलेला भारत हा जगातील सर्वांत मोठ्या मोबाईल गेमिंग बाजारपेठांपैकी एक आहे. २०२५ मध्ये भारतीय गेमिंग क्षेत्राचा महसूल एक अब्ज डॉलरच्या पुढे गेला. देशातील वाढती इंटरनेट उपलब्धता, स्वस्त डेटा, स्मार्टफोनचा विस्तार आणि डिजिटल माध्यमांशी जोडली गेलेली तरुण पिढी यामुळे या क्षेत्राला मोठी चालना मिळाली आहे; मात्र या संख्यात्मक सामर्थ्याचे रूपांतर जागतिक स्तरावर नावाजल्या जाणाऱ्या भारतीय उत्पादनांमध्ये झाले आहे का, याचा विचार करण्याची वेळ आली आहे.भारतीय गेमिंग क्षेत्रासमोरची सर्वांत मोठी विसंगती याच ठिकाणी दिसते. भारतात कोट्यवधी लोक व्हिडिओ गेम खेळतात. परदेशी कंपन्यांच्या खेळांसाठी पैसे खर्च करतात. जागतिक दर्जाचे गेम तयार करणाऱ्या कंपन्यांमध्ये भारतीय अभियंते आणि विकासक महत्त्वाची भूमिका बजावतात.'जीटीए ६'च्या निर्मितीत बंगळुरूमधील सुमारे १,६०० भारतीय विकासकांनी योगदान दिल्याचे नमूद केले जाते. दुसयांच्या कल्पनांना आकार देण्याचे कौशल्य आपल्याकडे आहे; मात्र स्वतःच्या कल्पनांमधून जागतिक बाजारपेठेत ठसा उमटवण्याच्या बाबतीत आपण मागे आहोत. ही केवळ उद्योगक्षेत्रातील उणीव नाही, तर देशाच्या सर्जनशील आणि उद्योजकीय क्षमतेपुढील आव्हान आहे. भारताची ओळख दीर्घकाळ जागतिक कंपन्यांना कुशल मनुष्यबळ आणि तांत्रिक सेवा पुरवणारा देश अशी राहिली आहे. गेमिंग क्षेत्रातही हाच दृष्टिकोन स्वीकारावा लागेल. जागतिक कंपन्यांसाठी काम करणे गैर नाही; उलट त्यातून अनुभव आणि कौशल्य मिळते; परंतु त्याच अनुभवाचा उपयोग करून भारतीय कंपन्यांनी स्वतःचे खेळ विकसित केले पाहिजेत. त्यासाठी केवळ मोठ्या गुंतवणुकीची अपेक्षा ठेवून चालणार नाही. बाजारपेठेचा अभ्यास, उत्तम कथानक, संशोधन, तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि दीर्घकालीन व्यावसायिक नियोजन यांची सांगड घालावी लागेल.भारतीय संस्कृती आणि इतिहास हा गेमिंगसाठी मोठा स्रोत ठरू शकतो. भारतीय संस्कृतीची ओळख जपत असताना जागतिक दर्जाचे सादरीकरण करण्याचे आव्हान स्वीकारावे लागेल. स्थानिक विषयांना जागतिक अपील देणे हीच भारतीय निर्मात्यांची खरी कसोटी असेल. या संपूर्ण प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका निर्णायक ठरणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आगमनाने अनेक उद्योगांच्या कामकाजाचे स्वरूप बदलू लागले आहे. माहितीचे विश्लेषण, संगणकीय आज्ञावली लिहिणे, दृश्यनिर्मिती, संवादलेखन आणि अनेक तांत्रिक प्रक्रिया यांचा वेग वाढवण्याची क्षमता या तंत्रज्ञानात आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे मानवी सर्जनशीलतेचे महत्त्व कमी होईल, असे मानणे चुकीचे ठरेल. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी एखादी कल्पना जन्माला घालणे, तिच्यातून वेगळा अनुभव निर्माण करणे आणि त्या अनुभवाशी लोकांचे भावनिक नाते जोडणे, यासाठी मानवी संवेदनशीलता आवश्यक असते. एखाद्या खेळातील शहराची रचना, पात्रांचे स्वभाव, कथानकाचा प्रवाह, संघर्ष, आव्हाने आणि त्यातून मिळणारा आनंद या गोष्टी केवळ तांत्रिक कौशल्यावर अवलंबून नसतात. त्यामागे मानवी अनुभव, कल्पकता, अभिरुची आणि निर्णयक्षमता असतें.सरकारची भूमिका यासंदर्भात महत्त्वाची ठरते. गेमिंगला केवळ मनोरंजनाचे क्षेत्र न मानता एक व्यापक उद्योग म्हणून त्याकडे पाहिले पाहिजे. या क्षेत्रासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यावर भर द्यायला हवा. संगणक अभियांत्रिकीबरोबरच चित्रकला, संगीत, कथालेखन, ॲनिमेशन, दृश्यरचना आणि ध्वनिनिर्मिती अशा विविध क्षेत्रांतील कौशल्यांना एकत्र आणणारे अभ्यासक्रम विकसित करणे गरजेचे आहे. गेमिंग क्षेत्रातील नवउद्योजकांना आर्थिक मदत, संशोधनासाठी सुविधा आणि जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळवून देण्यासाठी धोरणात्मक पाठबळ आवश्यक आहे. त्याचबरोबर भारतीय कंपन्यांनी विकसित केलेल्या खेळांच्या बौद्धिक संपदा हक्कांचे संरक्षणही महत्त्वाचे आहे. कारण एखादा लोकप्रिय गेम निर्माण करणे जितके महत्त्वाचे, तितकेच त्यावरील मालकी हक्क आणि त्यातून दीर्घकाळ उत्पन्न मिळवण्याची क्षमता जपणेही आवश्यक आहे. भारतातील तरुणांमध्ये कल्पकतेची कमतरता नाही. डिजिटल तंत्रज्ञान स्वीकारण्याची तयारी आहे. जागतिक बाजारपेठेची दारे खुली आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे निर्मितीच्या प्रक्रियेत नवे पर्याय उपलब्ध होत आहेत. अशा वेळी भारताने केवळ मोठ्या गेमिंग बाजारपेठेचा ग्राहक म्हणून समाधान मानू नये. गेमिंग क्षेत्रात जागतिक स्तरावर स्पर्धा करणारा निर्माता देश बनण्याचे ध्येय ठेवले पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा विस्तार कमी साधनांतूनही मोठी निर्मिती करण्याची संधी देतो. या दोन्ही बदलांचा उपयोग भारताने स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी केला पाहिजे.

गरज वैधानिक कर्जमुक्ती आयोगाची!

शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीनुसार कर्जमाफी, तडजोड, पुनर्रचना आणि कर्जवसुलीपासून संरक्षण देणारा वैधानिक कर्जमुक्ती आयोग स्थापन करावा. शेती किफायतशीर बनवणे, कर्जफेड क्षमता वाढवणे आणि शेतकऱ्यांवर पुन्हा कर्जबाजारी होण्याची वेळ येऊ न देणे, हे धोरणाचे उद्दिष्ट असावे.

महाराष्ट्रातील शेती संकटाची सर्वाधिक भीषण तीव्रता शेतकरी आत्महत्यांमधून दिसते आहे. राज्य सरकारच्या आकडेवारीनुसार, जानेवारी २०२२ ते जून २०२६ या ५४ महिन्यांत राज्यात १३,१२८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. म्हणजे दररोज सरासरी आठपेक्षा अधिक शेतकऱ्यांनी जीवन संपविले. वाढता उत्पादन खर्च, शेतीमालाला रास्त भावाचा अभाव, नैसर्गिक आपत्ती आणि अपुरा संस्थात्मक कर्जपुरवठा यामुळे कृषी संकट अधिक गंभीर झाले आहे.

शेतकरी कर्जबाजारीपणा व शेती प्रश्नांचे मूळ शोधण्यासाठी २०२६ च्या कर्जमाफीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती स्थापन केली. शेती अर्थव्यवस्था सक्षम करणे, उत्पन्न वाढविणे, कर्जफेडीची क्षमता निर्माण करणे आणि शेतकरी पुन्हा कर्जबाजारी होऊ नयेत यासाठी उपाय सुचविणे हा तिचा उद्देश होता. मात्र, याऐवजी समितीने राज्याची 'आर्थिक शिस्त' भक्कम बनविण्यावर आपल्या शिफारशी केंद्रित केल्या. त्यासाठी २०१९ मध्ये कर्जमाफी घेतलेल्या शेतकऱ्यांना नव्या कर्जमाफीतून वगळण्याची शिफारस केली.

शेतकरी आंदोलनाने हा प्रयत्न हाणून पाडल्यानंतर समिती गुंडाळण्यात आली आणि तिचा अहवालही थंड्या बस्त्यात टाकण्यात आला. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना पुरेसे प्रोत्साहन दिल्याशिवाय कर्ज परतफेडीची आर्थिक शिस्त मजबूत होणार नाही, याकडेही सोयीने दुर्लक्ष करण्यात आले. २०२६ च्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत थकीत पीककर्जाला दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर झाली.

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांची मात्र ५० हजार रुपये प्रोत्साहन अनुदान देऊन बोळवण करण्यात आली होती. नियमित कर्जदारही प्रतिकूल सरकारी धोरणे, वाढता उत्पादन खर्च, अनिश्चित उत्पन्न आणि नैसर्गिक आपत्तींचा सामना करतात. अत्यंत काटकसर करून, प्रसंगी उसनवारी करून कर्जफेड करतात. त्यामुळे त्यांनाही किमान दोन लाख रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान



मिळावे, अशी किसान सभेची मागणी आहे. यातून नियमित कर्जफेडीला प्रोत्साहन मिळेल आणि आर्थिक शिस्त खऱ्या अर्थाने मजबूत होईल. सरकार मात्र हे ऐकायला तयार नाही.

शेतकऱ्यांच्या कर्जफेडीचा आग्रह धरणाऱ्या सरकारची उद्योगपतींच्या कर्जाबाबतची भूमिका मात्र वेगळी आहे. २०१४-१५ ते २०२२-२३ या काळात बँकांनी १४.५६ लाख कोटी रुपयांची थकीत कर्जे निर्लेखित केली. त्यापैकी मोठ्या उद्योग व सेवा क्षेत्रातील कर्जे तब्बल ७.४१ लाख कोटी रुपयांची होती. या काळात निर्लेखित कर्जांपैकी प्रत्यक्ष वसुली फक्त २.०५ लाख कोटी रुपये झाली. निर्लेखन तांत्रिकदृष्ट्या कर्जमाफी नसले, तरी उर्वरित कर्ज वसूल होत नसल्याचे दाखविणे ही एक प्रकारे कर्जमाफीच ठरते. शिवाय २०२३-२४ मध्ये केंद्र सरकारने कॉर्पोरेट करसवलतींपोटी उद्योगांचा सुमारे ९९ हजार कोटी रुपयांचा महसूल माफ केला आहे. उद्योगपतींना अशी करमाफी, कर्जमाफी उदारपणे देत असताना शेतकऱ्यांच्या कर्जमाफीला मात्र असंख्य अटीशर्ती लावल्या जातात. शेतकरी कर्जमाफीचा प्रचंड गाजावाजा केला जातो. हा दुहेरी न्याय संपला पाहिजे. शेती व शेतकऱ्यांनाही उद्योगांसारखेच वागविले पाहिजे.

कर्जमुक्तीचा वैधानिक अधिकार

संकटग्रस्त शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्ती ही सरकारच्या मर्जीवर अवलंबून असलेली तात्पुरती मदत न राहता, कायद्याने निश्चित केलेली व्यवस्था बनली पाहिजे. यासाठी राष्ट्रीय व राज्यस्तरावर वैधानिक अधिकार असलेले कर्जमुक्ती आयोग स्थापन करण्याची मागणी किसान सभेने वारंवार केली आहे. केरळमधील डाव्या लोकशाही आघाडीच्या सरकारने २००६ मध्ये स्वतंत्र कायदा करून शेतकरी कर्जमुक्ती आयोग स्थापन केला. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती आणि कर्जफेडीची क्षमता विचारात घेऊन कर्जतडजोड, व्याजसवलत, पुनर्रचना व मुदतवाढ यासाठी या कायद्यात तरतुदी करण्यात आल्या.

महाराष्ट्रात असा कायदा करून कर्जमुक्ती आयोग स्थापन करण्याची आवश्यकता आहे. या आयोगाला संकटग्रस्त शेतकऱ्यांची कर्जवसुली, साधनांची जप्ती आणि लिलाव रोखण्याचे अधिकार असले पाहिजेत. शिवाय आवश्यकता वाटल्यास कर्जाचे पुनर्गठन, कर्जनिर्लेखन किंवा प्रसंगी कर्जमाफी करण्याचे अधिकार असले पाहिजेत. संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी केरळमध्ये हे अत्यंत उपयुक्त ठरले आहे.

मायक्रोफायनान्सचे कर्जजाळे

बँकांकडून पुरेसे आणि सुलभ कर्ज मिळत नसल्याने ग्रामीण कुटुंबे खासगी सावकार, मायक्रोफायनान्स कंपन्या आणि बिगर बँकिंग वित्तीय संस्थांच्या कर्जजाळ्यात अडकत आहेत. अवाजवी व्याजदर, छुपे शुल्क, सक्तीची वसुली आणि मानसिक छळातून कर्जदारांचे शोषण होते. यावर कठोर वैधानिक नियंत्रण आणून व्याजदर व शुल्कांना मर्यादा घालण्याची, परतफेड क्षमतेनुसार कर्ज आणि महिलांना सक्तीच्या वसुलीपासून कायदेशीर संरक्षण देण्याची आवश्यकता आहे. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी परवडणारे, पुरेसे व वेळेवर संस्थात्मक कर्ज मिळणे आवश्यक आहे.

सार्वजनिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व सहकारी पतसंस्था बळकट करून लहान व सीमांत शेतकऱ्यांना एक लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी पीककर्ज द्यावे. सर्व पिके व कृषी जोखमींना संरक्षण देणारी सार्वत्रिक पीकविमा योजना लागू करावी. तिचा संपूर्ण हप्ता सरकारने भरावा. पारदर्शक मूल्यमापनाद्वारे वेळेत पीकविमा भरपाई द्यावी. संस्थात्मक व बिगर संस्थात्मक कर्ज, मायक्रोफायनान्स आणि एकाच कुटुंबावरील अनेक कर्जांचे सर्वेक्षण करून कर्जबाजारीपणा व आत्महत्यांमधील संबंधांचे शास्त्रीय दस्तऐवजीकरण करावे. कर्जबाजारीपणा आणि कृषी संकटावर मात करण्यासाठी या उपायांची आवश्यकता आहे.

केवळ कर्जमाफीने कृषी संकट संपणार नाही. शेतीमालाला रास्त भाव, उत्पादन खर्चात कपात, सिंचन व पायाभूत सुविधांचा विस्तार, नैसर्गिक आपत्तींपासून संरक्षण आणि पुरेसा संस्थात्मक कर्जपुरवठा यांची एकत्रित अंमलबजावणी त्यासाठी आवश्यक आहे. खासगी सावकारी व मायक्रोफायनान्सचे शोषण रोखून नियमित कर्जदारांना न्याय्य प्रोत्साहन द्यावे. शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीनुसार कर्जमाफी, तडजोड, पुनर्रचना आणि कर्जवसुलीपासून संरक्षण देणारा वैधानिक कर्जमुक्ती आयोग स्थापन करावा. शेती किफायतशीर बनवणे, कर्जफेड क्षमता वाढवणे आणि शेतकऱ्यांवर पुन्हा कर्जबाजारी होण्याची वेळ येऊ न देणे, हे धोरणाचे उद्दिष्ट असावे. अशा व्यापक व दीर्घकालीन उपाययोजनांतूनच शेतकरी आत्महत्या रोखून शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने कर्जमुक्त करता येईल.

डॉ. अजित नवले :
९८२२९९४८९१
(लेखक अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय सहसचिव आहेत.)

महाराष्ट्रात पडीक जमिन किती ?

महाराष्ट्रात पडीक जमिन किती आहे?कोणाला कल्पना आहे?तब्बल ९२.८६ लाख एकर.यामध्ये चालू वर्षातील पडीक जमीन आहे,३७.७८ लाख एकर इतर पडीक जमीन आहे (जसे खारलँन्ड वगैरे) ३०.०९ लाख एकर आणि लागवडीयोग्य पडीक जमीन आहे,२४.९९ लाख एकर..एकूण पडीक जमीन ९२.८६ एकर एवढी आहे.ही आकडेवारी २०२३ - २०२४ ची.महाराष्ट्र सरकारच्या अर्थ आणि सांख्यिकी विभागाच्या कागदपत्रात ही आकडेवारी दाखविलेली आहे..

अधिक माहितीसाठी सांगतो,पडीक जमीन म्हणजे काही काळ शेती न केलेली किंवा न कसलेली जमीन लागवडी योग्य पडीक जमीन म्हणजे दीर्घकाळ लागवडीखाली नसलेली पडीक जमीन.जिल्हा निहाय विचार केला तर सर्वाधिक पडीक जमीन अहिल्यानगर जिल्ह्यात आहे..दुसरा नंबर सोलापूरचा लागतो. तिसरा धाराशीवचा नंबर लागतो.कोकणातील तीनही जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पडीक जमीन आहे..

धक्कादायक गोष्ट अशी की,आता या सर्व जमिनीवर सरकारचा डोळा आहे.बावनकुळे यांनी जाहीर केले की,'तीन वर्षे वहितीखाली नसलेली पडीक जमीन सरकार ताब्यात घेईल'.सरकार एवढी प्रचंड जमीन ताब्यात घेऊन काय करणार आहे? सरकार स्वतः शेती करणार आहे का?नक्कीच नाही.

कारण राज्यात सरकारी मालकीची कित्येक एकर जमीन पडून आहे,त्यावर अतिक्रमण झाली आहेत.सरकारचे त्याकडे लक्ष नाही.मग९३ लाख एकर जमिनीचे सरकार काय करणार आहे?अर्थातच या जमिनी धनदांडग्यांच्या घश्यात घालण्याची ही योजना आहे.विरोध तर करावाच लागेल.मुळात जमिनी पडक का पडतात?कारण उघड आहे,शेती करणे परवडत नाही म्हणून..शेतीसाठी लागणारे सारेच खर्च वाढले,एवढे पैसे शेतीत टाकायचे आणि मग कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टीसारखा आपत्तींना तोंड देत सर्व घालवून बसायचे.वरती सरकारी धोरणे आहेतच.

'शेती मालाला उत्पादन



खर्चावर आधारित भाव मिळाला पाहिजे' अशी सूचना स्वामीनाथन यांनी केली होती.ते होत नाही.दलालांची साखळी सरकार तोडू शकत नाही.त्यामुळे वर्षभर राबूनही हाती काही लागत नाही,म्हटल्यावर शेती न करता ती पडीक पडू दिली जाते.दुसरं काय करणार?सरकारला मात्र हा शेतकऱ्यांचा गुन्हा वाटतो.त्याची शिक्षा म्हणून त्याच्याकडची शेती हिसकावून घेण्याचा कट सरकारने रचला आहे..संतापजनक आणि निषेधार्ह आहे हे.

आणखी एक..सरकारने कर्मी दरात एमआयडीसीसाठी भूखंड दिलेत.या एमआयडीसीतले अनेक उद्योग वर्षानुवर्षे बंद पडले आहेत, तेथे निवासी संकुल उभारले जाताहेत.आमच्या बीडमध्ये जाऊन बघा हे दिसेल.बंद पडलेल्या कंपन्यांचे भूखंड का काढून घेतले जात नाहीत?आमच्या बाप-जाद्याच्या जमिनी अशा हिसकावून धनदांडग्याला दिल्या जाणार असतील तर हे होऊ देता कामा नये.

भक्त आणि शहरी सुखवस्तू म्हणतील,पडीक जमिनीमुळे राष्ट्रीय कृषी उत्पादन घटते.हे खरे,पण वरती म्हटल्याप्रमाणे जमिनी पडक पडू नयेत यासाठी ज्या अडचणी आहेत त्या दूर करा,शेती किफायतशीर होईल अशी धोरणे राबवा मग तर शेतकरी एक गुंठा जमीन देखील पडीक पडू देणार नाहीत.सरकार ते करीत नाही..त्यामुळे पडीक जमिनी ताब्यात घेण्याची सरकारी योजना म्हणजे रोगा पेक्षा इलाज जालीम अशी आहे.

(बावनकुळे नागपूरमध्ये जे बोलले त्यात स्पष्टता नाही.तीन वर्षांपेक्षा जास्त काळ पडीक असलेल्या सर्वच जमिनी सरकार ताब्यात घेणार की, आणखी काही? काहीही असले तरी ही सुरूवात असू शकते.. पुढचा टप्पा सर्व पडीक जमिनी ताब्यात घेण्याचाही योजना असू शकते.. बावनकुळे यांनी हे पिल्लू सोडलेले दिसते.. किती विरोध होतो याची चाचपणी करण्याचा उद्देशही यामागे असू शकतो.. मात्र सर्वच पडीक जमिनीवर सरकारचा डोळा आहे हे गृहीत धरून वरचा मजकूर येथे दिलेला आहे...)

एस.एम.देशमुख

संवाद

भुसावळ आणि सिकंदराबाद ट्रेन नियमित असावी

२३ नोव्हेंबर रोजी भुसावळ आणि सिकंदराबाद दरम्यान धावलेल्या अनारक्षित विशेष ट्रेन ०१२८५ ला प्रवाशांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. नांदेड आणि अकोला येथून सिकंदराबादला जाणाऱ्या गाड्या आहेत, पण त्या आरक्षित असून नेहमीच पूर्ण भरलेल्या असतात. भुसावळ, मलकापूर, शेगाव आणि हिंगोली येथून सर्वसामान्य प्रवाशांसाठी कोणतीही थेट अनारक्षित दैनंदिन ट्रेन नाही. सकाळी ६ वाजता सुटणाऱ्या आणि रात्री १० वाजता पोहोचणाऱ्या या ट्रेनमुळे मजूर, विद्यार्थी आणि रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. ही ट्रेन नियमित दैनंदिन सेवा म्हणून सुरू करावी आणि परतीची फेरीही सुरू करावी, अशी मागणी होत आहे.

राजेश पी.कारिया
राधे नगर,अकोला (महा)

विकास पॅकेजमुळे नेपाळला बळ

नेपाळ हा भारताचा शेजारी देश ऑगस्ट महिन्यात नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी पुरामुळे मोठया प्रमाणात झालेल्या पडझडीमुळे पायाभूत सुविधा पूर्णपणे नेस्तनाबूत झाल्या आहेत तसेच जीवितहानी हानी देखील मोठ्या प्रमाणात झाली. या विनाशकारी घटना घडल्यानंतर नेपाळचे पंतप्रधान बालेन शहा भारत भेटीच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने २४ हजार कोटींच्या (नेपाळी रुपये १५ हजार कोटी) मदतीचे विकास पॅकेज जाहीर केले आहे यामध्ये नवे पायाभूत प्रकल्प आणि पुनर्वसनासाठी ५६०० कोटींचे अनुदान तर ऊर्जा क्षेत्रासाठी १८४०० कोटी कर्ज सुविधेचा समावेश आहे. दरम्यान दोन्ही देशांनी द्विपक्षीय सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी आठ करारांवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. सीमावादावरून काही काळ तणाव निर्माण झाल्यानंतर नेपाळ-भारत संबंधाना नव्याने दिशा देण्याचा हा महत्वपूर्ण प्रयत्न मानला जात आहे.आर्थिक सहकार्य,ऊर्जा, जलस्रोत,हवामान बदलाचा सामना,संपर्क व्यवस्था,तंत्रज्ञान, आरोग्य यांसारख्या क्षेत्रांतील सहकार्याला नवी गती मिळणारं आहे नेपाळच्या विकास प्रवासाला ठाम पाठींबा असल्याचे भारत सरकारने म्हटले आहे. या दरम्यान उत्तर प्रदेशातील अयोध्या आणि नेपाळमधील जनकपूर यांना जोडणाऱ्या शरयू कमला एक्सप्रेस रेल्वेसेवेचा शुभारंभ झाल्यामुळे संपर्क वाढण्याबरोबर रामायण सर्किटमधील धार्मिक सांस्कृतिक पर्यटनाला चालना मिळणार आहे. परस्पर आदर, दृढ विश्वास आणि अखंड सद्भावना ही भारत नेपाळ- संबंधाची मूलभूत तत्वे आहे.

राजू जाधव

अपेक्षांचे ओझे...

कोणत्याही क्षेत्रात काम करताना फळाच्या किंवा सुखाच्या अपेक्षेने पाऊल टाकले, तर मनात इच्छा आणि ओढ निर्माण होते. अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळाला नाही, की वैफल्य आणि निराशा येते. याउलट, कोणतीही अपेक्षा न ठेवता प्रामाणिकपणे काम केले तर मन स्थिर राहते आणि कार्य अधिक सहजपणे पार पडते.आजच्या राजकीय चर्चेत राहुल गांधी,उद्धव ठाकरे, राज ठाकरे, संजय राऊत तसेच रोहित पवार सारख्या नेत्यांच्या संदर्भात होणाऱ्या चर्चांमध्येही राजकीय महत्त्वाकांक्षा, संघर्ष आणि वेगाचे राजकारण समोर येते. अनेकदा हा संयम सुटल्यावर आरोप-प्रत्यारोपांची भाषा खालावते आणि खोटे व टोकाचे आरोप केले जातात.

अविनाश देशपांडे

बुधवार, दि. २५ नोव्हेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

इतर राज्यांनी कोनोकार्पसला रोखले, यवतमाळ प्रशासनाला मात्र हिरवाईचा मोह!

गुजरात, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूत लागवडीवर प्रतिबंधात्मक आदेश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी
✦ विवेक वानखडे



यवतमाळ, दि. २४ : शहराच्या सौंदर्यीकरणाच्या नावाखाली विदेशी झाडांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा देखावा निर्माण करायचा आणि त्यातून संभाव्य आरोग्य व पर्यावरणीय धोके वाढवायचे, असा प्रकार यवतमाळ शहरात सुरू असल्याची चिंता निसर्गप्रेमींकडून व्यक्त होत आहे.

कोनोकार्पस या विदेशी वृक्षाची नगरपरिषद परिसरासह जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या परिसरातही लागवड करण्यात आली आहे. अनेक राज्यांनी या झाडाच्या लागवडीवर प्रतिबंधात्मक निर्णय घेतले असताना यवतमाळमध्ये मात्र त्याची लागवड सुरू असल्याने प्रशासनाच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. केंद्रीय सशक्त समितीच्या अहवालानंतर केंद्र सरकारने ऑगस्ट २०२५ मध्ये सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना कोनोकार्पसची लागवड तातडीने थांबविण्याचा राष्ट्रीय सल्ला दिला आहे. १६ मार्च २०२६ रोजी लोकसभेत दिलेल्या उत्तरानुसार गुजरात, तामिळनाडू आणि तेलंगणा या राज्यांनी प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. आंध्र प्रदेश आणि गोवा येथेही बंदी असल्याचे पर्यावरणविषयक वृत्तांत नमूद करण्यात आले आहे.

या झाडाच्या परागकणांमुळे ॲलर्जी व श्वसनविकार बळावण्याची शक्यता, भूजलाचा वापर आणि जमिनीखालील पाइपलाइन व केबल्सना मुळांमुळे होणारे संभाव्य नुकसान याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे केवळ झाडांची संख्या वाढविण्यापेक्षा कोणत्या प्रजातींची लागवड करावी, याला अधिक महत्त्व देण्याची गरज आहे. यवतमाळमध्ये नगरपरिषद, जिल्हाधिकारी कार्यालय आणि पोलीस अधीक्षक कार्यालय,बसस्थानक सिमेंट रस्त्यावर कुंडीत लावण्यात आले व परिसरातील लागवडीची तपासणी करून कोनोकार्पसची नव्याने लागवड तातडीने बंद करावी. अस्तित्वातील झाडांबाबत तज्ज्ञ समितीचा अहवाल घेऊन योग्य निर्णय घ्यावा. महाराष्ट्र शासनानेही गुजरात आणि इतर राज्यांच्या धर्तीवर संपूर्ण राज्यासाठी स्पष्ट शासन निर्णय काढून या झाडाच्या लागवडीवर प्रतिबंध घालावा, अशी ठाम मागणी निसर्गप्रेमी व नागरिकांकडून होत आहे. हिरवाई दाखविण्यासाठी कोणतेही झाड लावणे म्हणजे पर्यावरण संवर्धन नव्हे,नागरिकांचे आरोग्य आणि स्थानिक जैवविविधता जपणारी देशी झाडे लावणे, हीच खरी हरितक्रांती!

'रामायण'मधील कथित विपर्यासावर हिंदू जनजागृती समिती आक्रमक..!



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २४ : 'रामायण' चित्रपटातून मूळ वाल्मिकी रामायणाचा विपर्यास करून प्रभू श्रीराम, माता सीता आणि लक्ष्मण यांच्या व्यक्तिरेखांचे अवमूल्यन, तर रावणाचे उदात्तीकरण केल्याचा आरोप हिंदू जनजागृती समितीने केला आहे.

चित्रपटातील कथित आक्षेपार्ह दृश्ये वगळावीत आणि आगामी भागाच्या प्रदर्शनापूर्वी संत व रामायणाच्या अभ्यासकांकडून चित्रपटाची पडताळणी करावी, या मागणीसाठी समितीने २३ नोव्हेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत केंद्र शासन व सेन्सॉर बोर्डाला निवेदन दिले. उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी निवेदन स्वीकारले. दरम्यान, चित्रपटाचे निर्माते नमित मल्होत्रा व दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्याविरोधात मुंबईतील मुलुंड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आल्याचे समितीने सांगितले. धार्मिक श्रद्धास्थानांचे चित्रण करताना कलात्मक स्वातंत्र्याच्या नावाखाली मूळ ग्रंथाचा विपर्यास खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा देत निष्पक्ष चौकशी व कारवाईची मागणी समितीने केली आहे.

सेतू केंद्रांचे कंत्राट घेऊनही जीव्हीपी इन्फोटेकची कामात टाळाटाळ पाच केंद्रांना कुलूप!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २४ : नागरिकांना शासकीय सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या सेतू सुविधा केंद्रांच्या कामकाजाचा जीव्हीपी इन्फोटेक कंपनीने पुरता बोजवारा उडवल्याचे चित्र समोर आले आहे.

कार्यारंभ आदेश देऊन दोन महिन्यांहून अधिक काळ उलटूनही जिल्ह्यातील पाच सेतू केंद्रे अद्याप बंदच आहेत. दुसरीकडे, निविदेतील अटीनुसार आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यातही कंपनी अपयशी ठरल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. प्रशासनाने कारणे दाखवा नोटीस बजावूनही कंपनीकडून उत्तर न मिळाल्याने तिच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जिल्ह्यातील तहसील कार्यालयांच्या परिसरात असलेल्या १८ सेतू सुविधा केंद्रांसाठी जिल्हा प्रशासनाने निविदा प्रक्रिया राबवून जीव्हीपी इन्फोटेकला कंत्राट दिले. ३ सप्टेंबर २०२६ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला. निविदेतील अटींनुसार कंपनीने आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे अपेक्षित होते. मात्र, प्रत्यक्षात निम्म्याहून कमी मनुष्यबळ कार्यरत असल्याची बाब समोर आली आहे. प्रोजेक्ट मॅनेजर, सिस्टीम ॲनालिस्ट, नेटवर्क सिस्टीम ॲडमिनिस्ट्रेटर, प्रोग्रामर आणि ऑपरेटर अशा आवश्यक पदावरही पूर्ण क्षमतेने नियुक्त्या झालेल्या नाहीत. शासनाच्या 'आदर्श सेतू केंद्र' संकल्पनेनुसार नागरिकांना दर्जेदार, गतिमान आणि सुलभ सेवा मिळणे अपेक्षित असताना अपुऱ्या सुविधांमुळे विद्यार्थी, शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना हेलपाटे मारावे लागत आहेत. या गंभीर प्रकाराची दखल घेत जिल्हा प्रशासनाने कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागितला. मात्र, १० ते १५ दिवस उलटूनही समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. आता प्रशासन केवळ नोटिसांचा सोपस्कार करणार की कंत्राटातील अटींचा भंग करणाऱ्या कंपनीवर दंडात्मक कारवाई करून कंत्राट रद्द करणार? नागरिकांच्या सुविधांपेक्षा कंत्राटदाराच्या आश्वासनांना अधिक महत्त्व दिले जात आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.

थोडक्यात



पाटणबोरी येथे सत्य साई बाबांची १०१ वी जयंती उत्साहात

पाटणबोरी : येथील सत्य साई बाबा मंदिरात सत्य साई बाबांची १०१ वी जयंती विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली.
जयंतीनिमित्त सकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत स्वच्छता अभियान राबवून मंदिर परिसर व आजूबाजूचा परिसर स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर सकाळी ८ ते १० वाजेपर्यंत पूजा, अर्चना व अभिषेक करण्यात आला. सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंत साई भजन व महाआरती झाली. यावेळी साई नामाच्या जयघोषाने मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत साई समितीच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. जयंती सोहळा यशस्वी करण्यासाठी साई समितीचे अध्यक्ष नंदकुमार अर्गुलवार, सचिव गोपाळ कैलासवार, उपाध्यक्ष गजानन चवरडोल यांच्यासह भास्कर मालिकर, यादव मामीडवार, रत्नाकर उतरवार, गजानन भूपतवार, विनोद जंगमवार, सचिन कोगुरवार, संजय शहारे व समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.



सावंगी जुनीत जगदंबा माऊली महोत्सव उत्साहात!

वणी : यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्याच्या सीमेवरील सावंगी जुनी येथे जगदंबा माऊली माता महोत्सव तीन दिवस भक्तिमय आणि उत्साही वातावरणात संपन्न झाला. धार्मिक परंपरेसोबत सामाजिक प्रबोधन आणि ग्रामएकतेचा संदेश देणाऱ्या या महोत्सवात परिसरातील भाविकांसह माहेरवाशिणी, मुली-जावई आणि नातेवाईकांनी मोठी उपस्थिती लावली.
महोत्सवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांवर आधारित भजन, अमरावतीचे भारुडाचार्य सुमित महाराज मेश्राम यांचे प्रबोधनपर भारुड, ग्रामदिंडी आणि संत खेमराज तावडे महाराज यांचा दर्शन सोहळा पार पडला. तिसऱ्या दिवशी ग्रामस्वच्छता अभियान, जगदंबा माऊलीची महापूजा आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. रात्री कैलास नगर, साखरा येथील नाट्यमंडळाने 'गरीब बापाची व्यथा' हे सामाजिक आशयाचे नाटक सादर केले. माजी जिल्हा परिषद सदस्य विजय पिदूरकर यांच्या पुढाकारातून आयोजित या महोत्सवाच्या यशस्वितेसाठी युवक, देवस्थानचे सेवेकरी आणि ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. श्रद्धेसोबत सामाजिक बांधिलकी जपणारा हा सोहळा ग्रामएकतेचा आदर्श ठरला.

उपजिल्हा रुग्णालयावर चार सदस्यांची नियुक्ती!

आमदार राजु तोडसाम यांच्या सहमतीने नामनिर्देशन
पांढरकवडा : येथील उपजिल्हा रुग्णालयातील आरोग्य सुविधांचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने रुग्ण कल्याण समितीच्या नियामक व कार्यकारी मंडळावर चार सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आमदार प्रा. राजुभाऊ तोडसाम यांच्या सहमतीने ॲड. वंदना लोढा, दामोदर बाजोरिया, संजय झोटिंग आणि NGO प्रतिनिधी गणेश अत्राम यांची नामनिर्देशित सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णयानुसार ही नियुक्ती करण्यात आली असून, २४ नोव्हेंबर २०२६ रोजी वैद्यकीय अधीक्षकांनी अधिकृत नियुक्तीपत्र जारी केले आहे.
उपजिल्हा रुग्णालयात औषधांची उपलब्धता, वैद्यकीय सुविधा, स्वच्छता, रुग्णांच्या तक्रारी आणि उपचारांशी संबंधित अडचणी हे नेहमीच महत्त्वाचे विषय राहिले आहेत. त्यामुळे नवनियुक्त सदस्य केवळ समितीपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष रुग्णांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर ठोस पाठपुरावा करणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. समितीच्या बैठकीची तारीख लवकरच जाहीर होणार असून, नियुक्तीचे रूपांतर प्रत्यक्ष आरोग्य सुविधांच्या सुधारणेत होणे अपेक्षित आहे.

कर्जवसुलीच्या मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या मनमानीला लगाम कधी?

महिलांचे ग्रामपंचायतीला निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



झरी, दि. २४ : अनियमित पाऊस, शेतीचे घटलेले उत्पन्न आणि रोजगाराचा अभाव यामुळे ग्रामीण कुटुंबे आर्थिक संकटात सापडली असताना मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या कर्जवसुलीच्या तगाद्याने महिलांची अक्षरशः कोंडी केली आहे. हप्ते भरण्यास असमर्थता व्यक्त करूनही वारंवार दबाव आणला जात असल्याने माथार्जुन येथील महिलांनी आता प्रशासनाकडे धाव घेतली आहे.

२३ नोव्हेंबर रोजी महिलांनी ग्रामपंचायतीला निवेदन देऊन कर्जाचे हप्ते भरण्यास मुदतवाढ देण्याची मागणी केली. कर्ज घेताना कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांकडून प्रोत्साहन दिले जाते; मात्र आर्थिक परिस्थिती खालावल्यावर वसुलीसाठी तगादा लावला जात असल्याची खंत महिलांनी व्यक्त केली. अतिवृष्टी व प्रतिकूल हवामानामुळे शेतीचे नुकसान झाले असून उत्पन्नाचे साधन मर्यादित झाले आहे. घरखर्च, मुलांचे शिक्षण आणि दैनंदिन गरजा भागविताना हप्ते भरणे अशक्य होत आहे. त्यातच काही कर्मचाऱ्यांकडून वसुलीच्या नावाखाली शिवीगाळ आणि धमकावले जात असल्याचे गंभीर आरोप महिलांनी केले आहेत.

प्रशासनाने हस्तक्षेप करावा

आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी पुरेशी मुदत द्यावी, तसेच महिलांचा मानसिक छळ आणि बेकायदेशीर दबावतंत्र तातडीने थांबवावे, अशी मागणी करण्यात आली आहे. लवकरच तालुका व जिल्हा प्रशासनालाही निवेदन देण्यात येणार आहे. कर्जवसुलीच्या नावाखाली महिलांचा सन्मान आणि मानसिक स्वास्थ्य धोक्यात येत असेल, तर संबंधित कंपन्यांच्या कार्यपद्धतीची चौकशी कोण करणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

पुसद-काकडदाती रोडवर उभारलेल्या मीनाबाजारला नागरिकांचा विरोध..!

स्वतंत्र सुरक्षेची कोणतीही व्यवस्था नाही!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पुसद, दि. २४ : दिपकसिंह परिहार जिल्हा सरचिटणीस भाजपा व परिसरातील इतर नागरीक यांनी रहिवासी परिसरामध्ये मीना बाजारला ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येवू नये अशा विषयाचे निवेदन मुख्याधिकारी नगरपरिषद डॉ. किरण सुकलवाड देण्यात आले आहे.

सदर निवेदनात नमूद करण्यात आले की शिवराज पार्क हा परिसर रहिवासी परिसर असून निवेदक तथा अर्जदार सर्व येथे राहत आहोत. त्या करीता या परिसरामध्ये शेख महेबुब यांच्या मीना बाजारला परवानगी देवू नये. मीना बाजार हा रात्री उशीरापर्यंत सुरु राहतो सुरक्षेसंबंधीत त्यांच्याकडे स्वतंत्र व्यवस्था नाही. पुढे हिंदुचे मोठे सण दिवाळी, मकर संक्रात व इतर सण आहेत. अशा परिस्थितीमध्ये त्या मीना बाजारामध्ये टवाळखोर, चिडीमार मुलं मुलींची व महिलांची छेड काढण्याकरीता मोठ्या प्रमाणात फिरत असतात. अशा परिस्थिती मध्ये लव जिहाद सारखे प्रकार घडण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. तसेच मोठ्या प्रमाणात बुलेट मोटरसायकलचा कर्कश ध्वनी याचा नाहक त्रास आजूबाजूच्या परिसरातील नागरीकांना दररोज रात्री सहन करावा लागत आहे. या अशा गंभीर बाबींचा विचार करुन अशा बेकायदेशीर मीना बाजारास ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येऊ नये, जेणे करुन असे अनुचित प्रकार घडणार नाही. याची दक्षता आपण घ्यावी अशा विषयाचे निवेदन मुख्याधिकारी यांना देण्यात आले आहे तसेच सदर निवेदनाची प्रत उपविभागीय अधिकारी पुसद, पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन पुसद (शहर) यांना देण्यात आली आहे. संबंधित विषयाच्या निवेदनांवर नगरपरिषद मुख्याधिकारी हे कोणत्या प्रकारे दखल घेतात याकडे निवेदकांचे व परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

चार किलोमीटरच्या काकड दिंडीतून भक्ती परंपरेचा जागर, इटावा वार्डात सामूहिक श्रद्धेचा निनाद!



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. २४ : पहाटेच्या शांत वातावरणात टाळ-मृदंगाचा गजर, हरिनामाचा जयघोष आणि भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग अशा भक्तिमय वातावरणात पुसद येथील श्री महान तपस्वी हनुमंत बापू भजनी मंडळ संस्थानच्या काकड आरतीची आज (दि. २४ नोव्हेंबर) सांगता होत आहे. विठाळा वार्डातील मंदिरातून दररोज पहाटे निघणारी सुमारे चार किलोमीटरची दिंडी धार्मिक परंपरेसोबतच सामाजिक एकोप्याचेही दर्शन घडवणारी ठरली.

तुळजाभवानी मंदिर, नागदेवता मंदिर, मैनाबाई नगर आणि येरावार लेआऊट असा दिंडीचा मार्ग होता. लहान बालकांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटांतील भाविकांनी उत्साहाने सहभाग घेतला. दिंडी मंदिरात परतल्यानंतर सामूहिक आरती व भजन करण्यात येत असे. आधुनिक धावपळीच्या जीवनात धार्मिक परंपरांचा विसर पडत असताना पहाटेच्या सामूहिक नामस्मरणातून संस्कार, श्रद्धा आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश या उपक्रमाने दिला. काकड आरतीची सांगता होत असली तरी भक्तीची ही परंपरा कायम ठेवण्याचा संकल्प भाविकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

रोजगार व स्वयंरोजगार जिल्हाध्यक्षपदी इंजि. कुणाल जानकर यांची नियुक्ती

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



यवतमाळ, दि. २४ : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या यवतमाळ जिल्हाध्यक्षपदी इंजि. कुणाल जानकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

इंजि. कुणाल जानकर यांच्यावर पक्षाने सोपविलेली ही जबाबदारी ते निश्चितच सक्षमपणे पार पाडतील. त्यांच्या माध्यमातून जिल्ह्यातील बेरोजगार युवकांच्या समस्या, रोजगाराच्या संधी, स्वयंरोजगाराला प्रोत्साहन तसेच युवकांच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी प्रयत्न होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. या नियुक्तीचे संपूर्ण श्रेय यवतमाळ जिल्ह्यातील सर्व ज्येष्ठ नेतेमंडळी तसेच जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांना जाते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे व सहकार्यामुळे ही संधी प्राप्त झाली असून, सर्व नेतेमंडळी व पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहेत. इंजि. कुणाल जानकर यांच्या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून, पुढील संघटनात्मक वाटचालीसाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा देण्यात येत आहेत.

प्रशांत गावंडे यांना सलग दुसऱ्यांदा 'अवार्ड ऑफ एक्सलन्स'ने सन्मान.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पुसद, दि. २४ : जागतिक फार्मासिस्ट दिवसाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिल यांच्यावतीने दरवर्षी राज्यात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे फार्मासिस्ट,फार्मसी कॉलेज व असोसिएशन यांची निवड करण्यात येते. यावर्षी पुसद येथील जय संतोषी मेडिकल अँड जनरल स्टोअर्सचे संचालक फार्मासिस्ट प्रशांत गावंडे यांची वैयक्तिक फार्मासिस्ट म्हणून अमरावती विभागातून प्रथम क्रमांकाने 'अवार्ड ऑफ एक्सलन्स' साठी निवड करण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे सचिव अनिल नावंदर, महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिलचे सदस्य तथा ड्रग इन्फॉर्मेशन सेंटरचे प्रमुख गणेश बंगळे, बुलढाणा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे जिल्हा अध्यक्ष गजानन शिंदे, सचिव रामचंद्रजी आयलानी, डॉ. स्वाती देशमुख यांच्या हस्ते मान-सन्मान प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. विशेष बाब म्हणजे मागील वर्षी देखील त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना हाच पुरस्कार मिळाला होता. सलग दुसऱ्यांदा हा सन्मान मिळाल्याने पुसदसह महागाव तालुक्यातील उटी गावात आनंदाचे वातावरण तयार झाले आहे. गेल्या वीस वर्षांपासून कार्यरत असणारे प्रशांत गावंडे यांचे कार्य आहे.

त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल त्यांना यापूर्वी भरपूर पुरस्कार मिळाले आहेत, आज या पुरस्काराने त्यात आणखी एक भर पडली आहे.

शिवसेना शेतकरी परिषदेचे प्रदेशाध्यक्ष माजी आमदार शंकरअण्णा धोंडगे २६ नोव्हेंबरला यवतमाळ दौऱ्यावर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



उमरखेड , दि. २४ : राज्यासह यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी सध्या अस्मानी आणि सुलतानी अशा दुहेरी संकटांचा सामना करत आहेत. बळीराजाच्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि संघटनात्मक बांधणी अधिक भक्कम करण्यासाठी शिवसेना शेतकरी परिषदेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा माजी आमदार शंकरअण्णा धोंडगे आणि प्रदेश उपाध्यक्ष दत्ता पवार हे येत्या गुरुवारी, दिनांक २६ नोव्हेंबर २०२६ रोजी यवतमाळ जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

या दौऱ्यानिमित्त यवतमाळ येथील शासकीय विश्रामगृह (रेस्ट हाऊस) येथे दुपारी १:०० वाजता जिल्हास्तरीय महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीमध्ये सोयाबीन व कापसाला मिळणारा अत्यल्प हमीभाव, शेतमालाच्या भावातील अस्थिरता, नापिकी, अतिवृष्टी व नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले पिकांचे नुकसान आणि प्रलंबित पीक विमा मदतीबाबत या बैठकीत सविस्तर विचारमंथन होणार आहे. जिल्ह्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी उपाययोजना, पाणीटंचाई आणि शेतीशी निगडित इतर मूलभूत समस्यांवर चर्चा करून पुढील आंदोलनाची दिशा ठरवली जाणार आहे. यवतमाळ जिल्ह्यातील प्रत्येक तालुका आणि गावपातळीवर शिवसेना शेतकरी परिषदेची कार्यकारिणी विस्तारणे आणि नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडीबाबत विशेष नियोजन केले जाणार आहे. या महत्त्वपूर्ण बैठकीस जिल्ह्यातील शेतकरी प्रश्नांवर काम करणारे सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी, शिवसैनिक आणि शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेना शेतकरी परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. वि. ना. कदम यांनी केले आहे.

महागाव पोलीस ठाण्यात नूतन बॅडमिंटन मैदानाचे उद्घाटन

पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या शारीरिक तंदुरुस्तीसाठी उपक्रम

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



महागाव, दि. २४ : पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी होऊन त्यांना शारीरिक व मानसिकदृष्ट्या तंदुरुस्त राहता यावे, या उद्देशाने महागाव पोलीस ठाण्याच्या परिसरात नूतन बॅडमिंटन मैदान तयार करण्यात आले आहे.

या मैदानाचे उद्घाटन दि. २३ नोव्हेंबर २०२६ रोजी उमरखेड विभागाचे सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी गौरव कायंदे पाटील (भा.पो.से.) यांच्या हस्ते करण्यात आले. महागाव पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांच्या पुढाकारातून पोलीस ठाण्याच्या परिसरात हे बॅडमिंटन मैदान तयार करण्यात आले. तसेच पोलीस ठाण्याचे वार्षिक निरीक्षण असल्याने सर्व अभिलेख अद्ययावत करण्यासोबतच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या शारीरिक तंदुरुस्तीच्या दृष्टीने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी गौरव कायंदे पाटील यांनी बॅडमिंटन मैदानाचे उद्घाटन करून पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना नियमित व्यायाम, खेळ आणि शारीरिक तंदुरुस्तीचे महत्त्व अधोरेखित केले. दरम्यान, महागाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व नागरिकांनीही व्यसनांपासून दूर राहून योगा, व्यायाम व विविध खेळांचा अवलंब करावा आणि आपले आरोग्य निरोगी ठेवावे, असे आवाहन पोलीस विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

मोर्शीत लाडक्या बहिणींचा एल्गार...!

मोर्शी/वार्ताहर

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील सर्व प्रलंबित मागण्यासाठी २३ नोव्हेंबर रोजी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे विदर्भ संपर्कप्रमुख अमित अढाऊ यांच्या नेतृत्वात मोर्शी शहरासह तालुक्यातील शेकडो महिलांचा मोर्चा पंचायत समिती येथून थेट तहसील कार्यालयावर येऊन धडकला.यावेळी अपात्र केलेल्या लाडक्या बहिणींचा हप्ता त्वरित सुरू करण्यात यावा, निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनाची त्वरित पूर्तता करा अशासारख्या गगनभेदी घोषणा देऊन महिलांनी तहसील परिसर दणाणून सोडला होता. महिलांची प्रचंड गर्दी व फडणवीस सरकार विरुद्ध देण्यात येत असलेल्या नारेबाजीमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

अपात्र केलेल्या लाडक्या बहिणींना पुन्हा लाभ सुरू करावा, निवडणुकीपूर्वी १५०० पासून २१०० देण्याच्या आश्वासनाची त्वरित पूर्तता करण्यात यावी, लाडक्या बहिणीचे थकीत हप्ते त्वरित देण्यात यावे, वंचित असलेल्या लाडक्या बहिणींना योजनेत सामावून घेण्यात यावे, इ केवायसीमुळे वगळलेल्या ९२ लाख बहिणींना पुन्हा योजनेत सामावून घेण्यात यावे, इ केवायसीची मुदत वाढवून देण्यात यावी, ऑक्टोबर नोव्हेंबरचे हप्ते बिनाव्यत्यय जमा करण्यात यावे,लग्न झालेल्या बहिणी व योजनेत पात्र असलेल्या बहिणी यांच्यासाठी नवीन नोंदणी पोर्टल तात्काळ सुरू करण्यात यावे, वयाची अट थीतील करून वय १८ ते ६५ पर्यंत करण्यात यावी,

इ केवायसीसाठी पती किंवा वडिलांचा ओटीपी सक्तीचा केल्या जात आहे त्यामुळे विधवा घटस्फोटीत परित्यक्ता सासर माहेर तुटलेल्या बहिणींसाठी ही अट रद्द करा,आधार लिंक असूनही पैसे दुसऱ्या खात्यात जमा होतात यावर बँकेने तोडगा काढावा,प्रत्येक गावात ई केवायसी फॉर्म पडताळणीचा सगळं काम करणाऱ्या आशा वर्कर अंगणवाडी सेविका यांना योग्य मोबदला देण्यात यावा,लाडक्या बहिणीच्या पैसे जमा करण्याच्या हप्त्याची तारीख १ ते ५ ही करण्यासाठी शासन निर्णय काढण्यात यावा अशा मागण्या सभेला संबोधित करतांना क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे विदर्भ संपर्कप्रमुख अमित अढाऊ यांनी रेटून धरल्या. यावेळी गजानन अहमदाबादकर, मुरलीधर नाना डहाणे, डॉ.सृष्टी दौड, प्रवीण तायडे यांनी सभेला मार्गदर्शन केले. दरम्यान त्यांनी सरकारला थेट सवाल करून निवडणुकीपूर्वी प्रत्येक पात्र बहिणीला २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते त्याची अंमलबजावणी कधी करणार,महिलांच्या खात्यात १५०० जमा करून नंतर मोठ्या प्रमाणावर लाभ बंद करण्यामागचे नेमके कारण काय?पात्र महिलांना पुन्हा लाभ मिळवून देण्याची जबाबदारी सरकार घेणार का?नवीन पात्र महिलांसाठी अर्ज व निवड प्रक्रिया नियमित सुरू ठेवणार का?बंद करण्यात आलेले पात्र महिलांचे थकीत हप्ते सरकार देणार का?असे प्रश्न उपस्थित केले.येत्या आठ दिवसात या सर्व मागण्यांची सरकारने दखल घेऊन पूर्ण कराव्या.



शेकडो महिलांचा मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला

अन्यथा यापुढे क्रांतिकारी संघटनेच्या स्टाईलने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा अमित अढाऊ यांनी दिला आहे.

शेवटी एक लेखी निवेदन तहसीलदार सागर ढवळे यांचेमार्फत थेट महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना रवाना करण्यात आले.

आंदोलनाला कोणत्याही प्रकारचे गालबोट लागू नये यासाठी मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांनी आंदोलनस्थळी तगडा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.यावेळी क्रांतिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष संजय आपकाजे,उपजिल्हाध्यक्ष रवींद्र बुरंगे,प्रफुल्ल उमरकर,गजानन चौधरी, राजीव मुळे,प्रशांत राऊत, आकाश चिखले,सुरज चिखले, अनिकेत चिखले, शंतनू चिखले,अरुण राऊत,मंगेश बुरंगे, पुरुषोत्तम देवताळे, परसराम पारिसे यासह शेकडोच्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

गणेश व दुर्गादेवी मंडळाचा उपविभागीय पोलीस अधिका-यांच्या हस्ते सन्मान

खल्लार/वार्ताहर

खल्लार पोलीस स्टेशन हद्दीतील गणेशोत्सव व नवरात्रोत्सव शांततेत, उत्साहात आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यासाठी पारंपरिक वाद्यांचा वापर करून तसेच विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गणेश मंडळ व दुर्गादेवी मंडळांचा पोलिस विभागाच्या वतीने गौरव करुन सन्मान करण्यात आला.हा सन्मान सोहळा उपविभागीय पोलीस अधिकारी सतिश कुलकर्णी यांच्या हस्ते दर्यापूर येथे पार पडला. यावेळी खल्लारचे ठाणेदार अमोल मुडे, येवदयाचे पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रफुल्ल गाडेकर उपस्थिती होते.खल्लार हद्दीतील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गणेश मंडळांमध्ये बाल गणेश मंडळ, कोळंबी, स्वराज गणेश मंडळ, उपराई, गणपती देवस्थान गणेश मंडळ, ब्राम्हणवाडा या मंडळांचा गौरव करण्यात आला.त्याचप्रमाणे नवरात्रोत्सवादरम्यान पारंपरिक वाद्यांचा वापर, सामाजिक उपक्रम आणि शिस्तबद्ध आयोजन यामध्ये



उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल संत गाडगेबाबा दुर्गा उत्सव मंडळ, कसबेगव्हाण, नवयुवक नवदुर्गा उत्सव मंडळ, कोकर्डा,दुर्गादेवी उत्सव मंडळ, मोचर्डा या मंडळांचाही गौरव करुन सन्मान करण्यात आला.भविष्यातही सामाजिक बांधिलकी जपत शांततापूर्ण व पर्यावरणपूरक पद्धतीने सण-उत्सव साजरे करण्याचे आवाहन उपविभागीय पोलिस अधिकारी यांनी केले आहे.

इंडियन मेडिकल असोसिएशन अमरावती शाखेद्वारा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा 'महाकुंभ २०२६'

अमरावती/का.प्र.

२५ ते २९ नोव्हेंबर २०२६ दरम्यान इंडियन मेडिकल असोसिएशन अमरावती शाखेद्वारे इंडियन मेडिकल असोसिएशन च्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा 'महाकुंभ २०२६' चे भव्य आयोजन अमरावती येथे करण्यात आले आहे. हा राष्ट्रीय महाकुंभ हा अमरावती च्या मानात एक तुरा रोवणारा ठरेल असे प्रतिपादन आईएमए अमरावती चे वरिष्ठ सदस्य व राष्ट्रीय सह सचिव डॉ. वसंत लुंगे यांनी केले आहे.

या स्पर्धेने सर्व देशभारतील डॉक्टर यांच्यात एकजुटता, बंधुभाव तसेच सदभावना जोपासन्यात मदत होइल असे प्रतिपादन आईएमए अमरावती चे अध्यक्ष डॉ दिनेश वाघाडे यांनी केले आहे.सदर आय एम ए राष्ट्रीय क्रीडा महोत्सवामध्ये भाग घेण्यासाठी संपूर्ण देशभरातील विविध राज्यातून आयएमएचे खेळाडू सभासद सहभागी होण्यासाठी मोठ्या संखेने येणार आहेत. यामध्ये विशेषतः कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, दिल्ली, सिक्कीम, पंजाब, हरियाणा, पश्चिम बंगाल, तेलंगणा, आंध्र प्रदेश, छत्तीसगड, बिहार, महाराष्ट्र, झारखंड, मनिपुर, इत्यादी राज्यांचा मुख्यत्वे समावेश आहे.

आय एम ए च्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा महाकुंभ २०२६ च्या आयोजनासाठी अमरावती येथील विविध मैदाने, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, जलतरण तलाव, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ तसेच स्टेडियम येथे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांची तयारी जोरात सुरू आहे राष्ट्रीय स्पर्धांना साजेशे हे आयोजन सर्व खेळाडूंसाठी तसेच अमरावतीकरांसाठी एक विशेष पर्वणी ठरेल असा विश्वास आयोजन समितीने व्यक्त केला आहे सदर राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये क्रिकेट सीझन बॉल ऊ२० टूर्नामेंट, टेनिस बॉल क्रिकेट टूर्नामेंट, बॉक्स क्रिकेट टूर्नामेंट, टर्फ बॉल, लॉन टेनिस, टेबल टेनिस, बॅडमिंटन, पिकल बॉल, जलतरण, अथलेटिक्स, मॅरेथॉन हाफ मॅरेथॉन, बुद्धिबळ, कॅरम, सायकलिंग, गोल्फ, इत्यादी क्रीडा प्रकारांचा समावेश राहील.

महाकुंभ २०२६ या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांसाठी आयोजन समितीचे गठन करण्यात आले असून यामध्ये संयोजक डॉ वसंत लुंगे, सहसंयोजक डॉ दिनेश वाघाडे,आयोजन अध्यक्ष डॉ. जयप्रकाश बनकर, आयोजन सचिव- डॉ. सिकंदर अडवाणी, खजिनदार डॉ. रोहन बोबडे व डॉ. परीक्षित ठाकरे,, आयोजन सहअध्यक्ष डॉ. संदीप दानखडे, डॉ. भूपेश भोंड, डॉ. सोनाली शिरभाते, आयोजन संयुक्त सचिव- डॉ. आनंद काकाणी, डॉ. निलेश मोरे, डॉ. ऋतिका लोखंडे,मुख्य समन्वयक डॉ. धीरज सवाई, डॉ. सोहेल बारी, डॉ. प्रणित काकडे, डॉ. अनुपम राठोड, डॉ. भूषण सगणे, डॉ. अक्षय चांदूरकर, असून विविध क्रीडा स्पर्धांसाठी विविध क्रीडा समित्यांचे आयोजन करण्यात आले आहे.स्पर्धेचे उद्घाटन ज़िल्हा स्टेडियम येथे आईएमएचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ अनिलकुमार नायक यांचे हस्ते होनार आहे.कार्यक्रमाला डॉ जयेश लेले (नियोजित राष्ट्रीय अध्यक्ष),डॉ अनिल बोंडे(खासदार अमरावती),डॉ वसंत लुंगे (सहसचिव राष्ट्रीय आईएमए),डॉ अबुल हसन (नियोजित राष्ट्रीय सचिव),डॉ मंजुषा गिरी , तसेच डॉ संतोष कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. देशभरातून अनेक डॉक्टरॉंचे अमरावती मध्ये आगमन होणार असून त्यांचे स्वागता करिता अमरावती आईएमएची आयोजन समिती व अनेक सदस्य दिवस रात्र तयारीला लागले आहेत.

संक्षिप्त

राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत अनुज मिलखे याला कांस्यपदक

अमरावती- वर्धा येथे १९ व २० नोव्हेंबर रोजी आयोजित राज्यस्तरीय शालेय कराटे क्रीडा स्पर्धेत बडनेरा येथील सेंट फ्रान्सिस स्कूलचा विद्यार्थी अनुज गोपाल मिलखे याने कांस्यपदक पटकावले. उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत अनुजने मिळविलेल्या या यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एका मानाच्या तु-याची भर पडली आहे क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. राज्यभरातील खेळाडूंनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत अनुजने आपल्या कौशल्याच्या जोरावर कांस्यपदकाला गवसणी घातली. अनुजच्या या यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य रेव्हरंड फादर नोबीट यांनी त्याचे विशेष अभिनंदन केले. याप्रसंगी विद्यालयाचे क्रीडा विभागप्रमुख शुभम इंगळे, प्रशिक्षक पियुष खंडारे, योगेश वाकोडे, प्रतीक बुंदिले, साहिल राजपूत, गोविंद सिंग, अर्शद सिद्दिकी, क्षितिष मोहोळ यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अनुजचे अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांची वार्षिक आरोग्य तपासणी

अंजनगाव बारी- राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत जनता विद्यालय, अंजनगाव बारी येथे इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांची वार्षिक आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांची उंची, वजन आदींची नोंद घेऊन आरोग्यविषयक तपासणी करण्यात आली. ही तपासणी डॉ. वैशाली पाटील यांच्या उपस्थितीत पार पडली. उपक्रमावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक गजेंद्र अवघड,पर्यवेक्षिका मनीषा चिंचोळकर यांच्यासह सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते दरम्यान, बालहक्क सप्ताहाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना बालकांचे हक्क, आरोग्य, संरक्षण तसेच बालविवाह प्रतिबंध या महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यासोबतच बालकांच्या हक्कांची जाणीव करून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.



महानगरपालिकेत महर्षी सुदर्शन जयंती

अमरावती- महर्षी सुदर्शन यांची जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत संपन्न झाला. महर्षी सुदर्शन यांची जयंती निमित्य मा.महापौर श्रीचंद तेजवानी यांचे हस्ते महर्षि सुदर्शन यांचे प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले. मा.महापौर श्रीचंद तेजवानी यांनी महर्षि सुदर्शन जयंती निमित्त सर्व समाज बांधवांना शुभेच्छा दिल्या.यावेळी सभागृह नेता चेतन गावंडे, झोन सभापती इस्माईल कासम लालुवाले, नगरसेवक सचिन वैद्य, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त भाग्यश्री बोरेकर, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, गणेश तंबोले, अशोक पासरे, अजय कनोजे, नंदू धवसेल, शिवाजी मार्वे, रवि पछेल, मनोहर पंसे, किशोर पासरे, नरेश धवसेल, बबलु ईमले, विनोद पछेल, सुधीर पासरे, दिलीप पछेल, निलेश कनोजे, कुणाल ईमले, राम पछेल, सुरेश धवसेल, बंडू पछेल, निंदाने, सोनोने गुरुजी, विकास पछेल, संजय पासरे, जगदीश पछेल, लकी कनोजे, हर्षित धवसेल, आदित्य पासरे, सिध्दार्थ मानकर, वीर कनोजे, केदार ईमले, प्रमोद मोहोड, भुषण खडेकार, सतिश ताथोड, अखिलेश खडेकार, मंदार नानोटी, चैतन्य नांदुरकर, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



पर्यावरण अध्यायाची कन्याकुमारीमध्ये परिषद

अमरावती- हल्ली केंद्रीय आयएपीच्या पर्यावरण अध्यायाची वार्षिक परिषद कन्याकुमारी येथे संपन्न झाली. परिषदेच्या उद्घाटन सत्रात अध्याय अध्यक्ष शहराचे डॉ सतीश अग्रवाल यांनी गेल्या वर्षीच्या कार्यवाहीबाबत माहिती दिली. परिषदेतील प्रतिष्ठित 'डॉ परमेश ओरेशन' मध्ये केरळचे वरिष्ठ बालरोगतज्ञ डॉ सुकुमारन यांनी मार्गदर्शन केले या परिषदेत डॉ परमेश्वर, डॉ रमेशकुमार, डॉ आनंद केशवन, डॉ रमेश बाजानिया, डॉ सतीश अग्रवाल सह डॉ सोमशेखर, डॉ नौशीद, डॉ नर्मदा, डॉ गीता पाटील, डॉ मिनोल अमीन, डॉ तृप्ति महात्मे, डॉ हरी कुमार, डॉ शिबू इ नी मार्गदर्शन केले. परिषदेच्या सफलतार्थ डॉ बालासंकर, डॉ तनप्पन, डॉ सुरेश बालन, डॉ सोमसुंदरम, डॉ वेंकटेश, डॉ प्रदीप इ. नी श्रम केले. या यशस्वीतेबद्दल आयएपीच्या डॉ प्रतिभा काळे, डॉ आदित्य टांक, डॉ सूरज बंसोड व आयएमएचे डॉ दिनेश वाघाडे, डॉ विक्रम वानखडे इ नी त्यांचे अभिनंदन केले.

आयआयएमसीच्या विद्यार्थ्यांनी केला नागपूरचा शैक्षणिक दौरा

आकाशवाणी दूरदर्शन सह समजून घेतली वृत्तपत्राची कार्यप्रणाली

अमरावती/का.प्र.

भारतीय जन संचार संस्थानच्या (आयआयएमसी) विद्यार्थ्यांनी नागपूर येथील आकाशवाणी, दूरदर्शन केंद्रासह दैनिक भास्कर वृत्तपत्र कार्यालयाचा शैक्षणिक दौरा केला. यावेळी विद्यार्थ्यांनी रेडिओ, टीव्ही ची कार्यप्रणाली, प्रसारण तंत्रज्ञान आणि वृत्तपत्र निर्मितीची प्रक्रिया समजून घेत संपादकांशी संवाद साधला .



भारतीय जन संचार संस्थानच्या विद्यार्थ्यांचा नागपूर शहरात शैक्षणिक अभ्यासदौरा दिनांक २३ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी दूरदर्शन केंद्राचे सहाय्यक संचालक (अभियांत्रिकी) अविनाश निमजे, मनोहर नंदनवार, प्रवीण निनावे, आकाशवाणी केंद्राचे कार्यक्रम प्रमुख विजय राजपूत, कार्यक्रम अधिकारी सतीश रेवे, दैनिक भास्करचे समूह संपादक प्रकाश दुबे, संपादक मणिकांत सोनी आणि क्षेत्रीय संपादक संजय देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी दूरदर्शन केंद्रातील कार्यक्रम स्टुडिओ, संपादन कक्ष, प्रसारण प्रणाली समजून घेतली. टीव्ही साठी चर्चा सत्र आणि मुलाखत घेण्याची प्रक्रिया प्रत्यक्ष अनुभवली. आकाशवाणी केंद्रात विद्यार्थ्यांनी रेडिओसाठी बातमी लेखन, वार्ताकन, निवेदनाची प्रक्रिया अभ्यासली. यासोबत वृत्त कक्षासह, चर्चा, संगीत, नाट्य स्टुडिओ आणि प्रसारण कक्षाची कार्यप्रणाली जाणून घेतली.

दैनिक भास्कर कार्यालयाच्या भेटीत विद्यार्थ्यांनी बातमी संकलन ते वृत्तपत्र संपादन पर्यंतच्या प्रक्रियेचे बारकावे समजून घेतले. समूह संपादक प्रकाश दुबे आणि संपादक मणिकांत सोनी यांच्याशी संवाद साधला. यावेळी समूह संपादक प्रकाश दुबे यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्यात.अभ्यासदौऱ्यात संस्थानचे क्षेत्रीय संचालक डॉ.राजेश सिंह कुशवाहा, डॉ.विनोद निताळे,रोहन तायडे, जयंत सोनोने यांच्यासह पत्रकारिता अभ्यासक्रमाचे विद्यार्थी सहभागी होते.

दोन दिवसीय तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी

बालवैज्ञानिकांच्या नवकल्पनांना मिळणार व्यासपीठ

अमरावती/का.प्र.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती आणि सर्जनशील कौशल्य विकसित व्हावे, तसेच त्यांच्या कल्पकतेला योग्य व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने भातकुली तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन २०२६ चे आयोजन गुरुवार २६ व शुक्रवार २७ नोव्हेंबर २०२६ रोजी राष्ट्रीय शेतकी विद्यालय, खोलापूर, ता. भातकुली, जि. अमरावती येथे करण्यात आले आहे.

भातकुली पंचायत समिती शिक्षण विभाग, भातकुली तालुका मुख्याध्यापक संघ, भातकुली तालुका विज्ञान अध्यापक मंडळ आणि राष्ट्रीय शेतकी विद्यालय, खोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने या विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.२६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता प्रतिकृती नोंदणी व मांडणी, तर सकाळी ११ वाजता प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. उद्घाटनप्रसंगी विधान परिषद सदस्य माजी विद्यार्थी राजीवजी पोतदार उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी टापर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अश्विनकुमार के. टापर राहतील. विधानसभेचे सदस्य राजेशजी वानखडे विशेष प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

यावेळी टापर शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. किरणकुमार के. टापर, शिक्षणाधिकारी सिद्धेश्वर काळूसे, गटशिक्षणाधिकारी रामेश्वर माळवे, माजी मुख्याध्यापक संजीव काळे, अमरावती जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रवीण दिवे, सचिव प्रदीप नानोटे, भातकुली तालुका मुख्याध्यापक संघाचे सचिव अमोल महाले, कार्याध्यक्ष सय्यद रेहान यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.शुक्रवार २७ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता प्रदर्शनातील प्रतिकृतींचे मूल्यमापन होईल. दुपारी १२.३० वाजता अतिथी-विद्यार्थी स्नेहभोजन, तर दुपारी २ वाजता समारोप समारंभ व पारितोषिक वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी टापर शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. किरणकुमार के. टापर राहणार असून, विशेष प्रमुख अतिथी म्हणून शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख, तर प्रमुख अतिथी म्हणून उपशिक्षणाधिकारी निखिल मानकर, डॉ. इमरान खान आणि रमेश्वर माळवे उपस्थित राहणार आहेत.तसेच विज्ञान अध्यापक मंडळाचे पदाधिकारी, शिक्षण विभागातील अधिकारी व विविध शैक्षणिक क्षेत्रांतील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. समारोपानंतर सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रे व शिक्षकांना कार्यक्रम सहभागाची प्रमाणपत्रे वितरित करण्यात येणार आहेत.



दुष्काळातही हिरवाईचा संकल्प

हंतोड्यात आविष हंतोडकर लावणार एक हजार वृक्ष

अंजनगाव सुर्जी/वार्ताहर

दुष्काळाची गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन हंतोडा येथील वृक्षप्रेमी व सामाजिक कार्यकर्ते आविष हंतोडकर यांनी वृक्षारोपणाचा मोठा उपक्रम हाती घेतला आहे. निसर्ग संवर्धनासाठी त्यांनी घेतलेला हा पुढाकार संपूर्ण गावासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरत आहे.

यावर्षी दुष्काळाचे सावट अधिक गडद होत असताना आविष हंतोडकर यांनी एक हजार वृक्ष लावण्याचा संकल्प केला आहे. त्या अनुषंगाने आजपासून हंतोडा येथे वृक्षारोपणाला सुरुवात करण्यात आली. आपल्या शेतात तसेच गावठाण जागेवर त्यांनी वेगवेगळ्या जातींचे वृक्ष लावले आहेत.

आविष हंतोडकर हे नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. गावातील प्रत्येक सामाजिक उपक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग असतो. वृक्ष लागवड ही केवळ एक मोहीम नसून ती पुढच्या पिढीसाठीची गुंतवणूक आहे, ही त्यांची भूमिका आहे.

त्यामुळेच त्यांनी यावर्षी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीचा निर्णय घेतला.या उपक्रमात त्यांना हंतोडा येथील उपसरपंच सत्यविजय उंबरकर यांची मोलाची साथ लाभली आहे. उपसरपंच सत्यविजय उंबरकर, ग्रामपंचायत सदस्य किशोर आठवले, शेतकरी रामरावजी आठवले यांच्यासह गावातील अनेक गावकरी या उपक्रमात सहकार्य करीत आहेत.

यावेळी बोलताना उपसरपंच सत्यविजय उंबरकर म्हणाले, आज लावलेले एक झाड उद्याच्या पिढीला सावली देईल, शुद्ध हवा देईल आणि जीवन देईल. त्यामुळे प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन केले पाहिजे. आविष हंतोडकर यांचा हा उपक्रम इतर तरुणांसाठीही आदर्श आहे.

वृक्षारोपणासोबतच लावलेल्या झाडांचे संवर्धन करण्यावरही यावेळी भर देण्यात आला. केवळ झाडे लावून न थांबता ती जगवणे, त्यांना पाणी देणे, त्यांचे संरक्षण करणे ही खरी जबाबदारी असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले. दुष्काळाच्या काळात वृक्षारोपणा सारखा उपक्रम हाती घेतल्याबद्दल आविष हंतोडकर यांचे गावकऱ्यांकडून कौतुक होत आहे. त्यांच्या या कार्यामुळे हंतोडा गाव हिरवेगार होण्याच्या दिशेने वाटचाल करेल, असा विश्वास गावकऱ्यांनी व्यक्त केला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

साठ वर्षांपूर्वीच्या आठवणी

इतिहास चाळताना १९५७-२०१७

किशोर देशपांडे

साठ वर्षांपूर्वीचे अमरावती शहर आजच्यापेक्षा खूप वेगळे होते. पैशाची चणचण होती, पण मनाची श्रीमंती होती. चुलीवरच्या भाकरीला चव होती, शेजार हाच परिवार होता. त्या साध्या, सुंदर आणि आठवणींनी भरलेल्या काळात डोकावण्याची ही एक छोटीशी सफर आम्ही किशोर देशपांडे यांच्या 'साठ वर्षांपूर्वीच्या आठवणी' या लेखमालेतून आपल्या समोर मांडत आहोत.चला,तर त्या आठवणींना पुन्हा उजाळा देऊया...





सध्या ज्या विभागाला पश्चिम विदर्भ म्हटले जाते त्यास पूर्वी वऱ्हाड प्रांत म्हणायचे. अमरावती, अकोला, यवतमाळ व बुलढाणा हे चार जिल्हे वऱ्हाडात होते. नंतरच्या काळात अकोला आणि यवतमाळच्या काही तालुक्यांना एकत्र करून वाशिम हा पाचवा जिल्हा करण्यात आला. वऱ्हाड प्रांताचा इतिहास गमतीदार आहे.

१८५३ पर्यंत वऱ्हाड निजामाच्या राज्यात होते. त्यावर्षी स्वतःच्या हैदराबाद संस्थानाच्या रक्षणासाठी निजामाने इंग्रजांची तैनाती फौज मागवून घेतली. त्या फौजेचा खर्च भागावा म्हणून इंग्रजांनी निजामाकडून वऱ्हाडच्या कारभाराचे व महसूल वसुलीचे अधिकार मागून घेतले.१९०२ पर्यंत वऱ्हाड प्रांत नावाला जरी निजामाच्या मालकीचा मानला जात होता, तरी प्रत्यक्ष अधिकार मात्र ब्रिटीशांचा होता.१९०२ सालापासून मात्र ब्रिटिशांना वऱ्हाड प्रांताचे सर्व हक्क व अधिकार प्राप्त झाले आणि त्यांनी हा प्रांत मध्यप्रांताला जोडून घेतला. १९३६ पासून मध्य प्रांत व वऱ्हाड (C.P. & Berar) हा राजकीय व प्रशासकीय दृष्ट्या एकच प्रदेश राहिला. १९५० साली स्वातंत्र्यानंतर याच प्रदेशाचे नाव बदलून मध्य प्रदेश ठेवण्यात आले.

स्वातंत्र्यानंतर लवकरच भाषिक राज्य व्हावेत यासाठी चळवळी सुरु झाल्या. सर्व मराठी भाषकांचे एकच राज्य असावे अशी मागणी विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात व खानदेशात वाढू लागली. परंतु नेहरू त्यासाठी आधी अनुकूल नव्हते.१९५३ साली पश्चिम महाराष्ट्रातील व विदर्भातील नेत्यांनी एकत्र येऊन नागपूर करार केला. त्या करारानुसार संपूर्ण विदर्भ महाराष्ट्रात सामील करावा व त्याबदल्यात विदर्भाला काही लाभ मिळावे, अशा तरतुदी होत्या. मात्र विदर्भात संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीने फारसे बाळसे धरलेले मला तरी आठवत नाही. खरे तर राज्य पुनर्रचनेसाठी फाझल अली यांच्या अध्यक्षतेखाली जो आयोग नेमण्यात आला त्या आयोगाने १९५५ साली विदर्भाचे वेगळे राज्य करण्यात यावे, अशी शिफारस केली होती.

मात्र १९५६ साली मुंबई या राजधानीसह मराठी व गुजराती भाषक लोकांचे एक द्वैभाषिक राज्य निर्माण करण्यात आले. त्यात विदर्भाचा म्हणजे वऱ्हाडचा ही समावेश होता.अशा रीतीने वऱ्हाडचे स्वतंत्र अस्तित्व कायमचे संपले.१ मे १९६० रोजी यशवंतराव चव्हाणांनी दिल्लीहून स्वतंत्र महाराष्ट्र राज्याचा मंगल कलश आणला आणि ते सध्याच्या महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री ठरले. स्वतंत्र विदर्भाच्या चळवळीत बहुजन समाजाचा सहभाग त्यावेळी नव्हता. पुढे जांबुवंतराव धोटे यांच्या नेतृत्वात पुन्हा स्वतंत्र विदर्भाच्या मागणीने जोर धरला, त्यावेळी मात्र त्यांना बहुजनांची बरीच साथ मिळाली. तोपर्यंत स्वतंत्र विदर्भ राज्य झाल्यास इथे शेटजी-भटजींचे राज्य येईल, अशीच बहुजन समाजाची धारणा होती.

अश्या रीतीने मी प्राथमिक शाळेत असतानाच अमरावती जिल्ह्याचा बसल्या जागी तीन राज्यांमधून प्रवास झाला.आधी मध्य प्रदेश,मग मुंबई द्वैभाषिक राज्य आणि नंतर महाराष्ट्र.त्यामुळे भूगोलाच्या वर्गात दरवर्षी गडबड व्हायची.नागपूर ही आधी मध्य प्रांत व वऱ्हाड ची राजधानी होती.मध्य प्रदेश झाल्यानंतर ती राजधानी भोपाळला गेली आणि मुंबई व महाराष्ट्र राज्यांच्या निर्मितीनंतर मुंबईला आली. म्हणूनच नागपूर मध्ये विधीमंडळ, उच्च न्यायालय, प्रशासकीय कार्यालये यांच्या भव्य इमारती पूर्वीपासून आहेत.

भाग- २

आमच्या बालपणी नुकत्याच मिळालेल्या स्वातंत्र्यानंतर देशाची नव्याने घडी बसविण्याचे केंद्र व राज्य शासनांचे, संसदेचे आणि विधी मंडळांचे जोमदार प्रयत्न सुरु होते.राज्यांच्या पुनर्रचनेसोबतच देशातील चलनव्यवस्था आणि वजने व मोजमापांची व्यवस्था देखील बदलू लागली. ब्रिटीश भारतात येण्यापूर्वी प्रत्येक संस्थानिक आपापले नाणे पाडत असे. देशभरात एकच चलन नव्हते. असे म्हणतात की सदाशिवराव पेशव्यांनी पानिपतावर जाताना आधी दिल्ली काबीज करून तिथले बादशहाचे तख्त फोडले आणि आपल्या उपाशी फौजेसाठी नाणी तयार करून घेतली.



ब्रिटिशांनी मात्र १८३५ साली 'Coinage Act' पारित करून रुपये, आणे, पै असे चलन अस्तित्वात आणले. तेच चलन वऱ्हाडातही १९५७ पर्यंत अस्तित्वात होते. एक रुपया =१६ आणे = ६४ पैसे = १९२ पैसे असे ते चलन होते. ३ पै म्हणजे १ पैसा, ४ पैसे म्हणजे १ आणा आणि १६ आणे म्हणजे १ रुपया. ८ आणे (अधली),४ आणे(पावली),२ आणे, १ आणा, २ पैसे, १ पैसा ही नाणी मी स्वतः बालपणी वापरली आहेत. पै हे नाणे मात्र मला आठवत नाही.१पैश्यात लिमलेट च्या दोन गोळ्या मिळायच्या आणि २ आण्यात कटिंग व्हायची.मी असे ऐकले आहे की त्या काळात अकुशल मजुरांना दिवसाची मजुरी एक रुपयापेक्षा कमीच असायची. तीन आकडी म्हणजे शंभर रुपयाहून अधिक पगार असणारे माणसं सुस्थितीत असायचे. प्राथमिक शिक्षकांना १० ते २० रुपये महिना पगार मिळायचा. शहरात कोणाला हजार रुपयापेक्षा अधिक मासिक उत्पन्न आहे असे कळले की आम्हाला नवल वाटायचे. भारताच्या राष्ट्रपतीचा पगार दरमहा दहा हजार रुपये असतो, असे ऐकल्यावर तर आमचे डोळे पांढरे व्हायचे. राष्ट्रपती पेक्षा अधिक पगार कोणालाही नसतो, असेही आम्ही ऐकायचो.

१ एप्रिल १९५७ पासून भारत सरकारने चलनांच्या बाबतीत दशमान पद्धतीचा स्वीकार केला आणि चलन व्यवस्था सुटसुटीत झाली. एक रुपया म्हणजे १०० पैसे अशी ही नवी व्यवस्था होती, जी आजपर्यंत कायम आहे. जुने पैसे टप्प्याटप्प्याने बंद करण्यात आले. तोपर्यंत नवीन पैश्यांच्या नाण्यांवर 'नये पैसे' असे छापले जात असे. १९६४ नंतर मात्र



'नये' किंवा 'नया' न लिहिता नुसतेच पैसे किंवा पैसा लिहिले जात असे. प्राथमिक शाळेत आम्हाला दोन्ही चलनांचा अभ्यास करावा लागे. जुनी पद्धत किचकट होती.

वजन मापांच्या बाबतीतही पूर्वी तसाच किचकटपणा होता.१९५८ पर्यंत आपल्याकडे लांबी रुंदी मोजण्याचे माप म्हणजे इंच,फुट,यार्ड, फर्लांग, मैल आणि कोस असे होते. अजूनही आपण ते पूर्णपणे विसरलेलो नाही.१२ इंच = १ फुट,३ फुट=१ यार्ड,२२० यार्ड=१ फर्लांग,८ फर्लांग=१मैल,२ मैल = १ कोस अशी ही मापे होती.शेतजमिनीचे मोजमाप गुंठे आणि एकरात होत असे. ४० गुंठे म्हणजे १ एकर.

१९५८ साली मेट्रिक पद्धती अमलात आली आणि मिलीमीटर, सेंटीमीटर, मीटर, किलोमीटर, हेक्टर, आर अशी अधिक सुटसुटीत दशमान पद्धत रूढ होऊ लागली. दहा मि.मी. = १ से.मी., अडीच से.मी. = १ इंच, १०० से.मी.= १ मीटर आणि १००० मीटर=१ किलो मीटर, असे ते सोपे गणित आहे. एक गुंठ्यापेक्षा एक आर किंचित लहान असतो.साधारणतः अडीच एकरांचा एक हेक्टर भरतो. मराठी साहित्यात 'मैलाचा दगड','फुटपट्टी' हे शब्द रूढ झाले ते अजूनही वापरात आहेत.त्याच प्रमाणे हेक्टर आर पद्धतीने महसूल अभिलेखात जमिनींचे क्षेत्रफळ नोंदविले जात असले,तरी प्रत्यक्षात भाव मात्र दर एकरी प्रमाणेच ठरविले जातात.

या दोन्ही पद्धतींचा तुलनात्मक अभ्यास करण्याचे ओझे प्राथमिक शाळेतच आमच्या खांद्यावर टाकले गेले.इतकेच नव्हे तर त्या काळात कॅल्क्युलेटर नावाचे यंत्र अस्तित्वात नसल्यामुळे गणिताची किचकट आकडेमोड स्वतःचे डोके वापरून करावी लागत असे.शिवाय आम्हाला नेहमीच्या पाढ्यांसोबत पावकी, निमकी, दिडकी असे पाढे देखील पाठ करावे लागत. म्हणजे '१ पाव पाव, २ पाव अर्धा, ३ पाव पाऊण, ४ पाव १' असे घोकावे लागे.

(क्रमशः)

मो.नं.९८८१५७४९५४

स्व.डॉ.रमेश गोडबोले स्मृती सेवा पुरस्कार- २०२६



स्व. डॉ. रमेश गोडबोले हे नाव विदर्भात सुपरिचित आहे. वैद्यकीय क्षेत्रात त्यांनी आपल्या अविरत सेवांनी नावलौकीक प्राप्त केला होता. बडनेरा येथील जुन्या वस्तीतील त्यांचे रुग्णालयात समाजातील सर्व स्तरातील रुग्णांना उत्तम वैद्यकीय उपचार मिळायचे. संपूर्ण आयुष्य डॉ. रमेश गोडबोले यांनी अत्यल्प दरात रुग्णसेवा केली. त्यांच्या प्रदीर्घ वैद्यकीय कारकिर्दित त्यांचा देशभरातील अनेक तज्ञांशी निकटचा संपर्क होता व त्यामुळे बडनेरा-अमरावतीच काय तर विदर्भातील निकटवर्तीय रुग्णांना डॉ. रमेश गोडबोले यांनी पाठवले आहे असे सांगितल्यावर उत्तम वैद्यकीय सेवा प्राप्त व्हायच्या.

डॉ.रमेश गोडबोले यांचा वैद्यकीय सेवेसोबतच धर्म कार्यातही व आध्यात्मिक क्षेत्रात पुढाकार असायचा. व्यक्तिशः उत्तम कीर्तनकार असल्याने त्यांनी अनेक मंदिरात आपली कीर्तन सेवा प्रस्तुत केली. यात प्रमुख्याने झिरी येथील श्री दत्त मंदिर, बडनेरा जुन्या वस्तीतील श्रीराम मंदिर, अंबापेठ अमरावती येथील श्री गोपाळकृष्ण मंदिर, श्री अंबादेवी मंदिर, श्री एकवीरा देवी मंदिर अशी अनेक नावे त्यात जोडता येतील. डॉ. रमेश गोडबोले यांनी अनेक मंदिरे व न्यासांमध्ये विश्वस्त म्हणूनही आपल्या सेवा दिल्या आहेत. यासोबतच त्यांनी जगविख्यात श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी देखील अंतीम श्वासापर्यंत समर्थपणे सांभाळली. बडनेरा येथे त्यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनात अद्ययावत अशी संत गाडगेबाबा रक्तपेढी सुरु करण्यात आली व त्याद्वारे रुग्णांना गुणवत्तेच्या सर्व पातळ्यांवर उत्तम सेवा देणे अविरत सुरु आहे.

डॉ. रमेश गोडबोले यांचे व्यक्तिमत्व सेवा परमो धर्म या प्रवृत्तीचे होते. त्यांच्या या अद्वितीय कार्याची स्मृती कायम रहावी, त्यांच्या पश्चात राहिलेले सेवाकार्य सतत पुढे जावे व त्यांच्या कार्यातून प्रेरणा मिळून अनेकांनी सेवाव्रती व्हावे याकरीता तसेच आध्यात्मिक क्षेत्रातील व्यक्ती किंवा संस्थांना 'स्व. डॉ. रमेश गोडबोले स्मृती सेवा पुरस्कार' देऊन गौरवान्वित करण्यास सुरुवात केली असून पुरस्काराचे हे तिसरे वर्ष आहे. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. रमेश गोडबोले स्मृती प्रतिष्ठान या न्यासाच्या अंतर्गत करण्यात येते. पुरस्कार निवडताना जो निकष लावण्यात आला आहे तो म्हणजे पुरस्कार प्राप्त व्यक्ति किंवा संस्थेचे कार्य अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचले जावे, किंबहुना तशी निकड असावी, पुरस्कार राशीची गरज असलेली व्यक्ति किंवा संस्था असावी, पुरस्कार प्राप्त व्यक्ति किंवा संस्थेच्या कार्याला गती मिळावी. पुरस्काराचे स्वरुप रु. १ लक्ष गौरव राशी, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे असणार आहे.

यावर्षी पुरस्काराचे वितरण शनिवार २८ नोव्हेंबर २०२६ रोजी, स्थानिक श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसतकर सभागृहामध्ये सायं. ६.०० वाजता डॉ. वेदप्रकाश मिश्रा, मुख्य सल्लागार, लता मंगेशकर युनिव्हर्सिटी, नागपूर यांच्या शुभहस्ते तसेच श्री. श्रीपाद अपराजित, माजी संपादक, महाराष्ट्र टाईम्स, नागपूर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

मागील वर्षीचा पुरस्कार प्रज्ञा प्रबोधिनि, अमरावती या संस्थेला देण्यात आला होता तर यावर्षीचा पुरस्कार अमरावती येथील विदर्भ महारोगी सेवा समिती, तपोवन अमरावती या संस्थेला देण्याचे निवड समितीने एकमताने ठरविले आहे. समाजाने, नातेवाईकांनी नाकारलेल्या महारोगींना येथे आश्रय दिला जातो तसेच त्यांना स्वयंपूर्णतेकडे नेऊन सन्मानाने जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते.पुरस्काराचे स्वरूप रुपये एक लाख रोख, स्मृतिचिन्ह तसेच कार्यगौरव पत्र असे असणार आहे.

शनिवार २८ नोव्हेंबर रोजी आयोजित कार्यक्रमात अमरावती शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येत उपस्थित रहावे असे आवाहन डॉ. रमेश गोडबोले स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

स्व. डॉ. रमेश गोडबोले स्मृती प्रतिष्ठान,
अमरावती

स्त्रीच्या अदृश्य कष्टांचे मोल!

सरकारच्या रोजगारविषयक सर्वेक्षणांमध्ये महिलांच्या विनामोबदला कामांची नोंद घेण्याला महत्त्व दिले जात आहे.'टाईम यूज सर्व्हे'मधून महिला आणि पुरुष घरकामासाठी किती वेळ देतात, यातील तफावत स्पष्ट होते. घरकामासाठी बाहेरून व्यक्ती नेमल्यास किती खर्च येईल किंवा महिलेने त्याच वेळेत रोजगार केला असता तर किती उत्पन्न मिळाले असते, अशा निकषांवर तिच्या श्रमांचे आर्थिक मूल्य निश्चित करता येते. मात्र, केवळ पैशांच्या आकड्यांतून तिच्या योगदानाचे संपूर्ण मोल व्यक्त होऊ शकत नाही.वास्तविक, घरकामाच्या जबाबदाऱ्यांमुळे अनेक महिलांना शिक्षण,रोजगार, व्यवसाय आणि स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी पुरेसा वेळ मिळत नाही.त्यांचे आर्थिक स्वावलंबन मर्यादित राहते. परिणामी कुटुंबातील निर्णयप्रक्रियेतही त्यांचे स्थान दुय्यम राहण्याची शक्यता असते.शेवटी,घर सांभाळणारी महिला ही कुटुंबाच्या अर्थव्यवस्थेचा अदृश्य आधार आहे.तिच्या कामाला वेतन नसले तरी त्याचे सामाजिक आणि आर्थिक मूल्य निश्चितच आहे. महिलांच्या श्रमांची मोजदाद करणे म्हणजे केवळ आकडेवारीत त्यांची भर घालणे नव्हे,तर त्यांच्या कष्टांना प्रतिष्ठा, समानता आणि सन्मान देणे होय.महिलांच्या श्रमांचा सन्मान ज्या दिवशी घरातून सुरू होईल,त्याच दिवशी खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानतेच्या समाजाची पायाभरणी होईल.

शशिकांत तोटे
मो:९१३०८३५४५८

स्त्रीची मांडी बघितल्यानंतर ज्यांना सेक्स आठवतो त्यांच्या डोक्यात मांडीचे कार्य हे 'फक्त सेक्सशी' निगडित आहे हे डोक्यात पक्क रुजलेले असते! म्हणजे जेव्हा केव्हा स्त्रीकडे पाहिले जाईल तेव्हा तेव्हा तिचा प्रत्येक शरीर अवयव लैंगिक दृष्टिकोनातून पाहिला जाईल..

*या*च्या उलट, जे स्त्रीचा अवयव, कोणताही असो, तो लैंगिक दृष्टिकोनातून न पाहता त्याचे इतरही कार्य असतात हे महत्त्वाचं मानतात ते, 'स्त्री म्हणजे लैंगिक अवयवांचे शरीर' असे गणित डोक्यात ठेवत नाहीत.

आपण उदाहरण बघूया. नऱ्या-अमत्याची गँग गोव्याला बीचवर जाते.ते फक्त स्त्रियांच्या मांड्या बघायला,बीचवरील स्त्रियांचे इतर सर्व अवयव बघायला. कारण स्त्रीचे अवयव बघणे म्हणजे,'सौंदर्य बघणे आणि उपभोग घेणे'!ज्याला 'नेत्र सुख' म्हणतात, ते डोक्यात बसलेले आहे.अशा गँगची दृष्टी ही 'स्त्री म्हणजे उपभोग्य वस्तू' एवढेच असते.म्हणूनच ही गँग जेव्हा घरी येते, तेव्हा आपल्या घरातील स्त्रियांना शरीर झाकायला सांगते. म्हणजे इथे दुटप्पीपणा असतो. घरातल्या स्त्रीवर डोक्यातले पुरुषी संस्कार लादणे आणि बीचवरील स्त्रीचे शरीराचे झंकार भोगणे. आजवर स्त्री जिथे कुठे असेल तेथे ही बीच वरची नजर वखवखवत असते. अगदी स्वतःच्या धर्मस्थळातील येणाऱ्या स्त्रियांकडे पाहताना देखील!

दुसरी एक गँग आहे, राहुल्या आणि त्याची गँग. गोव्याला जाते आणि तेथे बीचवर चालणाऱ्या वॉटर स्पोर्ट्सचे आणि बीचवर होणाऱ्या सर्व स्त्रियांच्या हालचाली पाहते.पण त्यात कुठेही लैंगिक नजर नसते. त्या नजरेत एक शारीरिक हालचाल त्या त्या स्त्रियांच्या गरजेसाठी आहे एवढेच डोक्यात असते. जेव्हा राहुल्याची गँग घरी जाते,तेव्हा घरातील स्त्रीने अर्धी चड्डी घातली आहे की आणखी काही घातली आहे याकडे लैंगिक दृष्टिकोनातून पाहत नाही. आणि ती कोणतेही स्वतःचे दृष्टिकोन घरातील स्त्रीवर लादत नाही.

पुरुषी दृष्टिकोन म्हणजे मांडीला लैंगिक अवयव एवढाच अर्थ देणे.विवेकी दृष्टिकोन म्हणजे पुरुषाप्रमाणेच स्त्रीला देखील मांडी असते व त्या मांडीला वेगवेगळ्या प्रसंगात वेगवेगळे उपयोग पुरूषांसारखेच असतात असे मानणे.

मांडी म्हणजे बसण्यासाठी आधार असतो. मांडी म्हणजे विविध खेळांमध्ये,चालण्या-पळण्यासाठी उपयोग असतो.मांडी म्हणजे मांसपेशींचा गोळा असतो. बेडरूम मध्ये मांडी एकमेकांच्या शरीरावर टाकून झोपणे म्हणजे माया असते.आपली लहान मुले-मुली असे करतात,मोठी माणसे करतात तेंव्हा ती आपुलकीची भावना असते.विश्वास असतो.हॉलमध्ये,जेवताना, मांडीवर येऊन बसणे म्हणजे लाड असतात. आधारस्तंभ असतो.सहज कृती असते.

स्त्रीचा प्रत्येक अवयव हा लैंगिक दृष्टिकोनातून जे



पाहतात त्यांना स्त्री म्हणजे सेक्स करण्यासाठीचे आगर हेच डोक्यात असते.मग एखाद्या स्त्रीच्या बोटांच्या हालचाली..तिच्या डोळ्यांच्या हालचाली..तिचे चेहऱ्यावरचे हावभाव..तिची कंबर.. तिचे स्तन.. तिचे ओठ..तिचे केस..इत्यादी,साऱ्यांचे कार्य म्हणजे सेक्स एवढेच डोक्यात ज्यांच्या असते ते लालसेने लडबडलेले असतात. म्हणूनच संस्कार समजणाऱ्या सनातन्यांच्या घरात स्त्रियांना घुंगट-पडद्यात ठेवले जाते.मग तो धर्म कोणताही असो. अशा वृत्तीने बनलेल्या समाजाची संस्कृती ही विकृती बनलेली असते.

ज्यांची दृष्टी व्यापक व साफ असते त्या समाजात स्त्रीवर बंधने लादली जात नाहीत.ही दृष्टी विवेकी असते.लोकशाहीवादी असते.आणि खऱ्या अर्थाने सुसंस्कृत असते.असा सुसंस्कृत समाज निर्माण करण्याचे अपयश हे जसे राज्यकर्त्यांमुळे निर्माण होते तसेच ते घराघरातून होणाऱ्या संस्कारातून देखील होते.

पुरुषाप्रमाणेच स्त्री देखील निखळ शरीर घेऊन वावरते हे डोक्यात रुजवणे आपल्या येथे घडत नाही. म्हणूनच या समाजातील प्रत्येक शिवी ही स्त्री लैंगिक अवयव केंद्रित आहे.आणि ती पुरुषांनी तयार करून स्वतःची वासना व्यक्त करत वापरली आहे. अशावेळी ना बहीण आठवते,ना आई.किंबहुना आई वरूनच शिव्या लैंगिक अर्थाने बनवल्या गेल्या आहेत!

याचा अर्थ लैंगिक वासनायुक्त दृष्टिकोन ठेवणारी इथली समाज व्यवस्था ही अजूनही प्राणी पातळीवर आहे.नर आणि मादी एवढेच यांच्या डोक्यात आहे. म्हणूनच स्त्री आणि पुरुषाने केलेली कुठलीही कृती ते लैंगिक अर्थाने घेत असतात.मग त्यात शिकलेले असतात व अडाणीही.एखाद्या स्त्रीने आपल्या जोडीदाराने काहीतरी यश मिळवले असेल तर आनंदाने त्याचा किस घेण्याचे स्वातंत्र्य या समाजात नाही. कारण असा सार्वजनिक कीस घेणे म्हणजे 'लैंगिक दुराचार'एवढेच डोक्यात ठेवणारा समाज आजूबाजूला असतो.अशा वृत्तीचे पुरुष हे जेव्हा याच अर्थाने समाजात वावरतात तेव्हा स्त्रीच्या वागण्याचा अर्थ जर डोक्यात असाच ठेवला गेला तर ते तिच्याकडे शरीर संबंधाची मागणी करतात. आणि तिने नकार दिला तर बलात्कार करतात. यात स्त्रीला दोषी ठरविले जाते कारण तिचे अवयव त्याला दिसले!!मुळात डोळ्यातच आणि डोक्यातच जर स्त्री म्हणजे शरीरसुख हे असेल तर तिला नकार देण्याचे स्वातंत्र्य पुरुष प्रधान संस्कृती देत नाही.

अशी स्त्री जेव्हा आपले अवयव झाकून ठेवण्याच्या आदेशाच्या संस्कृतीत राहू लागते तेव्हा चुकून जरी आपल्या हाताचे बोट कोणाला दिसले तरीही तिला भीती वाटते.ही भीती समाजाने लादलेली असते. बुरखा किंवा घुंगट हे त्याचे दृश्य स्वरूप होय. स्त्रीच्या या शरीर झाकलेपणाचे उदात्तीकरण पुरुष करून स्वतःच्या घरातील स्त्रियांचे संरक्षण मानतो आणि बाहेर गेल्यावर मात्र सर्व स्त्रिया लैंगिक संबंधासाठी उपलब्ध आहेत या दृष्टीने पाहत राहतो! येथे विवेकाचा सर्वनाश झालेला असतो.

जोवर स्त्री शरीराकडे पाहण्याचा दृष्टिकोन पुरुषांचा निर्मळ होत नाही तोवर स्त्री म्हणजे केवळ उपभोग्य वस्तू हे डोक्यात घट्ट रुजत राहील.त्यावेळी इथला समाज मांडीवर बायकोने बसणे हे निखळ प्रेमाचे समजणार नाही. अशावेळी जर असले कृत्य विरोधकांनी केले असेल तर बुरखा आणि घुंगट वाले या कृत्यावर तुटून पडून राजकारण साधतील आणि त्यातून संस्कृतीचा ढोल पिटत राहतील.

वात्सायनापासून रं.धो. कर्वे यांच्यापर्यंत सर्वांनी सांगितलेले आहे की लैंगिकता डोक्यात असते, लैंगिकता मांड्यांमध्ये नसते. पण हे समाजात नाकारले जाऊन संस्कृती रक्षकांनी आपापले स्थान मजबूत करण्यासाठी या सर्व लैंगिक सुधारणांना विरोध केला आहे.आजही तेच घडते आहे. यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही.इथला समाज डोक्यात आणि डोळ्यात वासनांधता घेऊन वावरतो आहे यात काय ते नवल?

डॉ.प्रदीप पाटील
सांगली

■ बुधवार, २५ नोव्हेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सदय

अकोला
जिल्हा विशेष

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांकडून जलप्रकल्पांची पाहणी!

मूर्तिजापूरच्या पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्याचे वर्षा मीना यांचे निर्देश

घुंगशी, काटेपूर्णा बॅरेजसह एसटीपी प्लांटचा घेतला आढावा

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

आगामी उन्हाळ्यात संभाव्य पाणीटंचाई आणि दुष्काळी परिस्थितीचे आव्हान लक्षात घेता मूर्तिजापूर शहराचा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच नियोजन करण्याची गरज आहे. याच पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी सोमवारी (२३ नोव्हेंबर) मूर्तिजापूर तालुक्यातील विविध जलप्रकल्प आणि विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करीत संबंधित यंत्रणांकडून सद्यस्थितीचा आढावा घेतला.

जिल्हाधिकारी मीना यांनी दौऱ्यादरम्यान घुंगशी बॅरेज, काटेपूर्णा बॅरेज, मूर्तिजापूर शहरातील सांडपाणी प्रक्रिया केंद्र (एसटीपी प्लांट) तसेच नमो उद्यानाला भेट दिली. या पाहणीवेळी जलप्रकल्पांमधील उपलब्ध पाणीसाठा, पाणीपुरवठ्याचे नियोजन आणि संबंधित



विकासकामांच्या प्रगतीची माहिती त्यांनी अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली.

विशेषतः आगामी काळात पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेऊन उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर नियोजन करण्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी भर दिला. शहराची पिण्याच्या पाण्याची गरज प्राधान्याने विचारात घेऊन पाण्याचा योग्य वापर, उपलब्ध साठ्याचे व्यवस्थापन आणि आवश्यक पर्यायी उपाययोजनांचे नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

दौऱ्याची सुरुवात घुंगशी बॅरेजच्या पाहणीने झाली. त्यानंतर काटेपूर्णा बॅरेज आणि एसटीपी प्लांटची पाहणी करण्यात आली. नमो उद्यानालाही भेट देऊन तेथील कामांचा आढावा घेण्यात आला. संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने आतापासूनच दक्ष राहून पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे, असा स्पष्ट संदेश या दौऱ्यातून देण्यात आला.

यावेळी आमदार हरीश पिंपळे, उपविभागीय अधिकारी संदीप कुमार अपार, अतिरिक्त तहसीलदार गिरिजा देवी लोखंडे, गटविकास अधिकारी मिलिंद मोरे, घुंगशी प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता वीरेंद्र चौधरी, सहायक अभियंता आदेश धेमरे व निखिल बनसोड, काटेपूर्णा प्रकल्पाचे सहायक अभियंता गौरव सिंह राठोड, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपविभागीय अभियंता व्ही. एस. गिरी, तालुका कृषी अधिकारी दीपक तायडे, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता अभय कदम यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पाणीटंचाईचे आव्हान; नियोजनावर भर

जिल्हाधिकाऱ्यांच्या या पाहणी दौऱ्यात विकासकामांच्या आढाव्यासोबतच आगामी उन्हाळ्यात मूर्तिजापूर शहरासमोर उभे राहू शकणाऱ्या पाणीटंचाईच्या प्रश्नाला विशेष महत्त्व देण्यात आले. उपलब्ध जलसाठा आणि शहराची पाण्याची गरज यांचा ताळमेळ साधून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा विस्कळीत होणार नाही, यासाठी प्रशासनाला आतापासूनच उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले.

संत नरसिंग महाराज यात्रेच्या स्वागतासाठी अकोट सज्ज



■ प्रतिनिधी | अकोट ■

आ. प्रकाश भारसाकळे यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषदेचा पुढाकार; मंदिर परिसरापासून शहर स्वच्छतेच्या अभियानाला प्रारंभ

ग्रामदैवत श्री संत नरसिंग महाराज यांच्या यात्रा महोत्सवाचा उत्साह शहरात शिगेला पोहोचण्यापूर्वीच नगर परिषद प्रशासनाने स्वच्छतेची मोर्चेबांधणी सुरू केली आहे. २५ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या आणि महिनाभरापेक्षा अधिक काळ चालणाऱ्या या यात्रेत भाविकांची मोठी गर्दी होणार असल्याने संपूर्ण अकोट शहर स्वच्छ व आरोग्यदायी ठेवण्याचा संकल्प नगर परिषद प्रशासनाने केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून आरोग्य विभागाच्या वतीने विशेष स्वच्छता अभियानाचा प्रारंभ करण्यात आला.

आमदार प्रकाश पाटील भारसाकळे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विविध भागांत टप्प्याटप्प्याने स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. या अभियानासाठी शहराचे आराध्य दैवत असलेल्या श्री संत नरसिंग महाराज मंदिर परिसराची निवड करण्यात आली. मंदिर परिसरातील पटांगणाची स्वच्छता करून साचलेला कचरा हटविण्यात आला. यासोबतच कीटकनाशक आणि जंतुनाशकांची फवारणी करण्यात आली.

यात्रा म्हणजे श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाचा संगम; मात्र भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता स्वच्छतेचे नियोजनही तितकेच महत्त्वाचे ठरते. याच दृष्टिकोनातून नगर परिषद आरोग्य विभागाने कंबर कसली आहे. केवळ यात्रास्थळापुरती स्वच्छता मर्यादित न ठेवता संपूर्ण शहरात स्वच्छता अभियान राबविण्याचा निर्धार करण्यात आला आहे. त्यामुळे यात्रेच्या काळात शहरातील सार्वजनिक ठिकाणे, रस्ते आणि परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रशासनासमोर असणार आहे.

पदाधिकाऱ्यांची अभियानाला उपस्थिती

स्वच्छता अभियानाच्या प्रारंभी नगराध्यक्ष मायाताई धुळे, उपनगराध्यक्ष प्रथमेश बोराडे, आरोग्य सभापती मनीष कराळे, गटनेते रवी ठाकूर, पाणीपुरवठा सभापती अमोल पालेकर, नगरसेवक दिलीप बोचे, बादल अहिर यांच्यासह नगर परिषदेचे पदाधिकारी उपस्थित होते. आरोग्य विभागाचे निरीक्षक आणि सफाई कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला.

यात्रा महोत्सवाच्या निमित्ताने सुरू झालेल्या या अभियानाचे सातत्य टिकविणे आणि यात्रेच्या संपूर्ण कालावधीत स्वच्छतेची प्रभावी अंमलबजावणी करणे महत्त्वाचे ठरणार आहे. ग्रामदैवताच्या यात्रेच्या स्वागतासाठी अकोट शहर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवण्याचा नगर परिषद प्रशासनाचा हा संकल्प आता प्रत्यक्षात कितपत उतरतो, याकडे नागरिकांचे लक्ष राहणार आहे.

कत्तलीसाठी बांधून ठेवलेल्या सहा गोवंशांची सुटका; २.१० लाखांचा मुद्देमाल जप्त

अकोट शहर पोलिसांची मध्यरात्री धडक कारवाई; एकाला घेतले ताब्यात

■ प्रतिनिधी | अकोट ■

कत्तलीच्या उद्देशाने निर्दयतेने बांधून ठेवलेल्या सहा गोवंशांची अकोट शहर पोलिसांनी सुटका केली. शौकतअली चौकातील कांगारपुरा कब्रस्तान परिसरात मध्यरात्री करण्यात आलेल्या या कारवाईत सहाही गोवंशांसह अंदाजे २ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी अब्दुल मुफीद अब्दुल रफीक (वय ४९, रा. कांगारपुरा, अकोट) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

२३ नोव्हेंबरच्या रात्रीपासून २४ नोव्हेंबरच्या पहाटेपर्यंत अकोट शहर पोलीस ठाण्याचे पथक रात्रगस्तीवर असताना कांगारपुरा कब्रस्तान परिसरात काही गोवंश जनावरे कत्तलीच्या उद्देशाने बांधून ठेवल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे यांच्या



आदेशानुसार पोलिसांनी दोन पंचांसह घटनास्थळी धाव घेतली. तपासणीदरम्यान सहा गोवंश जनावरे निर्दयतेने बांधून ठेवल्याचे आढळून आले.

पोलिसांनी परिसरात चौकशी केली असता ही जनावरे अब्दुल मुफीद अब्दुल रफीक याची असल्याची माहिती समोर आली.

जनावरांच्या मालकी हक्काबाबत तसेच खरेदी-विक्रीच्या पावत्यांबाबत विचारणा केली असता संबंधित व्यक्तीला कोणतीही वैध कागदपत्रे सादर करता आली नाहीत. त्यामुळे पंचांसमक्ष सहाही गोवंश जनावरे, अंदाजे २ लाख १० हजार रुपये किमतीची, जप्त करण्यात आली. याप्रकरणी संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू आहे.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक निलेश पांडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. डी.बी. पथकाचे पोलीस उपनिरीक्षक निलेश बारहाते, पोलीस हेडकॉन्स्टेबल गणेश सोळंके, पोलीस नाईक विपुल सोळंके, पोलीस कर्मचारी मोहन दुर्गे, अश्विन चौव्हाण आणि उमेश थोरात यांनी कारवाईत सहभाग घेतला. या कारवाईमुळे अवैध गोवंश वाहतूक व कत्तलीच्या प्रकारांवर नियंत्रण मिळविण्यासाठी अकोट शहर पोलिसांनी सुरू ठेवलेल्या प्रयत्नांना बळ मिळाले आहे.

जिमखाना क्लबच्या प्रतीक गंगाधरेची विदर्भ क्रिकेट संघात निवड

अकोला : क्रिकेट विश्वात आपले राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक प्राप्त करू इच्छिणाऱ्या नवोदित क्रिकेट खेळाडू करिता नवनवीन क्रीडा उपक्रम राबविणाऱ्या स्थानिक मोठी उमरी परिसरातील जिमखाना क्लबच्या दिवेकर क्रीडांगणाचा चमकदार कामगिरी करणारा अष्टपैलू क्रिकेट खेळाडू प्रतीक गंगाधरे याची विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या क्रिकेट संघात नुकतीच निवड करण्यात आली आहे. प्रतीक आता १९ वर्षाखालील कुच बिहार क्रिकेट स्पर्धेत विदर्भाचे प्रतिनिधित्व करणार आहे.तो बीसीसीआय अंतर्गत ३ डिसेंबर पासून नागपूर येथे सुरू होणाऱ्या कुच बिहार ट्रॉफी स्पर्धेत मणिपूर विरुद्ध व २६ डिसेंबर पासून होणाऱ्या कुच बिहार ट्रॉफी स्पर्धेत महाराष्ट्र विरुद्ध खेळणार आहे.

मंदिर चोरांचा जिल्हाभर धुमाकूळ; एलसीबीने दोन आरोपींना ठोकल्या बेड्या!



■ प्रतिनिधी | अकोला ■

१३ मंदिरांतील चोऱ्यांचा पर्दाफाश; ४ किलो ७८५ ग्रॅम चांदीसह ७.०८ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

जिल्ह्यातील मंदिरांना लक्ष्य करून चांदीच्या वस्तू लंपास करणाऱ्या चोरट्यांच्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. अकोला जिल्ह्यातील तब्बल १३ मंदिरांमध्ये झालेल्या चोरीच्या घटनांचा छडा लावत पोलिसांनी दोन आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून चोरीस गेलेली ४ किलो ७८५ ग्रॅम चांदी, रोख रक्कम, दुचाकी आणि मोबाइल असा एकूण ७ लाख ८ हजार २७७ रुपयांचा मुद्देमाल शंभर टक्के हस्तगत करण्यात आला. देवदिवाळी आणि गुरुनानक जयंतीच्या मुहूर्तावर पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे मंदिर चोरट्यांचे धाबे दणाणले आहेत.

अकोट तालुक्यातील पणज येथील संत पंत जोत मंदिरातील सुमारे ५० हजार रुपये किमतीचा चांदीचा दिवा ९ नोव्हेंबर रोजी चोरीस गेला होता. याप्रकरणी रमेश रामचंद्र अकोटकर (५९) यांच्या तक्रारीवरून अकोट ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्ह्यात यापूर्वीही विविध मंदिरांमध्ये चोरीच्या घटना घडल्याने या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्थानिक गुन्हे शाखेला समांतर तपासाचे आदेश दिले.

पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वाखाली पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपासाला गती दिली. या तपासात विठ्ठल मोहन नागे (१८) आणि प्रशांत सदानंद आवारे (दोघेही रा. वरूळ जऊळका, ता. अकोट) यांच्याविषयी माहिती मिळाली. पोलिसांनी सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्यांनी जिल्ह्यातील विविध मंदिरांमध्ये चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

सात पोलीस ठाण्यांच्या हद्दीत १३ चोऱ्या

आरोपींनी अकोट ग्रामीण हद्दीतील पणज येथील संत पंत जोत मंदिर आणि चंडीकापूर येथील चंडिकादेवी संस्थान, हिवरखेड हद्दीतील सिरसोली येथील गुप्तेश्वर महाराज संस्थान आणि काळेगाव येथील हनुमान मंदिर, दहीहंडा हद्दीतील वरूड जऊळका येथील हनुमान मंदिर, कुटासा येथील धनगरपुरा मारोती मंदिर आणि देव्हरी येथील पंचमुखी महादेव मंदिरात चोरी केल्याचे उघड झाले. याशिवाय बार्शीटाकळी येथील भगत महाराज संस्थान आणि खासगी हनुमान मंदिर, तेल्हारा येथील पुष्करणी महादेव मंदिर, पिंजर येथील विठ्ठल-रखुमाई संस्थान, अकोला शहरातील राम मंदिर (कोतवाली परिसर) आणि कौलखेड येथील गजानन महाराज मंदिर अशा एकूण १३ मंदिरांतील चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

चांदीसह दुचाकी, मोबाइलही जप्त

पोलिसांनी आरोपींकडून ४ किलो ७८५ ग्रॅम चांदी, बाजारभावानुसार ६ लाख ४० हजार २७७ रुपये किमतीच्या चांदीच्या वस्तू, १८ हजार रुपये रोख, ३० हजार रुपये किमतीची हिरो एचएफ डिलक्स दुचाकी आणि २० हजार रुपये किमतीचे दोन मोबाइल असा एकूण ७ लाख ८ हजार २७७ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. विशेष म्हणजे, सर्व १३ गुन्ह्यांतील चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. पुढील कायदेशीर कारवाईसाठी आरोपींना खदान पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

एलसीबी पथकाला दहा हजारांचे बक्षीस

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला १० हजार रुपयांचे रोख बक्षीस जाहीर केले. अपर पोलीस अधीक्षक डॉ. निलेश पांडे आणि पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश देशमुख, गोपाल जाधव, पोलीस उपनिरीक्षक विष्णू बोडखे, माजीद पठाण, अनिल चव्हाण तसेच पोलीस अंमलदार सुलतान पठाण, अमित दुबे, पवन डांबलकर, सतीश पवार, राहुल गायकवाड आणि प्रकाश लोखंडे यांनी ही कारवाई यशस्वी केली.

प्रा. गजानन भारसाकळे यांना 'ग्रामरत्न' पुरस्कार

अकोला : श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित स्थानिक बाभूळगांव - अकोला येथे अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयाच्या सिव्हील इंजिनिअरींग विभागात कार्यरत प्रा गजानन रामकृष्ण भारसाकळे यांना दर्यापूर तालुक्यातील जन्मगाव बेलोरा येथील ग्रामवासी यांनी ' ग्रामरत्न ' पुरस्कार जाहीर केला आहे . आपल्या अष्टपैलू कार्याने सदैव जनमाणसाच्या चर्चेत तथा कार्यरत असलेले 'आईमहोत्सव ' या राष्ट्रस्तरीय कार्यक्रमाचे जनक , अमरावती जिल्ह्याच्या दर्यापूर तालुक्यातील माहुली (धांडे) येथील गो सेवेच्या 'गो भवनाचे शिल्पकार ' तथा दर्यापूरच्या सुप्रसिद्ध गाडगेबाबा मंडळाचे संस्थापक -अध्यक्ष असलेल्या प्रा गजानन भारसाकळे यांना येत्या २७ नोव्हेंबर या दिवशी बेलोरा येथील चंद्रभागा या गाव नदीच्या पात्रात आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात दुपारी ४ वाजता विदर्भातील ख्यातनाम संत अँड सचिन देव महाराज यांचे शुभहस्ते या अभिनव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. याप्रसंगी हेमंत वासुदेवराव काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे (कार्यकारिणी सदस्य श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती) तथा प्रबोधन विद्यालय व कनिष्ठ महाविद्याल, दर्यापूर या संस्थेचे माजी प्राचार्य श्रीकृष्ण मावंदे यांना कार्यक्रमातील प्रमुख पाहुणे म्हणून गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे .

डिजिटल हयात दाखल्याबाबत निवृत्तीवेतनधारकांना मार्गदर्शन

अकोला : जिल्हा कोषागार कार्यालयाच्या वतीने डिजिटल हयात दाखल्याबाबत निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा कोषागार अधिकारी माधवराव झुंजारे उपस्थित होते. या वेळी निवृत्तीवेतनधारक व त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डिजिटल हयात दाखला सादर करण्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, ऑनलाइन नोंदणीचे टप्पे आणि त्याचे फायदे याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

जाहीर नोटीस

वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.१८८८/२०२६ प्रोसेस नं.१४४१६/२०२६
चौ.ता. १९/१२/२०२६ दिनांक : ०७/११/२०२६

अर्जदार : १. पार्वताबाई पांडुरंग वरोकार २. विनोद पांडुरंग वरोकार ३. ज्ञानेश्वर पांडुरंग वरोकार रा. क्र. १ ते ३ रा उन्नती नगर, गणपती मंदिर जवळ, कौलखेड, अकोला, ता. जि. अकोला ४. सौ. आशा ज्ञानेश्वर वानखडे रा. मोहळा, ता. अकोट, जि. अकोला ५. सौ. लता प्रकाश राउत रा. के. पी. लायडे, संत ज्ञानेश्वर नगर, गणेश क्लास सेंटर मागे, भोसरी, पुणे, ता. जि. पुणे

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही.

मयताचा पत्ता :- मयत : १. पांडुरंग पुंडलिक वरोकार

पत्ता :- रा. उन्नती नगर, गणपती मंदिर जवळ, कौलखेड, अकोला, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, यांचे पांडुरंग पुंडलिक वरोकार दि. १६/०१/२०२० रोजी कौलखेड, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३४०
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

अकोट नगर परिषदेच्या सभेत १३ ठरावांना सर्वानुमते मंजुरी

प्रलंबित विकासकामांवर नगरसेवकांचा प्रशासनाला जाब; कामे तातडीने पूर्ण करण्याचे नगराध्यक्षांचे निर्देश

■ प्रतिनिधी | अकोट ■

शहरातील प्रलंबित विकासकामे, मूलभूत सुविधा आणि नागरी समस्यांवर सकारात्मक चर्चा करीत अकोट नगर परिषदेची सर्वसाधारण सभा खेळीमेळीत पार पडली. नगराध्यक्षा तथा सभाध्यक्षा मायाताई धुळे यांच्या अध्यक्षतेखाली फुले-शाहू-आंबेडकर सभागृहात झालेल्या या सभेत एकूण १५ विषयांपैकी १३ ठरावांना सर्वानुमते मंजुरी देण्यात आली, तर दोन ठराव रद्द करण्यात आले. प्रभागांमधील रखडलेली कामे, आरोग्य व स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन आणि गुंठेवारी नियमितीकरण अशा महत्त्वाच्या विषयांवर सभागृहात चर्चा झाली.

सभेच्या प्रारंभी नगराध्यक्षा मायाताई धुळे यांनी शहरातील सुरू असलेल्या तसेच प्रलंबित विकासकामांचा आढावा घेतला. मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांच्याकडून कामांची सद्यस्थिती जाणून घेताना विकासकामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने गती वाढवावी, असे स्पष्ट निर्देश दिले. कंत्राटदारांची प्रलंबित देयके आणि नवीन कामांचे प्रस्ताव वेळेत सभागृहासमोर आणून विकासकामांना गती देण्याची सूचनाही त्यांनी केली. रस्ते, नाल्या आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत सुविधा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्रभाग १२ मधील रखडलेल्या कामांवर जाब

सभेत प्रभाग क्रमांक १२ मधील विकासकामांचा मुद्दा नगरसेवक नीलेश नवघरे यांनी उपस्थित केला. वार्षिक कामांमध्ये समाविष्ट असलेली धापे व नाल्यांची कामे वर्ष संपत आले तरी सुरू का झाली नाहीत, असा थेट सवाल त्यांनी प्रशासनाला केला. याची दखल घेत नगराध्यक्षा धुळे यांनी संबंधित



विभागप्रमुखांची कानउघाडणी करीत ही कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

आरोग्य विभागाच्या कामांचा अहवाल मागविला

आरोग्य व स्वच्छतेच्या प्रश्नावर आरोग्य सभापती मनीष कराळे यांनी विभागाच्या वार्षिक कामकाजाबाबत विचारणा केली. त्यावर नगराध्यक्षांनी मागील आठ महिन्यांच्या कामांचा सविस्तर अहवाल सर्व नगरसेवकांना सादर करण्याचे निर्देश दिले. आरोग्य विभागाचे आकाश अहिरे यांनाही स्वच्छता आणि आरोग्यविषयक सुविधा प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

गुंठेवारीसाठी मुदतवाढ; जनजागृतीची मागणी

गुंठेवारीतील प्रकरणे नियमित करण्यासाठी मुदतवाढ देण्याचा ठराव सभेत मंजूर करण्यात आला. या निर्णयाचा अधिकाधिक नागरिकांना लाभ मिळावा, यासाठी नगर परिषद प्रशासनाने व्यापक प्रचार व जनजागृती करावी, अशी मागणी नगरसेवक मंगेश लोणकर यांनी केली.

कचरा डेपोच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर

१५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून घनकचरा व्यवस्थापन केंद्राशाठी यंत्रसामग्री खरेदी करण्याच्या विषयावर नगरसेवक संतोष झुनझुनवाला यांनी भूमिका मांडली. कचरा डेपोतील साहित्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने यंत्रसामग्री खरेदीपूर्वी संरक्षक भिंत उभारण्याची सूचना त्यांनी केली.

दरम्यान, प्रभाग क्रमांक ९ च्या नगरसेविका लताताई कांबळे यांनी विविध निधी उपलब्ध करून प्रभागातील प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्याची मागणी केली. प्रभाग क्रमांक १३ च्या नगरसेविका नगमा अंजुम अजहर शेख यांनीही आपल्या प्रभागातील रस्ते व नाल्यांच्या कामांसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची मागणी सभागृहात केली. या सभेला नगर उपाध्यक्ष प्रथमेश बोरोडे, अकोट शहर विकास मंचाचे पदाधिकारी, सत्ताधारी गटाचे नगरसेवक, सभापती, गटनेते, सर्व नगरसेवक तसेच नगर परिषद अधिकारी उपस्थित होते. १३ ठरावांना मिळालेली सर्वानुमते मंजुरी आणि प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या निर्देशांमुळे शहराच्या विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

रानडुकरांचा हैदोस, व्यापाऱ्यांची लूट अन् प्रशासनाची उदासीनता

येणाड्यात तीन एकरांतील तूर - कपाशी उद्ध्वस्त; शेतकऱ्यांचे हाल थांबणार कधी

आष्टी शहीद/जनमाध्यम

शेतकऱ्यांनी शेती करायची तरी कोणाच्या भरवशावर? कधी निसर्गाचा लहरीपणा, कधी व्यापाऱ्यांची मनमानी, कधी दलालांची लूट, तर कधी जंगली जनावरांचा हैदोस! त्यात प्रशासनाची उदासीनता शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत आहे. शेतात घाम गाळून पीक उभे करायचे आणि ऐन हातातोंडाशी आलेल्या घासावर कुणीतरी डल्ला मारायचा, हीच शेतकऱ्यांची नियती झाली आहे का? असा संतप्त प्रश्न आता उपस्थित होत आहे.

आष्टी तालुक्यातील अप्पर वर्धा धरणाच्या काठावरील पिलापूर येथील येणाडा शिवारात रानडुकरांच्या कळपाने अक्षरशः धुमाकूळ घातला. शेतकरी सदाशिव सायरे यांच्या तीन एकर शेतातील तूर आणि कपाशीचे पीक रानडुकरांनी उद्ध्वस्त केले. रविवार, २२ नोव्हेंबरच्या रात्री घडलेल्या या प्रकाराने शेतकऱ्याच्या वर्षभराच्या मेहनतीवर पाणी फेरले आहे.सायरे यांनी खाजगी कर्ज काढून शेतीत पैसा ओतला. मशागत, बियाणे, खते आणि औषधांचा खर्च करीत पिकांची जोपासना केली. पीक हाती येईल आणि कर्जाचा डोंगर काहीसा हलका होईल, अशी अपेक्षा होती. मात्र, रानडुकरांच्या कळपाने शेतात घुसून कपाशीची बोंडे आणि तुरीचे पीक अक्षरशः तुडवून टाकले. सकाळी शेतात पोहोचताच उद्ध्वस्त पीक पाहून त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली.



शेतकऱ्यांच्या संकटात भर, प्रशासनाची पाठ फिरविण्याची भूमिका

एकीकडे शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही. व्यापारी आणि दलालांच्या मनमानीमुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनाची लूट होत असल्याच्या तक्रारी आहेत. दुसरीकडे वन्यप्राण्यांकडून उभ्या पिकांची नासधूस सुरू आहे. या दुहेरी संकटात शेतकरी भरडला जात असताना प्रशासनाकडून मात्र अपेक्षित तत्परता दिसत नसल्याची खंत व्यक्त होत आहे.घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. मात्र, कृषी विभागाचा एकही कर्मचारी नुकसान पाहणीसाठी पोहोचला नसल्याची तक्रार सायरे यांनी केली. तलाठ्यांनाही माहिती देऊन अपेक्षित दखल घेण्यात आली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. शेतकऱ्याचे नुकसान झाले, पंचनाम्याची प्रक्रिया झाली; पण प्रत्यक्ष मदत मिळणार कधी, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

शेतकऱ्यांच्या हालांची चेष्टा कधी थांबणार?

शेतकऱ्याला निसर्गाने मारायचे, वन्यप्राण्यांनी पीक उद्ध्वस्त करायचे, बाजारात व्यापारी-दलालांनी लुटायचे आणि मदतीच्या वेळी प्रशासनाने कागदोपत्री घोडे नाचवायचे, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मग शेतकऱ्याने जगायचे तरी कसे? शेतीचा खर्च कर्जातून भागवायचा आणि नुकसान झाल्यानंतर भरपाईसाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवायचे, हा अन्याय आणखी किती दिवस सहन करायचा?

सदाशिव सायरे यांच्या तीन एकरांतील नुकसान ही केवळ एका शेतकऱ्याची व्यथा नाही, तर वन्यप्राण्यांच्या उपद्रवाने त्रस्त असलेल्या शेतकरी वर्गाच्या वेदनेचे प्रतिबिंब आहे. वनविभाग, कृषी विभाग आणि महसूल प्रशासनाने तातडीने संयुक्त पाहणी करून नुकसानीचा योग्य मोबदला द्यावा. वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

क्षुल्लक वादातून महिलेचे नाक फोडले

सावंगी मेघे- जुन्या जागेच्या वादातून शेजाऱ्यांनी एका महिलेसह तिच्या मुलाला शिवीगाळ व मारहाण केल्याची घटना सावंगी मेघे येथील प्रभाग क्रमांक एकमध्ये घडली.या मारहाणीत महिलेच्या नाकाला गंभीर दुखापत झाली.याप्रकरणी सावंगी मेघे पोलिसांनी पती-पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.इंदुबाई नामदेव वाघमारे (वय ५२) असे जखमी महिलेचे नाव आहे. त्यांचा शेजारी मुकेश नेवारे हा जुन्या जागेच्या वादातून वारंवार भांडण करीत असल्याचे तक्रारीत नमूद आहे. ७ नोव्हेंबर रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास मुकेश हा घराबाहेर कुत्र्याला दगड मारत होता. यावेळी त्याने वाघमारे यांच्या मुलाला आवाज देऊन जवळ बोलावले. जुन्या वादाचा विषय काढत त्याला शिवीगाळ करून चापट मारली.मुलाला मारहाण होत असल्याचे पाहून इंदुबाई मध्यस्थी करण्यासाठी गेल्या असता मुकेशने त्यांच्या नाकावर मुक्का मारला. त्यामुळे त्यांचे नाक फुटून दुखापत झाली. यावेळी आरोपीच्या पत्नीनेही शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. तसेच मुलाला मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.वैद्यकीय तपासणी आणि एक्स-रे अहवाल प्राप्त झाल्यानंतर २३ नोव्हेंबर रोजी सावंगी मेघे पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

वर्धा नदीतून अवैध रेती उपसा; मुद्देमाल जप्त

पुलगाव- वर्धा नदीच्या पात्रातून विनापरवाना रेती उत्खनन करून वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध पुलगाव पोलिसांनी कारवाई केली. गुंजखेडा घाट परिसरातील दर्ग्याजवळ केलेल्या या कारवाईत ट्रॅक्टर-ट्रॉली आणि एक ब्रास रेती असा एकूण ६ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चालकाला ताब्यात घेण्यात आले असून रेती पुरविणाऱ्या व्यक्तीचा शोध सुरू आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २३ नोव्हेंबर रोजी पोलीस निरीक्षक सदाशिव ढाकणे व पथक पेट्रोलिंग करीत असताना वर्धा नदीच्या पात्रातून विनापरवाना रेतीची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पंचांना सोबत घेऊन पथकाने गुंजखेडा घाट परिसरात सापळा रचल सकाळी ८ वाजताच्या सुमारास लाल रंगाचा महिंद्रा ५८५ डीआय ट्रॅक्टर आणि निळ्या रंगाच्या ट्रॉलीतून रेती वाहून नेणारे वाहन पोलिसांनी अडविले. चालक रवींद्र ऊर्फ पाषा उत्तमराव येसने (वय ४५, रा. घुबडटोली, देवळी, सध्या रा. जोशी प्लॉट, गुंजखेडा) याची चौकशी केली असता रेती उत्खनन व वाहतुकीचा परवाना नसल्याचे समोर आले.पोलिसांनी पाच लाख रुपये किमतीचा ट्रॅक्टर, एक लाख रुपये किमतीची ट्रॉली आणि दहा हजार रुपये किमतीची एक ब्रास काळी रेती असा एकूण ६.१० लाखांचा मुद्देमाल जप्त केला. रेतीचा पुरवठा बबलू पठाण याने मजुरांच्या माध्यमातून केल्याची माहिती चालकाने दिली. मात्र, पोलिसांना पाहताच बबलू पठाण व त्याच्यासोबतचे मजूर नदीपात्रातील झुडपांतून पसार झाले.या प्रकरणी बबलू पठाण, चालक आणि ट्रॅक्टर मालकाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पुलगाव पोलीस करीत आहेत.

पैसे आणि दागिन्यांच्या वादातून तरुणाची आत्महत्या

सेल- पत्नीच्या निधनानंतर मुलीसोबत राहणाऱ्या ३८ वर्षीय व्यक्तीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घोराड येथे उघडकीस आली. आर्थिक व्यवहार आणि कथित प्रेमसंबंधातून निर्माण झालेल्या वादामुळे मानसिक त्रास दिला जात असल्याचा आरोप मृताच्या नातेवाइकांनी केला आहे. या प्रकरणी सेलू पोलिसांनी दोघांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त करणे, धमकी आणि शिवीगाळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.प्रवीण भोजराज ढोबळे (वय ३८, रा. प्रभाग क्रमांक एक, घोराड) असे मृताचे नाव आहे. प्रवीण यांची पत्नी अर्चना यांचे वर्षभरापूर्वी निधन झाले होते. ते आपल्या १५ वर्षीय मुलीसोबत राहत होते. २३ नोव्हेंबर रोजी सकाळी प्रवीण फोन उचलत नसल्याने त्यांचा भाऊ गणेश यांची पत्नी दर्शना आणि मुलगी किंजल या घरी गेल्या. यावेळी घरातील हॉलमध्ये प्रवीण यांनी नायलॉनच्या दोरीने गळफास घेतल्याचे निदर्शनास आले.गणेश ढोबळे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, प्रवीण यांचे गेल्या दोन वर्षांपासून अमोल प्रल्हाद शेंडे यांच्या पत्नीशी प्रेमसंबंध होते.

गरजू विद्यार्थ्यांच्या हाती पुस्तकं देणारे प्रा. सावरकर समाजासाठी दीपस्तंभ

आ. राजेश बकाने यांचे गौरवोद्गार, आदर्श शिक्षक प्रा. सचिन सावरकर यांचा सन्मान

देवळी / जनमाध्यम

शिक्षक हा समाजाचा खरा शिल्पकार असतो. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देणे एवढेच शिक्षकाचे कर्तव्य नसून त्यांच्या आयुष्याला योग्य दिशा देणे, त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण करणे आणि सामाजिक बांधिलकीचे संस्कार रुजविणे हीदेखील त्यांची महत्त्वाची जबाबदारी असते. वर्धा जिल्ह्यात गेल्या अनेक वर्षांपासून 'पुस्तक मित्र' म्हणून ओळख निर्माण करणारे प्रा. सचिन सावरकर हे याच कार्याचे उत्तम उदाहरण आहेत. त्यांनी सुरू केलेल्या छोटेखानी ग्रंथालयाच्या माध्यमातून लहान मुलांपर्यंत पुस्तके पोहोचवून त्यांच्या ज्ञानात भर घालण्यासोबतच विचारांची प्रगल्भताही वाढविली आहे. त्यांचे हे कार्य समाजासाठी दीपस्तंभासारखे मार्गदर्शक आहे, असे गौरवोद्गार देवळी-पुलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश बकाने यांनी काढले.



श्री संत साबाजी महाराज देवस्थान ट्रस्टच्या वतीने आयोजित कार्यक्रमात आदर्श शिक्षक प्रा. सचिन सावरकर यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून आमदार बकाने बोलत होते. यावेळी प्रा. सावरकर यांना शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाची आणि वाचनाची आवड असते. मात्र, आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना पुस्तके विकत घेणे शक्य होत नाही. अशा विद्यार्थ्यांसाठी प्रा. सावरकर यांनी पुढाकार घेत पुस्तके उपलब्ध करून देण्याचे मोलाचे काम केले आहे, असे मत देवळी नगर परिषदेचे उपाध्यक्ष प्रा. राहुल चोपडा यांनी व्यक्त केले.

यावेळी मंचावर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष मोहन बाबू अग्रवाल, कीर्तनकार सुरेंद्र मुळे महाराज, ह.भ.प. शरदराव नाईक महाराज आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मोहन बाबू अग्रवाल यांनी केले. संचालन व आभार प्रदर्शन दीपक अग्रवाल यांनी केले.

कार्यक्रमाला हरीश ओझा, गुरुदेव सेवा मंडळाचे विजय पेठकर, विश्व हिंदू परिषदेचे मोहन जोशी, दिनेश क्षीरसागर, महेश अग्रवाल, अमरावतीचे डॉ. संजय अग्रवाल, आर्वीचे सामाजिक कार्यकर्ते चेतन अग्रवाल, ॲड. महेश टावरी, प्रकाशचंद कांकरिया, मुन्ना जैन, कारंजाचे सुभाष व सुरेश अग्रवाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

रोहित पठारेच्या न्यायासाठी वर्धेत आक्रोश; सहा तास धरणे आंदोलन

दोषींना कठोर शिक्षा, फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालविण्याची मागणी, मुख्यमंत्र्यांना निवेदन

वर्धा/जनमाध्यम

एका तरुणाचा मृत्यू केवळ एका कुटुंबाचे स्वप्न हिरावून घेणारा नसतो, तर समाजाच्या न्यायव्यवस्थेसमोरही अनेक प्रश्न उभे करतो. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर येथील रोहित अनिल पठारे हत्याप्रकरणातील पीडित कुटुंबाला न्याय मिळावा, या मागणीसाठी सोमवारी (२३ नोव्हेंबर) वर्ध्यात आंबेडकरी संघटनांनी सहा तास धरणे व निदर्शने करीत शासनाचे लक्ष वेधले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हे आंदोलन करण्यात आले. यावेळी विविध सामाजिक, धार्मिक आणि राजकीय संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. रोहित पठारे याच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या दोषींवर कठोर कारवाई करण्याच्या घोषणा देत आंदोलकांनी न्यायाची मागणी केली.

३१ ऑक्टोबर २०२६ रोजी वैजापूर येथे रोहितवर हल्ला झाल्याची घटना घडली होती. उपचारादरम्यान ३ नोव्हेंबर रोजी त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणात सुमारे २६ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

आंदोलकांनी भारतीय न्याय संहितेतील कलम १०३(२) अंतर्गत मॉब लिंचिंगची तरतूद लागू करावी, प्रकरणाचा खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवावा आणि विशेष सरकारी वकिलाची नियुक्ती करावी, अशा प्रमुख मागण्या केल्या. दोषींना कठोर शिक्षा देण्यासह फाशीची शिक्षाही देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. या आंदोलनात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) चे विदर्भ तथा जिल्हा अध्यक्ष महेंद्र मुनेश्वर, निर्माण सोशल फोरमचे प्रमुख निरज गुजर, आंबेडकरी चळवळीतील सक्रीय कार्यकर्ते ॲड. हर्षवर्धन गोडघाटे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा अध्यक्ष किशोर खैरकर, नितीन इंदुरकर, रिपाइं जेष्ठ नेते विजय आगलावे, प्रा.शिवाजी चाटसे, ॲड. अविनाश काकडे, डॉ.रामकृष्ण मिरगे, विशाल रामटेके, रमेश निमसडकर, उमाताई इंगोले, पद्मा तायडे, पल्लवी बोदिले, निलेश हावरे, यांच्यासह विविध आंबेडकरी संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सामाजिक प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. रोहितच्या कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला.

कवटी न उघडताच चिमुकल्याला नवी दृष्टी

१३ वर्षीय मुलाच्या मेंदूतील गाठ नाकाद्वारे काढली; सावंगीच्या डॉक्टरांची दुर्मिळ कामगिरी

वर्धा/ जनमाध्यम

डोळ्यांसमोर अंधार निर्माण करणाऱ्या मेंदूतील गंभीर आजारावर सावंगीच्या डॉक्टरांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने यशस्वी उपचार करीत एका १३ वर्षीय मुलाला दिलासा दिला.

कवटी न उघडता नाकाच्या नैसर्गिक मार्गाने दुर्बिणीद्वारे मेंदूतील मोठी आणि गुंतागुंतीची गाठ काढण्यात डॉक्टरांना यश आले. या शस्त्रक्रियेमुळे मुलाच्या दृष्टीवरील आणि मेंदूतील संवेदनशील भागांवरील धोका टळला आहे.

सावंगी (मेघे) येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या चमूने ही कामगिरी केली.

कान-नाक-घसा व कवटीच्या तळाच्या शस्त्रक्रियातज्ज्ञ डॉ. चंद्रवीर सिंग, मेंदूविकार शल्यचिकित्सक डॉ. संदीप इरातवार आणि विभागप्रमुख डॉ. श्रद्धा जैन यांनी संयुक्तपणे शस्त्रक्रिया केली.

संबंधित मुलाच्या मेंदूत पिट्यूटरी ट्यूमरची गाठ पुन्हा वाढली होती. यापूर्वी ऑगस्ट २०२३ मध्ये कवटी उघडून शस्त्रक्रिया करण्यात आली होती. मात्र, गाठीचा विस्तार झाल्याने त्याला सतत डोकेदुखी आणि दृष्टी कमी होण्याचा त्रास सुरू होता. गाठीचा दाब दृष्टीच्या नसांसह मेंदूच्या महत्त्वाच्या भागांवर पडत होता.

त्यामुळे पुन्हा कवटी उघडणे धोकादायक ठरू शकले असते. डॉक्टरांनी 'एंडोस्कोपिक एंडोनासल ट्रान्सस्फेनॉइडल' पद्धतीने नाकातून शस्त्रक्रिया केली.

महत्त्वाच्या रक्तवाहिन्या, डोळ्यांच्या नसा आणि ब्रेनस्टेमला इजा न पोहोचवता गाठ काढण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर मुलाची प्रकृती स्थिर असून दृष्टीतही सकारात्मक सुधारणा झाली आहे.

लहान मुलांमध्ये सतत डोकेदुखी किंवा दृष्टी कमी होण्याची लक्षणे दिसल्यास पालकांनी दुर्लक्ष करू नये. वेळीच निदान आणि उपचार केल्यास गंभीर धोका टाळता येतो, असे आवाहन डॉक्टरांनी केले आहे.

जनमाध्यम न्युज ॲंड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे

(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष - १४ **अंक** - ३५७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जाहीर सूचना

आम जनतेस सूचित करण्यात येते की, मी. **श्री. राजेश सखाराम महाजन रा. नाशिक जि. नाशिक (महाराष्ट्र)** मी, **शेत सर्वे नंबर ६४/१** मौजा नांदोरा त. देवळी, जिल्हा वर्धा येथील खालील वर्णनाची शेती **श्री पवन रमेश कठाने रा. ठाणे, जि. ठाणे** (महाराष्ट्र)यांच्याकडून शेती विकत घेण्याचा सौदा केला आहे. **शेत जमिनीचे वर्णन खालील प्रमाणे: शेत सर्वे नंबर ६४/१, आराजी १.५७, वर्ग-१** प्रकार-कोरडवाहू. वरील वर्णनाची मालमत्ता असून तरी या मालमत्तेवर कुणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, संबंध अधिकार असल्यास किंवा या मालमत्तेबाबत कोणतेही प्रकारचा व्यवहार झालेला असल्यास किंवा ही मालमत्ता कुण्या दुसऱ्यास लिहून दिलेली असल्यास किंवा कूण्या व्यक्ती बँक व संस्थेचा कसल्याही प्रकारचा गहाण बोजा, करार असल्यास ही सूचना प्रकाशनाचे आठ(८) दिवसाच्या आत लेखी कागदपत्र व पुराव्यासह सुद्धा येऊन भेटावे. नंतर या मालमत्ते संबंधात कोणाचेही कसलेही प्रकारचा उजर व आक्षेप स्वीकार केला जाणार नाही.

दिनांक २०/११/२०२६.

राजेश सखाराम महाजन,
रा.नाशिक जि.नाशिक
मो.९४०७३११४२१.

जनतेला ठेंगा, सरकारी तिजोरीला चुना

दुष्काळातही वाहनांच्या ताफ्यावर २.२५ लाखांची उधळपट्टी; योजनांच्या लाभासाठी जनता दारोदारी, खा.अमर काळेंचा सरकारवर प्रहार

राज्यातील शेतकरी दुष्काळाने होरपळत असताना, सर्वसामान्य जनता महागाई आणि आर्थिक संकटाशी झुंज देत असताना सरकारला मात्र सरकारी कार्यक्रमांवरील खर्चाचे सोयरसुतक नसल्याचे चित्र समोर आले आहे. ग्रामविकास विभागाच्या कार्यक्रमासाठी अवघ्या दोन दिवसांत भाड्याच्या वाहनांवर तब्बल २ लाख २५ हजार रुपये खर्च करण्यात आल्याची बाब उघड झाली आहे. एका बाजूला शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि निराधार नागरिक आपल्या हक्काच्या योजनांच्या लाभासाठी सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवत आहेत, तर दुसरीकडे सरकारी कार्यक्रमांच्या नावाखाली जनतेच्या पैशांची उधळपट्टी सुरू आहे. हा प्रकार संतापजनक असून, सत्ता जनतेच्या सेवेसाठी असते, जनतेच्या पैशांवर उधळपट्टी करण्यासाठी नाही अशा शब्दांत खासदार अमर काळे यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.



२० आणि २१ नोव्हेंबर रोजी आयोजित कार्यक्रमासाठी तब्बल १५ भाड्याच्या वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती. प्रत्येक वाहनासाठी प्रतिदिन ७ हजार ५०० रुपये याप्रमाणे दोन दिवसांचा खर्च २ लाख २५ हजार रुपयांवर पोहोचला. विशेष म्हणजे, यातील काही वाहनांवर खासगी नोंदणी क्रमांकाच्या पाट्या असल्याचे वृत्त समोर आले आहे. त्यामुळे या वाहनांचा व्यावसायिक वापर करण्यासाठी आवश्यक परवाने, विमा आणि कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता झाली होती का, असा प्रश्न ही काळे यांनी उपस्थित केला.

वाहनांच्या ताफ्याला लाखोंचे इंधन, लाभार्थ्यांच्या पदरात प्रतीक्षाच

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा मोठा गाजावाजा केला जातो. मात्र अनेक पात्र महिलांचे अर्ज प्रलंबित असून केवायसीच्या अडचणींमुळे लाभ मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. शेतकरी सन्मान निधी, संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांनाही वेळेवर मदत मिळण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा प्रश्नही कायम आहे. शेतकऱ्यांना आर्थिक मदत वेळेवर मिळत नाही, निराधारांचे मानधन रखडते आणि महिलांना लाभासाठी हेलपाटे मारावे लागतात. मग सरकारी कार्यक्रमांसाठी एवढा खर्च करण्याची घाई कशासाठी, असा सवाल उपस्थित होत आहे.

प्रसिद्धीचा थाट मोठा, जनतेच्या प्रश्नांकडे मात्र पाठ

सरकारी कार्यक्रम आयोजित करण्यास विरोध नाही; मात्र त्यासाठी होणारा खर्च आवश्यक, नियमबद्ध आणि पारदर्शक असला पाहिजे. जनतेच्या करातून जमा झालेला पैसा हा सत्ताधाऱ्यांच्या ऐशआरामासाठी नसून जनतेच्या कल्याणासाठी आहे. ग्रामविकासाचा अर्थ वाहनांचा ताफा आणि मोठे कार्यक्रम नसून गावागावातील नागरिकांचे प्रश्न सोडविणे हा आहे.

खासदार अमर काळे यांनी वाहनांवरील खर्चाची निष्पक्ष चौकशी करून अनियमितता आढळल्यास दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच लाडकी बहीण योजनेसह सर्व शासकीय योजनांतील प्रलंबित अर्ज निकाली काढावेत, शेतकऱ्यांचे अनुदान वेळेत द्यावे, विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती आणि निराधारांचे मानधन नियमित करावे, अशी मागणी केली.जनतेला हक्काच्या पैशांसाठी प्रतीक्षेत ठेवायचे आणि सरकारी कार्यक्रमांच्या नावाखाली लाखोंची उधळपट्टी करायची, हा कोणता जनकल्याणाचा कारभार? सरकारने वाहनांच्या खर्चाचा हिशेब द्यावाच, पण त्याआधी जनतेच्या हक्काच्या योजनांचा हिशेबही द्यावा.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२३४८/२०२६
Suryaprakash Hanvati Tayade foremerly known as Prakash Hanumant Tayade+1 Versus NIL
पुढील ता.१८.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

Applicants
1. **Suryaprakash Hanvati Tayade,** Aged 58 yrs. Occ.- Labour Formerly known as Prakash Hanumant Tayade
2. **Vishwajeet Suryaprakash Tayade,** Age 26 yrs.,Occ.- Labour All R/o. Dawargaon, Tq. & Dist. Amravati (444901)

...Versus...

Non- Applicant - NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **Nanda Prakash Tayade** या दिनांक **०३.०१.२०१४** रोजी **अमरावती** येथे मयत झाले/ झाल्या. अर्जदार **Suryaprakash Hanvati Tayade foremerly known as Prakash Hanumant Tayade+ 1 Versus NIL** यांनी वरील्प्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Suryaprakash Hanvati Tayade foremerly known as Prakash Hanumant Tayade+ 1 Versus NIL** वरील्प्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२०.११.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.३०६/२०२६ **ने.ता.१५.१२.२०२६**

१. सदाशिव बळीराम वानखडे
रा. वार्ड नं.१,खानापुर , ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

// वि //
निरंक

ज्याअर्थी मयत बळीराम मन्या वानखडे **यांचा** मृत्यू दि.२५.०३.२०२६ **मध्ये** खानापुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती **येथे झाला.मयताचे** पत्नी नामे पंचफुला बळीराम वानखडे **यांचा मृत्यू दि.**०७.०७.२०१७ **मध्ये** खानापुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती **येथे झाला.**मयताचे अर्जदार क्र.१ हा मुलगा आहे. **मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी १०.३० वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.**

आज दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.३०९/२०२६ **ने.ता.१५.१२.२०२६**

१. सिंधु शंकरराव इटनकर
रा. वार्ड नं.३ ,येणस , ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

// वि //
निरंक

ज्याअर्थी **मयत अंजनाबाई चंपत घरडे** यांचा **मृत्यू दि.३०.०५.१९८७** मध्ये **येणस, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला.मयताचे **पती नामे चंपतराव चि.चरडे** यांचा मृत्यू दि.**१३.०२.२००२** ला झाला.**मयताचे अर्जदार क्र.१ ही मुलगी आहे.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.३०५/२०२६ **ने.ता.१५.१२.२०२६**

१. सुशीला तुकारामजी मेश्राम
२. तुकाराम नारायणराव मेश्राम
दोन्ही रा. वार्ड नं.२,सातरगांव , ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

// वि //
निरंक

ज्याअर्थी **मयत सुनील तुकाराम मेश्राम** यांचा **मृत्यू दि.२६.०३.२००१** मध्ये **सातरगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला.मयताचे **अर्जदार क्र.१ ही आई असून अर्जदार क्र. २ हे वडिल आहेत.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

जाहीर नोटीस

वि.ए.बी.कट्टे साहेब, न्यायदंडाधिकारी प्र.श्रे. अमरावती यांचे न्यायालय (कोर्ट नं.०१)
कि.कि.अर्ज क्र. १२३४/२०२६

अर्जदार - माधुरी सुनील पुरकर, वय ६५ वर्षे
रा.कुलस्वामिनी विहार, युनिक टॉवरच्या मागे, बडनेरा रोड सातुर्णा, अमरावती, ताजि.अमरावती
-- विरुध्द --
गैरअर्जदार- निबंधक जन्म मृत्यू, नोंदणी अधिकारी महानगरपालिका, अमरावती, ता.जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.०१ मध्ये जन्म मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३(३) प्रमाणे यातील अर्जदार **माधुरी सुनील पुरकर** यांनी **माधुरी सुनील पुरकर** यांच्या जन्माची नोंद दिनांक **१६.०८.१९६१** रोजी झाली आहे, अशी नोंद करणेचा हुकूम होण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.०७ यांनी नेमलेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक ०२.१२.२०२६ रोजी अगर त्यापुर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.कोर्ट नं.०७ पुढील योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी.

शिक्का

आदेशानुसार,
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३८१/२०२६
झाकिया अधिक सहा -वि- निरंक
पुढील ता.१५.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Zakiya Bano Mohammad Ishaque, Aged about 70 Yrs. Occu.: Housewife
2. Mohammad Naushad Mohammad Ishaque, Aged about 70 Yrs. Occu.:Labour
3. Mohammad Shahzad Mohammad Ishaque, Aged 45 Yrs. Occu.: Labour
4. Mohammad Ajaz Ahemad Mohammad Ishaque, Aged about 43 Yrs. Occu.: Labour
5. Shaheen Akhatar Waseem Raja, Aged about 39 Yrs. Occu.: Housewife
6. Nasrin Bano Tar Mohammad, Aged about 38 Yrs. Occu.: Housewife All Appli.No.1 to 6 R/o Mahuli Jahagir, Tq.Dist.Amravati.
7. Tamanna Bano Mohammad Shami, Aged about 41 Yrs. Occu.: Housewife R/o Ward No.3, Pardi, Tq. Morshi, Dist. Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Mohammad Ishaque Shaikh Ibrahim हे दिनांक 16.09.2005 रोजी Mahuli Jahagir, **ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Zakiya Bano Mohammad Ishaque+6 यांनी वरील्प्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Zakiya Bano Mohammad Ishaque+6 वरील्प्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१९.११.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१६५/२०२६
रामा व तीन -वि- निरंक
पुढील ता.०८.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Rama Satish Gorale, Aged about 66 Yrs. Occu.: Household
2. Ritesh Satishrao Gorale, Aged about 30 Yrs. Occu.: Labour Both R/o Akoli Road, Near Santoshi Mata Mandir, Amba Colony, Amravati
3. Dipali Ankush Wankhade, Aged about 38 Yrs. Occu.: Household R/o Yashoda Nagar No.2, Line No.2, Near Santoshi Mata Mandir, Rukhmini Nagar, Amravati
4. Rupali Nilesh Pachpute, Aged about 38 Yrs. Occu.: Household R/o Flat No.806, 8th Floor, Pipe Line Road, Sonadei Heights, Temghar, Bhiwandi, Po.Dandekarwadi, Dist.Pune

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Satish Manikrao Gorale हे दिनांक 10.07.2026 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Rama Satish Gorale+3 यांनी वरील्प्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Rama Satish Gorale+3 वरील्प्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, विद्यमान श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२३८४/२०२६
रजनी दामोधरराव गुडधे व ईतर -वि- निरंक
पुढील ता.२२.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
१. रजनी दामोधरराव गुडधे, वय ६७ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
२. विद्याशाली दामोधर गुडधे (लग्नापुर्वीचे नांव) सौ.विद्याशाली सोमेश्वर ससारे (लग्नानंतरचे नांव) वय ४४ वर्षे, व्यवसाय - घरकाम
४. शालिनी राजदीप गुडधे, वय ४४ वर्षे, व्यवसाय - नोकरी
५. राज्यंश राजदीप गुडधे, वय २० वर्षे, व्यवसाय - शिक्षण
६. राजवीर राजदीप गुडधे, वय १४ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
अर्जदार नं.६ अज्ञान तर्फे आई अर्जदार नं.४ अ.पा.क.
सर्व रा.उत्तम नगर, गल्ली नं.४ भीमटेकडी जवळ, अमरारवती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत दामोधरराव बारकाजी गुडधे** यांचे दिनांक **२५.०७.२०१...** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार रजनी दामोधरराव गुडधे व ईतर वि.निरंक** यांनी वरील्प्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रजनी दामोधरराव गुडधे व ईतर वि.निरंक** वरील्प्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२१.११.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील

किरकोळ (R.M.J.C.) क्र.३०८/२०२६ ने.ता.१५.१२.२०२६

अर्जदार : **१. चंद्रकला विठ्ठल चव्हाण**
२. गणेश विठ्ठल चव्हाण, दोन्ही रा.म्हसला, पो.मांजरी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. धृपता प्रदीप राठोड, रा.शंदानी किराणा जवळ, जेवड नगर, अमरावती
४. लक्ष्मी नितेश जाधव, रा.पांजरा बंगला, पो.चिंचोली, ता.कारंजा घाडगे, जि.वर्धा
५. सविता विजय राठोड, रा.सावंगा विठोबा, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
६. राणी विजय राठोड, रा.वार्ड न ं.३, लालखेड, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी मयत विठ्ठल रामदास चव्हाण **यांचा मृत्यू दि.**२७.०६.२०२४ **रोजी मांजरी म्हसला ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ पत्नी असून अर्जदार नं.२ हा मुलगा आणि अर्जदार नं.३ ते ६ या मुली आहेत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात** मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ **अंतर्गत अर्ज सादर केला आहे.**

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० **वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.**

आज दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्रीमती सुगंधा उबाळे** पत्ता बिलनपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.३२ संगणक मालमत्ता क्र.ACHA000/3773 जुना मालमत्ता क्र. 15000589 नझुल शिट क्र.२२-बी, प्लॉट नं.२१४ ही कर आकारणी नोंदवहीनुसार **वसंतराव भास्कररार उबाळे** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या **श्रीमती सुगंधा वसंतराव उबाळे** नावाने फेरफार घेण्याकरीता/नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये-क्षेत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **१९.११.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -
पुर्वेस - पिंगळे यांचे घर
पश्चिमेस - गणोरकर यांचे घर
उत्तरेस - रस्ता
दक्षिणेस - व्यवहारे यांचे घर

शिक्का

मुख्याधिकारी,
नगर परिषद, अचलपूर

जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्री.सै.सलीम सै.अशरफ व इतर १,** पत्ता देवडी, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२१ संगणक मालमत्ता क्र.ACHA000/15686 जुना मालमत्ता क्र. 21000757 नझुल शिट क्र.२४, प्लॉट नं.१७६/१ ही कर आकारणी नोंदवहीनुसार **अ.कलाम अ.रज्जाक** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या श्री.सै.सलीम सै.अशरफ, सै.अहेमद सै.अशरफ नावाने फेरफार घेण्याकरीता/नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये-क्षेत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **२३.११.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -
पुर्वेस - सरकारी रोड
पश्चिमेस - तुमचेच मालकीचे दुकान
उत्तरेस - रोड
दक्षिणेस - मालकीचे दुकान

शिक्का

मुख्याधिकारी,
नगर परिषद, अचलपूर

जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्रीमती डॉ.वनश्री मुकूंद देशपांडे,** पत्ता अभिनव कॉलनी, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.१५ संगणक मालमत्ता क्र.ACHA000/3772 जुना मालमत्ता क्र. 15000588 नझुल शिट क्र.२२-बी, प्लॉट नं.२१४ ही कर आकारणी नोंदवहीनुसार **मधुकरराव भास्कररार उबाळे** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या **श्रीमती वनश्री मुकूंद देशपांडे/सौ.अपर्णा अतुल धारकर** नावाने फेरफार घेण्याकरीता/नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये-क्षेत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **१९.११.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -
पुर्वेस - मनोहर पिंगळे यांचे घर
पश्चिमेस - मुकूंद गणोरकर यांचे घर
उत्तरेस - रस्ता
दक्षिणेस - व्यवहारे यांचे घर

शिक्का

मुख्याधिकारी,
नगर परिषद, अचलपूर

जाहीर प्रगटन

जाहीर प्रगटन देणार :- धनंजय रामरावजी व-हेकर,
वय ५७ वर्षे, व्यवसाय-मजूरी
रा.आदर्श नगर, गोपाल नगर जवळ, अमरावती तर्फे -
ॲड. श्री सी.बी.मिसाळ, अमरावती

आमचे पक्षकार धनंजय रामरावजी व-हेकर यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन या जाहीर प्रगटनाव्दारे सर्वांना सुचित करण्यात येते की, आमच्या पक्षकारांनी दि.०३.१२.२०२६ रोजी निंभोरा खुर्द येथील शिट नं.१७, मधील न.भु.क्र.४३४३ मधील ९२.६९ चौ.मिटर जागा रजिस्टर खरेदी खताने **विजय दामोधरराव पांडे,** यांचे जवळून विकत घेतली आहे. सदर जागा खरेदीखताच्या तारखेपासून आमचे पक्षकारांच्या ताब्यात व मालकी हक्काने आहे. सदर खरेदी आमचे पक्षकारांनी **विजय दामोधराव पांडे,** यांचे जवळून खरेदी घेतली आहे. सदर्हु स्थावर मिळकतीच्या महसुल अधिकार अभिलेखावरील नोंद भु.क्र.१०/१/अ/३४/ब/३५,क्षेत्र ०.९२.९३ चौ.मी.**धनंजय रामरावजी व-हेकर,** यांचे नावावर फेरफार नोंद रुजु करण्यात आलेली आहे. सदर निंभोरा खुर्द येथील शिट नं.१७, मधील न.भु.क्र.४३४३ मधील ९२.६९ चौ.मीटर संबंधी नझुल मालमत्ता पत्रक आमचे पक्षकारांनी मिळविले असता त्यावर खालील्प्रमाणे नावे नोंद आहेत. (१) काशीबाई हरनारायण साहू व इतर पाच, (२) डॉ.ठाकुरदास बालमुकुंद राठी, (३) सौ.विमलाबेन फुलाबाई पटेल व इतर एक, (४) सुरेश रामेश्वर जोशी व इतर एक, सर्व रा.राजेंद्र नगर, गोपाल नगर जवळ, अमरावती, ४४४ ६०७, सदर प्रकरणात नझुल रेकॉर्डला मालमत्ता पत्रकामध्ये आमचे पक्षकाराच्या नावाची नोद मालकी हक्काच्या रकान्यात होण्याकरिता त्या संदर्भात अपील वि.जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, अमरावती येथे सुरु आहे.

तरी आमचे पक्षकारांच्या नावाची नोंद नझुल रेकॉर्डला मालमत्ता पत्रकामध्ये सुरु असलेल्या अपिलाच्या प्रक्रियेमध्ये कोणालाही अथवा वरील मालमत्ता पत्रकातील नाव असलेल्या इसमांना काही हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रसिध्द झाल्या पासून १० दिवसाचे आंत आपली आपली हरकत वि.जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, अमरावती येथे नोंदवावी.

करिता सदर जाहीर प्रगटनाव्दारे कळविले आहे.

दिनांक २४.११.२०२६
अमरावती

ॲड.श्री.सी.बी.मिसाळ,
अमरावती, मो.क्र.- ८८८८६५५६८९

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ८२
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

प्रो.क्र.९६९/२०२६

वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस

विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्रमांक ३६७/२०२६ ने.ता.०४.०१.२०२७

अर्जदार :
1. Vikram Pandurang Ganvir, Age 56 Yrs. Occu.: Labour R/o Devari Nipani, Po.Jalka Hirapur, Tq.Bhatkuli, Dist.Amt.
2. Suresh Pandurang Ganvir, Age 64 Yrs. Occu.: Labour R/o Galli No.1, Siddharth Chowk, Amravati.
3. Jayvantabai Vishwanath Gajbhiye, Age 82 Yrs. Occu.Nil R/o Near Buddha Vihar, Naya Akola Tq.Dist.Amravati
4. Nalubai Mukindrao Gajbhiye, Age 63 Yrs. Occu.:Household R/o Hanuman Mandir Galli, Pimpalkhuta Armal, Dist.Amt.

-- विरुध्द --

गैरअर्जदार: निरंक

ज्यापेक्षा Pandurang Kanhoji Ganvir हे दि.**१७.०९.२००७** रोजी मयत झाले. आणि Rayawanta Pandurang Ganvir हे दि.**१४.०८.१९८९** रोजी मयत झाले. अर्जदार Vikram Pandurang Ganvir, Age 56 Yrs. Occu.: Labour, R/o Devari Nipani, Po.Jalka Hirapur, Tq.Bhatkuli, Dist.Amravati व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २** प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.**१७.११.२०२६** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत Pandurang Kanhoji Ganvir & Rayawanta Pandurang Ganvir यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत Pandurang Kanhoji Ganvir & Rayawanta Pandurang Ganvir यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहू न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २०.११.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
भातकुली

जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्री.अशोक उकर्डाजी सोनपरोते** पत्ता अब्बासपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२७ संगणक मालमत्ता क्र.ACHA000/9935 जुना मालमत्ता क्र. 27000131 नझुल शिट क्र.६-डी, प्लॉट नं.१८० ही कर आकारणी नोंदवहीनुसार **रुपराव विठ्ठलराव सोनपरोते** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या **श्री.अशोक उकर्डाजी सोनपरोते** नावाने फेरफार घेण्याकरीता/नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये-क्षेत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **२०.१०.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. या

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

सातेगाव येथील शेतकरी पुत्र आत्महत्या प्रकरण

फायनान्स कंपनीच्या चार कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल

अंजनगाव सुर्जी/वार्ताहर

कर्जाची पूर्ण परतफेड झाल्यानंतरही फायनान्स कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून होणाऱ्या सततच्या मानसिक त्रासाला आणि धमक्यांना कंटाळून सातेगाव येथील एका ४० वर्षीय शेतकऱ्याने जीवन संपवल्याची धक्कादायक घटना घडली होती. या प्रकरणी मृत शेतकऱ्याच्या पत्नीने दिलेल्या तक्रारीवरून रहिमापूर पोलिसांनी दोन फायनान्स कंपन्यांच्या चार कर्मचाऱ्यांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.अमोल मुरलीधर काळे (वय ४०, रा. सातेगाव)



असे आत्महत्या केलेल्या दुर्दैवी शेतकऱ्याचे नाव आहे.

अमोल काळे यांनी शेती व घरगुती कामासाठी अंजनगाव सुर्जी येथील 'स्पंदन स्फूर्ती फायनान्स लिमिटेड' आणि परतवाडा येथील 'महिंद्रा होम फायनान्स' या दोन संस्थांकडून कर्ज घेतले होते. त्यांनी या कर्जाची परतफेडही केली होती. मात्र, त्यानंतरही संबंधित कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांकडून त्यांना फोनवरून वारंवार शिवीगाळ करणे, धमक्या देणे आणि मानसिक छळ करणे सुरूच होते.या सततच्या छळाला आणि तणावाला कंटाळून अमोल काळे यांनी २ नोव्हेंबर रोजी सातेगाव शिवारात आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपवली. या घटनेमुळे सातेगाव परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात होती.घटनेनंतर मृत शेतकऱ्याच्या पत्नी आरती अमोल काळे यांनी रहिमापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास आणि चौकशी केली. चौकशी अहवाल आणि पत्नीच्या जबाबातून अमोल काळे यांच्या मृत्यूस फायनान्स कंपनीचे चार कर्मचारी जबाबदार असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिसांनी



सुनील रामदास पेलने (स्पंदन स्फूर्ती फायनान्स लि., शाखा अंजनगाव सुर्जी) कुणाल रामदास इंगळे (स्पंदन स्फूर्ती फायनान्स लि., शाखा अंजनगाव सुर्जी) सुहास डायगव्हाणे (महिंद्रा होम फायनान्स, शाखा परतवाडा) राजेंद्र चालके (महिंद्रा होम फायनान्स, शाखा परतवाडा) या चार जणांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या घटनेमुळे ग्रामीण भागात फायनान्स कंपन्यांकडून कर्ज वसुलीच्या नावाखाली शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या अमानुष मानसिक त्रासाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिक व शेतकरी वर्गातून होत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास रहिमापूर पोलीस करीत आहेत.

हंगामी फळ-भाज्यांची बाजारात रेलचेल

लिंबाला मागणी,ढोबळा मिरचीची आवक घटली

अमरावती/का.प्र.

अमरावतीच्या फळे व भाजीपाला बाजारात हंगामी फळांची आवक वाढली आहे. सीताफळ, आवळा आणि लहान आकाराच्या संत्र्यांची आवक लक्षवेधी ठरत असून, भाजीपाला बाजारात बटाटा, कांदा आघाडीवर आहेत. दुसरीकडे लिंबाला मागणी वाढल्याने दर टिकून आहेत.

विदर्भातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी बाजारपेठ असलेल्या अमरावतीच्या फळे व भाजीपाला बाजारात सध्या हंगामी फळांची रेलचेल पाहायला मिळत आहे. सीताफळाची आवक १६० क्विंटलवर पोहोचली असून, ३००० ते ४००० रुपये प्रतिक्विंटल दराने व्यवहार होत आहेत. आवळ्याची आवक ८७ क्विंटल नोंदविण्यात आली असून, त्याला ३५०० ते ४००० रुपये प्रतिक्विंटल दर मिळत आहे. लहान आकाराच्या संत्र्यांना स्थानिक भाषेत 'चूरा' म्हटले जाते. या संत्र्यांची आवक सध्या ४५७ क्विंटलवर पोहोचली आहे. त्यांना १५०० ते ४००० रुपये प्रतिक्विंटल दर मिळत आहे. मोसंबीची ३८० क्विंटल आवक झाली असून, १५०० ते



३००० रुपये प्रतिक्विंटल दराने व्यवहार होत आहेत. डाळिंबाची ७१ क्विंटल आवक झाली असून, १२,००० ते १३,००० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. तैवान पपईची ८३ क्विंटल आवक झाली असून, २५०० ते ३२०० रुपये दर मिळत आहे.

लिंबाची आवक अवघी ४८ क्विंटल नोंदविण्यात आली. तुलनेने कमी आवक आणि वाढती मागणी यामुळे लिंबाचे दर ६००० ते ७००० रुपये प्रतिक्विंटलपर्यंत पोहोचले आहेत. हिरव्या हरभऱ्याची बाजारातील आवक सर्वाधिक ७८२ क्विंटल झाली. त्याला १५०० ते २५०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. पेरूची ८८ क्विंटल आवक झाली असून, २००० ते ३००० रुपये प्रतिक्विंटल दराने व्यवहार झाले.

बटाटा, कांद्याची मोठी आवक

भाजीपाला बाजारात बटाटा आणि कांद्याची आवक तुलनेने अधिक आहे. बटाट्याची ५२४ क्विंटल आवक झाली असून, ७०० ते १४०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. कांद्याची ४१५ क्विंटल आवक नोंदविण्यात आली. त्याला २५०० ते ४५०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळत आहे. लसणाची ११३ क्विंटल आवक झाली असून, दर ७००० ते २२००० रुपये प्रतिक्विंटलपर्यंत आहेत. आल्याची ७१ क्विंटल आवक झाली असून, ५००० ते ७००० रुपये दर मिळाला. टोमॅटोची २२२ क्विंटल आवक झाली असून, १००० ते २००० रुपये प्रतिक्विंटल दराने व्यवहार झाले. वांग्याची १२४ क्विंटल आवक झाली असून,१२०० ते १७०० रुपये दर मिळाला. फ्लॉवरची ११७ क्विंटल आवक झाली असून, १००० ते १५०० रुपये दर आहेत. कोबीची १२३ क्विंटल आवक झाली असून, ८०० ते १००० रुपये प्रतिक्विंटल दर मिळत आहे. पालेभाज्यांमध्ये पालकाची १७४ क्विंटल आवक झाली असून, ९०० ते १३०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. मेथीची ७७ क्विंटल आवक झाली असून, २००० ते ३००० रुपये दर आहेत. कोथिंबिरीची १२४ क्विंटल आवक झाली असून, १ हजार ५०० ते २५०० रुपये दराने व्यवहार होत आहेत.

हिरव्या मिरचीचे दर टिकून

वेलवर्गीय आणि इतर भाज्यांमध्ये कारल्याची ६१ क्विंटल आवक झाली असून, २ हजार ६०० ते ३२०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. बरबटीची ५३ क्विंटल आवक झाली असून, २००० ते ३००० रुपये दर आहेत. काकडीची ८४ क्विंटल आवक झाली असून, २००० ते ३००० रुपये दर मिळत आहेत. हिरव्या मिरचीची १२८ क्विंटल आवक झाली असून, ३५०० ते ४५०० रुपये प्रतिक्विंटल दर टिकून आहेत. ढोबळी मिरचीची आवक मात्र गेल्या चार महिन्यांपासून अत्यल्प आहे. सध्या अवघी ९ क्विंटल आवक नोंदविण्यात आली असून, २००० ते ३००० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. भेंडीची ७७ क्विंटल आवक झाली असून, २२०० ते २८०० रुपये प्रतिक्विंटल दराने व्यवहार झाले.

डॉ. दीपिका दातीर बनल्या अंजनगाव बारीच्या पहिल्या महिला सर्जन

अंजनगाव बारी/वार्ताहर

अंजनगाव बारीसारख्या छोट्याशा गावातील एका शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या लेकीने आपल्या जिद्द, मेहनतीच्या बळावर यशाचे उत्तुंग शिखर गाठले आहे. डॉ. दीपिका विजय दातीर हिने जयपूर येथील National Institute of Ayurveda ceOetve Master of Surgery (Shalya Tantra) ही पदव्युत्तर पदवी संपादन केली असून, अंजनगाव बारीतील पहिली महिला सर्जन डॉक्टर होण्याचा मान मिळवला आहे.

डॉ. दीपिका हिचे इयत्ता दहावीपर्यंतचे शिक्षण जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अंजनगाव बारी येथून झाले. त्यानंतर श्रीमती विमला देवी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल, चंद्रपूर येथून तिने BAMS ही पदवी संपादन केली. पुढे आपल्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल सुरू ठेवत जयपूर येथील राष्ट्रीय आयुर्वेद संस्थेतून Master of Surgery (Shalya Tantra) ही पदव्युत्तर पदवी मिळवली.

या यशामागे डॉ. दीपिकाची जिद्द, अभ्यासातील सातत्य आणि कठोर परिश्रम जितके महत्त्वाचे आहेत, तितकाच तिच्या कुटुंबीयांचा विश्वास, पाठिंबा आणि मोलाचे मार्गदर्शनही महत्त्वाचे आहे. वडील विजय दातीर आणि आई माया दातीर यांनी आपल्या मुलीच्या स्वप्नांना बळ देत तिच्या शिक्षणासाठी घेतलेल्या कष्टांचे आज खऱ्या अर्थाने चीज झाले आहे.या यशाचे श्रेय तीने कुटुंबियांना तसेच सर्व गुरुवर्य आणि मार्गदर्शक डॉक्टर यांना दिले आहे.



संक्षिप्त

परशुराम आर्थिक विकास महामंडळामार्फत शिबीर

अमरावती- ब्राह्मण समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल बेरोजगार युवक-युवतींसाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळामार्फत योजनांची माहिती देण्यासह त्यांचे अर्ज स्वीकारण्यासाठी राज्यभर एक दिवसीय शिबिरांचे महसूल विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी आयोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांनी महामंडळाच्या pavm.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर पूर्व-नोंदणी करून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले यांनी केले आहे. महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना' आणि 'गट कर्ज व्याज परतावा योजना' या दोन योजनांच्या प्रचार-प्रसिद्धीसाठी तसेच पात्र लाभार्थ्यांचे अर्ज प्रत्यक्ष स्वीकारण्यासाठी महसूल विभागास्तरावर त्या त्या दिवशी सकाळी ११ वाजता एक दिवसीय शिबिरे घेण्यात येणार आहेत. जिल्हा नियोजन समिती सभागृह, नागपूर येथे २५ नोव्हेंबर रोजी, जिल्हा नियोजन समिती सभागृह अमरावती येथे २६ नोव्हेंबर, जिल्हा नियोजन समिती सभागृह छत्रपती संभाजीनगर येथे २८ नोव्हेंबर रोजी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच नाशिक, पुणे व रत्नागिरी येथे या तारखांना जोडून शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याबाबत दिनांक व ठिकाण लवकरच जाहीर करण्यात येईल.शिबिरात सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांना नाव नोंदणीसाठी महामंडळाच्या संकेतस्थळावर लिंक उपलब्ध आहे. योजनांच्या लाभांसाठी अर्ज प्रक्रिया पूर्णतः ऑनलाईन / ऑफलाईन स्वरूपाची आहे. अधिक माहितीसाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ, विभागीय आयुक्त कार्यालय, विधान भवन, पुणे-४११००१ येथे भेट द्यावी किंवा महामंडळाचे संकेतस्थळ, ईमेल- pavm.gov@gmail.com, दूरध्वनी क्र. ०२०-२९९८२१२५ वर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

आदर्श गणेशोत्सव व नवदुर्गोत्सव मडळांचा सत्कार



चांदूर रेल्वे- अमरावती ग्रामीण पोलीस दलातर्फे २०२६ ऑपरेशन कवच या उपक्रमा अंतर्गत आदर्श गणेशोत्सव व नवदुर्गाउत्सव स्पर्धा घेण्यात आली होती.या स्पर्धेत राजेवीर संभाजी गणेशोत्सव मंडळ इंदिरा नगर चांदूर रेल्वे जि. अमरावती यांना पोलीस स्टेशन चांदूर रेल्वे अंतर्गत प्रथम पारितोषिक मिळाले.यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी चांदूर रेल्वे मा. गिरीष तातोड यांच्या हस्ते व पोलीस स्टेशन चांदूर रेल्वेचे ठाणेदारमंगेश मोहोड यांच्या तर्फे देण्यात आले.यावेळी सहायक पोलिस निरीक्षक राजीव हाके, पोलिस अंमलदार रोहित मिश्रा,गोपनीय कर्मचारी योगेश कडुकर, संदीप बदुकले उपस्थित होते. मंडळातर्फे संस्थापक स्वप्निल मानकर, अध्यक्ष श्रेयस गावंडे, सचिव प्रणय खेरकर,सहसचीव मयूर शिदोडकर यांनी पारितोषिक स्वीकारले. या वर्षी सुद्धा मंडळाने पारितोषिकाची परंपरा कायम ठेवली.

इंदूबाई विधळे यांचे निधन



कुऱ्हा- तिवसा तालुक्यातील मार्डी येथील जेष्ठ महिला इंदूबाई यशवंतराव विधळे यांचे वयाच्या ८८ व्या वर्षी वृध्दापकाळाने निधन झाले त्यांच्या पश्चात पाच मुले, एक मुलगी, स्नुषा, जावाई, नातू नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

जलाशयांवर स्थलांतरित पक्ष्यांच्या संख्येत घट



अमरावती-प्र.सु.हिरुरकर

शरद ऋतूतील कार्तिक मासाच्या अखेरच्या दिवशी जलाशयावर येणाऱ्या स्थलांतरित पक्षी निरीक्षणासाठी निघालो. थोडं फार ढगाळ आणि थोडेफार उन्हं आणि हलकासा गारवा अंगावर झेलत अमरावतीच्या छत्री तलावावर पावलं पडली. सोबत मित्र पक्षी अभ्यासक श्री सुरेश खांडेकर होते.यावर्षीच्या कमी पावसामुळे इतर तलावांसारखी या तलावाचीही अवस्था आहे. मात्र नदी सुरय, शेकाट्या, कुट, हळदी कुंकू इ. पक्ष्यांचे थवे तलावाच्या दक्षिण भागात आढळून आले. त्यात अत्यंत कमी प्रमाणात लालसरी (Red-creasted Pochard) पक्ष्याचे एक कुटुंब नर,मादी व त्याचं इवलसं पिल्लू आढळून आलं. हा पक्षी जवळपास ११ हजार किलोमीटरचे अंतर पार करून युरोप, सायबेरिया येथून हिवाळ्यात दरवर्षी भारतात येतात.परंतु छत्री तलावावर हिवाळ्यात पुर्वी जशी हजारो पक्ष्यांची जत्रा राहायची ती आता दरवर्षी हळूहळू कमी व्हायला लागली आहे.

काही वर्षांपूर्वी याच काळात हा तलाव हजारो लालसरी(Red -creasted Pochard)पक्ष्यांच्या उपस्थितीतीने लाल रंगाचा व्हायचा. आता या तलावाला पुर्व-उत्तर भागात बेशरम वनस्पतीने विळखा घातला आहे.त्याचा नायनाट करणे अत्यावश्यक बाब आहे. तेथून पुढे दुचाकीने भानखेड मार्ग मालखेड तलावावर सावंगा विठोबा भागात पोहोचलो. मालखेड तलाव दरवर्षी प्रमाणे यावर्षीही पाण्याने संपूर्ण भरला आहे. शेकाट्या, चमचा,काळा कंकर,बगळे इ. पक्ष्यांची काही प्रमाणात उपस्थिती आढळून आली. काठावरच्या हिरव्या तृणमेळयात एक पिवळ्या रंगाचा, शेपटी सतत खाली वर करणारा'पिवळा रानधोबी' आढळून आला. हा एक अत्यंत सुंदर पक्षी असून दुर्मिळ आहे. या जलाशयावरही काही वर्षांपूर्वी हिवाळ्यात हजारो पक्ष्यांची मांदियाळी असायची. आता ती हळूहळू कमी होत आहे. तेथून पुढे'शेवती' धरणाकडे निघालो. शेवती तलावही यावर्षी पाण्याने काही प्रमाणात कमी भरला आहे. पक्ष्यांचे प्रमाण अतिशय कमी असून नदी सुरय, शेकाट्या,पाणकावळे दिसून आलेत. दुर्मिळ 'थिक नी' पक्ष्यांसाठी हा तलाव प्रसिद्ध आहे. तो एकटा शेवतीच्या काठावरच्या दगडधोंड्यात दिसून आला. महत्वाचे म्हणजे पिवळ्या कंठाच्या माळटिटवीच्या दोन जोड्या येथे दिसून आल्या. येथे हिवाळ्यात राजहंस (Bar-headed Goose)पक्ष्यांचे थवे तीन महिने मुक्कामाला असतात. यावर्षी एकही राजहंस येथे आढळून आला नाही. कदाचित थंडीचे प्रमाण वाढल्यावर येतील



अशी आशा करु या. मात्र आज शेवतीने भुरळ घातली ती पिवळ्या कंठाच्या माळटिटवी पक्ष्याच्या सौंदर्याने. तेथून पुढे निघालो अमरावती-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील सावर्डी गावाजवळून अवघ्या तीन-चार किलोमीटर अंतरावर असलेल्या जळका शहापूर तलावाकडे.

जळका शहापूरच्या तलावावर जाणारा एक-दिड किलोमीटरचा दगड-मातीचा रस्ता नेहमी सारखाच अत्यंत खराब असल्याने गाडी चालवताना अतीशय कसरत करावी लागते. बाजूने असलेल्या सिमेंट विटांच्या कारखान्यामुळे या रस्त्याने मोठमोठ्या टिप्परची ये-जा सुरु असते. त्यांच्या मोठमोठ्या चाकांच्या खोल चाकोल्यांमुळे या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. मध्यभागी पाण्याच्या लहान-मोठ्या डबक्यांमुळे सध्या हा तलाव कसाबसा जीवंत दिसतो. तसा तो दरवर्षी या काळात पुर्ण भरलेला असतो. हा तलाव ११४ राजहंस (Bar-headed Goose)पक्ष्यांच्या थव्यासाठी प्रसिद्ध आहे. यावर्षी सध्या येथे जवळपास केवळ वीस -पंचवीस राजहंस पक्षी दिसून आले. जवळपास पाच वर्षांपूर्वी येथे आम्हाला मानव नावाच्या शिका-याने सुंदर अशा राजहंस पक्ष्याची शिकार करतांना पाहायला मिळाली होती. शिका-यांनी राजहंसाला जाळ्यात अडकवले होते. पलीकडच्या काठावरचा हा प्रकार आम्ही दोघेही अलीकडच्या काठावरुन पाहात होतो. केवळ तो क्षण कॅमेरात बंदिस्त कसा करता येईल एवढाच त्यावेळी माझा प्रयत्न होता आणि तो काही प्रमाणात यशस्वीसुध्दा झाला होता. दरवर्षी हिवाळ्यात पक्ष्यांनी गजबजत असलेला हा जळका शहापूरचा तलाव यावर्षी काही मोजक्याच पाण पक्ष्यांमुळे अबोल वाटत आहे. जवळपास पंधरा रंगीत चित्रबलाक या पक्ष्यांची उपस्थिती नोंद करण्यासारखी



आहे.

यावर्षी मान्सूनने मराठवाडा -विदर्भावर वक्रदृष्टी फिरवली असल्याने पाण्याचा दुष्काळ पडला आहे. शेतातील पिकही गेली आहे. आता पासून पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष जवळपास सर्वच भागात जाणवत आहे. पश्चिम विदर्भात तर ही परिस्थिती अतिशय बिकट झाली आहे. त्यामुळेच धरणं पाण्याने अतिशय कमी भरली असून धरणाची काठं चिखलाविना दिसत आहे आणि त्यामुळेच पाणपक्ष्यांनीही ब-याच धरणाकडे पाठ फिरवली असावी. आज आम्ही एका दिवसात छत्री, मालखेड, शेवती आणि जळका शहापूर या चार जलाशयांना भेट दिली. पक्षी निरीक्षणं केली. जैविक विविधतेच्या दृष्टीनेही थोडेफार निरीक्षण केले. तसे मी पक्षी निरीक्षण व लेखन हा छंद गेल्या जवळपास चार दशकांपासून बाळगतो. तेही निसर्गाचा एक इवलासा विद्यार्थी समजून. मागील आठवड्यात मी नळ-दमयंती सागराला भेट दिली. तेथेही हिच अवस्था आहे. नांदगाव पेठ जवळच्या बोर धरणावरही हिच परिस्थिती आहे. एकमात्र नक्की आहे ते म्हणजे धरणं,जलाशय, नद्या इ. वरील जैव विविधता हळूहळू कमी कमी होत चालली आहे. हा प्रवास कुठे आणि कधी थांबणार? हे पक्षी शास्त्रज्ञ,तज्ञ आणि अभ्यासकच सांगू शकतील.अलिकडच्या काळात पक्षी निरीक्षण करणा-या डोळ्यांची संख्या वाढली आहे. ही एक अत्यंत चांगली बाब असून वृत्तपत्रांही जलाशयावर पहिल्यांदा एखादा नवीन स्थलांतरित पक्षी आला की कुणाच्या तरी नजरेत पडतोच. यामुळे जिल्ह्याच्या पक्षीसुचीमध्ये भर पडते,ही अभिमानाची बाब आहे. मात्र गेल्या जवळपास तीन दशकांपासून जलाशयांवर दरवर्षी हिवाळ्यात येणाऱ्या स्थलांतरित पक्ष्यांची संख्या हळूहळू घटत आहे, हे मात्र निश्चित खरे. याचा विचार कोण करणार?



वन्यजीव लेखक, अमरावती
मो.९८२२६३९७९८

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

आणखी दोन बालकांची विक्री झाल्याचा संशय

नवजात बालक विक्री प्रकरण

-डॉ. वैशाली भोजनेकडून आठ बालकांची विक्री; चार बालकांचा अद्याप शोध सुरूच

अमरावती/प्रतिनिधीः-

शहरात गाजत असलेल्या नवजात बालकांच्या विक्री प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. या प्रकरणात आणखी दोन नवजात बालकांची विक्री झाल्याची माहिती पोलिसांच्या तपासात समोर येत आहे. यापूर्वी डॉ. वैशाली भोजने हिने सहा बालकांची विक्री केल्याची कबुली दिल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, परिचारिका मेरी नगराळे आणि संगीता गवई यांच्या जबाबांतून आणखी दोन बालकांच्या विक्रीचा संशय बळावला आहे. त्यामुळे



आतापर्यंत आठ नवजात बालकांची विक्री झाल्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या प्रकरणातील अटक करण्यात आलेल्या परिचारिका मेरी नगराळे, संगीता गवई, सरदार तसेच बालक खरेदी करणाऱ्या दाम्पत्यासह पाच आरोपींना न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यानंतर पोलिसांनी सर्व आरोपींची कारागृहात रवानगी केली. या प्रकरणाच्या तपासादरम्यान पोलिसांनी यापूर्वी चार नवजात बालकांची सुटका केली होती. तसेच बालकांची खरेदी करणाऱ्या दाम्पत्यांविरुद्धही गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्यात आली होती. आरोपींच्या जबाबांतून बालक विक्रीचे धक्कादायक प्रकार उघडकीस येत असताना विक्री झालेल्या बालकांची संख्या सहावरून आठवर पोहोचल्याची माहिती ☞(पान २ वर)

दंडाच्या मेसेजमागे सायबर भामट्यांचा सापळा

वाहनधारकांना सावधानतेचा इशारा!

अमरावती/प्रतिनिधीः-

वाहतुकीचा नियम मोडल्यामुळे दंड भरायचा आहे, असा संदेश मोबाईलवर आला की अनेक वाहनधारक तो खरा मानून तातडीने दंड भरण्याचा प्रयत्न करतात. मात्र, वाहनधारकांची हीच घाई सायबर गुन्हेगारांच्या पथ्यावर पडत आहे. ई-चलानच्या नावाखाली बनावट संदेश आणि लिंक पाठवून नागरिकांना आर्थिक जाळ्यात ओढण्याचा नवा प्रकार समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती शहर वाहतूक पोलिसांनी वाहनधारकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनांवर सीसीटीव्ही आणि अन्य यंत्रणांच्या माध्यमातून ई-चलानची कारवाई केली जाते.

-ई-चलानच्या नावाने मोबाईलवर बनावट लिंक

एका क्लिकने आर्थिक फटका बसण्याची शक्यता

त्यानंतर संबंधित वाहनधारकाच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर दंडाची माहिती पाठविली जाते. सायबर भामट्यांनी याच प्रक्रियेचा गैरफायदा घेण्यास सुरुवात केली आहे. वाहनधारकांना प्रलंबित दंड भरल्याशिवाय कारवाई होईल, अशा आशयाचे संदेश पाठवून त्यासोबत लिंक दिली जाते. ही लिंक अधिकृत असल्याचा भास निर्माण करून नागरिकांना त्यावर क्लिक करण्यास प्रवृत्त केले जाते. पोलिसांच्या माहितीनुसार, अधिकृत ☞(पान २ वर)

फिनले मील कामगार सुनील दाभाडे यांनी केली आत्महत्या

कोरोना काळापासून मील बंद, आतापर्यंत १७ कामगारांनी संपविले जीवन

अचलपूर/प्रतिनिधीः-

सरमसपुरा येथील पोलिस स्टेशन हद्दीत २४ नोव्हेंबर रोजी फिनले मील कामगाराने राहत्या घरी आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. प्राप्त माहितीनुसार ,अचलपूर शहरातील फिनले मील मध्ये कामगार म्हणून मृतक सुनील रामदास दाभाडे (वय ४५) कार्यरत होते .मात्र कोरोना काळापासून अचलपूर शहरातील फिनले मील बंद आहे. यामुळे आतापर्यंत १७ कामगारांनी आपले जीवन संपविले आहे. मृतक सुनील दाभाडे यांना दोन मुले आहे. काल २४ नोव्हेंबर रोजी राहत्या घरी १८ वर्षाचा मुलगा घरी अभ्यास करीत होता आणि दुसरा १४ वर्षाचा मुलगा बाहेर परिसरात खेळत होता .यादरम्यान १८ वर्षीय मुलाला त्यांचे वडील सुनील दाभाडे यांनी दोरीच्या सहायाने आत्महत्या केल्याचे दिसले.त्यानंतर ही वार्ता परिसरात पसरली आणि नागरिकांची गर्दी झाली. त्यानंतर मृतक सुनील दाभाडे यांना सीपीआर सुद्धा देण्यात आला.तोपर्यंत सुनील दाभाडे यांचा मृत्यू झाला होता. काही दिवसापूर्वी सुनील दाभाडे हे रोजगारासाठी नागपूर ला गेले होते आणि परत घरी आले होते. त्यांच्या निधनामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे .या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस करीत आहे.आत्महत्येचे कारण पोलिस तपासानंतर कळू शकणार आहे.



कोरोना काळापासून अचलपूर शहरातील फिनले मील बंद आहे .यामुळे कामगारांना कुटुंबाचा उदरनिर्वाह करताना अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे. विविध कामगार संघटनांनी अनेक आंदोलन ,उपोषण केले. पण केंद्र शासनाकडून बंद मील पूर्वरत सुरू करण्याबाबत ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही .या मील मध्ये स्थायी कामगार म्हणून मृतक सुनील दाभाडे कार्यरत होते.त्यांचे दोन्ही मुले शिक्षण घेत आहे . पण ☞(पान २ वर)

४० प्रवाशी असणाऱ्या बसची विश्व हिंदू परिषदेच्या सदस्यांनी फोडली काच

स्वीकृत नगरसेवक नील महेश्वरी यांच्या समय सुचकतेमुळे टळली मोठी घटना

अचलपूर/प्रतिनिधीः-

राजस्थान वरून मध्य प्रदेशातील उज्जैनमध्ये दर्शनासाठी आलेल्या ४० प्रवाशी असणाऱ्या बस ची विश्व हिंदू परिषदेच्या सदस्यांनी काचे फोडून प्रवाशी वर्गात भिती निर्माण केल्याची घटना उघडकीस आली आहे.या बस मध्ये अचलपूर नगर परिषदेचे स्वीकृत नगरसेवक नील महेश्वरी सुद्धा उपस्थितीत होते. अचलपूर नगर परिषदेचे स्वीकृत नगरसेवक नील महेश्वरी यांच्या समय सुचकतेमुळे मोठी घटना टळली आहे.त्या घटनेमुळे बस मधील प्रवासी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ अचलपूर नगर परिषदेचे स्वीकृत नगरसेवक नील महेश्वरी यांनी सोशल मीडियावर शेअर केला आहे. त्या संपूर्ण घटनेचा थरार सांगितला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.



त्यांनी सांगितले आहे की, राजस्थान वरून विविध प्रसिध्द तीर्थ स्थळांचे दर्शन घेऊन ४० प्रवाशांसह आमची बस मध्य प्रदेशातील उज्जैन कडे रवाना झाली.मध्य प्रदेशात रात्री दरम्यान अचानक बस समोर आलेल्या गाईला बस चालकाने वाचवण्याचा प्रयत्न केला.मात्र त्या धडकेत गायचा दुर्दैवी मृत्यू झाला.आम्हाला या घटनेची कोणतीही माहिती नव्हती.यानंतर विश्व हिंदू परिषदेच्या सदस्यांनी आमच्या बस चा पाठलाग करीत ☞(पान २ वर)

तपोवन संस्थेला डॉ. रमेश गोडबोले स्मृती सेवा पुरस्कार

अमरावती/प्रतिनिधीः- स्व. डॉ. रमेश गोडबोले स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा स्मृती सेवा पुरस्कार यंदा विदर्भ महारोगी सेवा समिती तपोवन संस्थेला दिला जाणार आहे. शनिवार २८ नोव्हेंबर रोजी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसदकर सभागृहामध्ये सायंकाळी ६ वाजता नागपूरच्या लता मंगेशकर युनिव्हर्सिटी चे मुख्य सल्लागार डॉ.वेद प्रकाश मिश्रा आणि माजी संपादक श्रीपाद अपराजित यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोह घेण्यात येणार असल्याची माहिती आज मंगळवार २४ नोव्हेंबर रोजी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये आयोजकांनी दिली.



-२८ रोजी एचव्हिपीएममध्ये सोहळा

पत्रकार परिषदेमध्ये प्रा. मोहन काटे, प्रा.डॉ. अविनाश मोहरिल, अभय देव, सोपान गोडबोले, अतुल गायगोले, अनंत कौलगीकर, शैलेश वानखडे, सुबोध क्षीरसागर आदि उपस्थित होते.

आयोजकांनी सांगितले की तपोवन संस्थेला पुरस्कार देण्याचा निर्णय निवड समितीने एकमताने केला आहे. स्व.दादासाहेब पटवर्धन यांनी स्थापन केलेल्या विदर्भ महारोगी सेवा समिती तपोवन यांच्या कार्याचा परिचय अमरावतीकरांना आहे. महारोग झालेल्या रुग्णांसाठी कार्य करणारी ही संस्था आपल्या कार्याने संपूर्ण देशभरात ख्यातीप्राप्त आहे. समाजाने नाकारलेल्या महारोग झालेल्या महारोगींना येथे आश्रय दिला जातो तसेच त्यांना सन्मानाने जीवन जगण्याची संधी येथे मिळते. याच कार्यामुळे संस्थेची पुरस्कारासाठी निवड झाली आहे. पुरस्काराचे स्वरूप एक लक्ष रोख स्मृतीचिन्ह व कार्य गौरव पत्र दिल्या जाणार आहे. डॉ. रमेश गोडबोले विदर्भात परिचित आहे.वैद्यकीय क्षेत्रात त्यांनी आपल्या अविरत सेवांनी ☞(पान २ वर)

नगरसेवक गव्हाळे यांना अटकपूर्व जामीन

अमरावती/प्रतिनिधीः- मनपा झोन क्रमांक ३ चे सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे यांच्यासोबत त्यांच्या कार्यालयात झालेल्या कथित मारहाण व शिवीगाळ प्रकरणात शिवसेना उबाठाचे प्रभाग क्रमांक २० चे नगरसेवक संजय गव्हाळे यांना न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन मिळाला आहे. आज मंगळवार, २४ नोव्हेंबर रोजी ते पक्षाचे पदाधिकारी नितीन तारेकर यांच्या सोबत फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात पोहोचले आणि त्यांनी जामिनाचे कागदपत्र सादर करून याबाबत माहिती दिली.मनपा झोन क्रमांक ३, दस्तुर नगरचे सहाय्यक आयुक्त तथा उपअभियंता नितीन बोबडे यांच्या सोबत त्यांच्या कार्यालयात कथित मारहाण व



शिवीगाळ झाल्याच्या घटनेत फ्रेजरपुरा ठाण्यात नगरसेवक संजय गव्हाळे व त्यांच्या एका साथीदाराविरुद्ध बीएनएस कलम १३२, २२१, ३२४(४), २९६, ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल झाला होता.

नगरसेवक संजय गव्हाळे यांनी फ्रेजरपुरा ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर स्थानिक न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन प्राप्त केला आणि आज फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात पोहोचले. त्यांनी ठाणेदार राजुलवार यांच्यासमोर हजर होऊन जामिनाचे कागदपत्र सादर केले.

जुगार अड्ड्यांवर गुन्हे शाखेचे छापे; १५ जणांना अटक

अवैध दारूविक्रीवरही कारवाई

अमरावती/प्रतिनिधीः-

शहरातील अवैध धंद्यांविरोधात गुन्हे शाखेच्या पोलिसांनी विशेष मोहीम राबवत जुगार अड्ड्यांवर धडक कारवाई केली. नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत तीन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून १५ जणांना जुगार खेळताना पकडण्यात आले. या कारवाईत एकूण ३५ हजार ५८० रुपयांची रोकड आणि जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. याशिवाय अवैध देशी दारूविक्रीच्या दोन प्रकरणांतही पोलिसांनीं कारवाई केली. गुन्हे शाखेच्या पथकाने नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत पहिली कारवाई करत चांदणी चौक येथील अब्दुल अर्शीद (वय ४०) याच्यासह १३ जणांना जुगार खेळताना पकडले. त्यांच्यामध्ये पंकज साहू (वय ३८), शंकर गुप्ता (वय ३६), चेतन यादव (वय ३८), अमित सोनवणे (वय ३६), कुंदन सूर्यवंशी (वय ३५), आदित्य आठवले (वय २४), राहुल ठाकरे (वय ४२), मोहित साहू (वय ३८), अक्षय राऊत (वय ३४), ☞(पान २ वर)

पैसे कमवायला फ्रान्सला जातो असे सांगणारा मुलगा बेपत्ता

आईला फोन करून बंद केला मोबाईल

मोर्शी/प्रतिनिधीः-

मुंबई येथून फ्रान्सला पैसे कमवायला जातो' एवढेच सांगत मोबाईल बंद करणाऱ्या २० वर्षीय शुभमचा शोध मोर्शी पोलिसांकडून सुरू आहे. पोटच्या गोळ्याचा अचानक असा निरोप आल्याने व नंतर त्याचा मोबाईल बंद येत असल्याने त्याच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. माहिती नुसार, मोर्शीतील शुभम घनश्याम महल्ले (वय २०, मोर्शी) हा २१ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता बडनेरा येथील कॉलेजला जातो असे सांगून घराबाहेर पडला होता. सायंकाळी ६ वाजेपर्यंत तो घरी न परतल्याने आईने फोन केला. 'मी घरी येतो' असे त्याने सांगितले; मात्र त्यानंतर आई सह नातेवाईकांचे नंबर ब्लॉक केले आणि आईला म्हणाला मुंबईवरून फ्रान्सला जातोय २२ नोव्हेंबर रोजी शुभमने आईला फोन केला. 'तू कुठे आहेस', असे आईने विचारताच त्याने 'मी मुंबईत असून येथून आता फ्रान्सला पैसे कमविण्यासाठी जात आहे', असे उत्तर दिल्याचे त्याच्या आईने तक्रारीत म्हटले आहे. आई सोबत बोलणं झाल्यानंतर त्याने कॉल कट केला आणि मोबाईल स्विच ऑफ केला. सर्वत्र शोध घेऊन ही तो न सापडल्याने २३ नोव्हेंबर रोजी कुटुंबीयांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. मोर्शी पोलिसांनी याप्रकरणी ☞(पान २ वर)

अवैध रेती तस्करीप्रकरणी दोघांना अटक

ट्रॅक्टर-ट्रॉली, जेसीबी आणि चार ब्रास रेतीसह २५.४० लाखांचा मुद्देमाल जप्त

अमरावती/प्रतिनिधीः-

शहरात अवैध रेती उत्खनन आणि वाहतुकीविरोधात गुन्हे शाखेने कारवाई करीत दोघांना अटक केली. गोपाल नगर परिसरात रेतीची अवैधरीत्या वाहतूक करण्याच्या तयारीत असताना पोलिसांनी ही कारवाई केली. यावेळी ट्रॅक्टर-ट्रॉली, एक्स्कॅव्हेटर मशीन (जेसीबी) आणि चार ब्रास रेती असा एकूण २५ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. २३ नोव्हेंबर रोजी गोपाल नगर येथील एका शाळेसमोर ही कारवाई करण्यात आली. सैयद इमरान सैयद अकील (वय ३०, रा. रिंग रोड, नवसारी, अमरावती) आणि शमशाद अली सल्लाउद्दीन अंसारी (वय २२, रा. नूर नगर, धर्मकाटा, अमरावती) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली होती की, गोपाल नगर परिसरात अवैधरीत्या रेतीचा उपसा करून तिची तस्करी ☞(पान २ वर)

अदानींच्या प्रकल्पासाठी मेळघाटला वेठीस धरू नका

जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांचा आंदोलनाचा इशारा

अमरावती/प्रतिनिधीः-

मेळघाटच्या समृद्ध वनसंपदेच्या मुळावर उठणारा अदानी समूहाचा प्रस्तावित आडनदी जलविद्युत प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही. विकासाच्या नावाखाली जंगल, वन्यजीव आणि आदिवासींच्या नैसर्गिक हक्कांचा बळी देऊन खासगी उद्योगसमूहाचे हित साधण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी केला आहे. या प्रकल्पाला विरोध दर्शविताना त्यांनी शासनाने प्रकल्पाबाबत भूमिका स्पष्ट न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.

चिखलदरा तालुक्यातील आडनदी परिसरात प्रस्तावित असलेला १,५०० मेगावॅट क्षमतेचा पंप स्टोरेज जलविद्युत प्रकल्प मेळघाटच्या पर्यावरणासाठी धोकादायक ठरू शकतो. आडनदी, भांडरी आणि जामली परिसरातील सुमारे २४०.६१ हेक्टर क्षेत्र या प्रकल्पासाठी प्रस्तावित असल्याची माहिती आहे. हा परिसर मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्राशी संबंधित असल्याने येथे होणारी वृक्षतोड, वन्यजीवांच्या संचारमार्गांवरील परिणाम आणि जैवविविधतेचे नुकसान गंभीर स्वरूपाचे असू शकते, अशी चिंता देशमुख यांनी व्यक्त केली.प्रदूषणकारी प्रकल्पच अमरावतीच्या वाट्याला का?



अमरावती जिल्ह्यात यापूर्वीच अदानी समूहाच्या सिमेंट प्रकल्पाचा मुद्दा चर्चेत आला आहे. आता मेळघाटच्या वनसंपदेवर परिणाम करणारा जलविद्युत प्रकल्प पुढे केला जात आहे. पश्चिम विदर्भाच्या वाट्याला प्रदूषण आणि पर्यावरणाचा ऱ्हास करणारे प्रकल्पच का दिले जातात, असा सवाल बबलू देशमुख यांनी उपस्थित केला. या भागात ऑटोमोबाईलसारखे रोजगारनिर्मिती करणारे उद्योग आणण्याऐवजी पर्यावरणाला बाधा पोहोचविणारे ☞(पान २ वर)

टेबलावर ठेवलेले मंगळसूत्र गायब

अमरावती/प्रतिनिधीः- बेडरूममधील टेबलावर काढून ठेवलेले सोन्याचे मिनी मंगळसूत्र अचानक गायब झाल्याची घटना जयभोले नगर परिसरात उघडकीस आली. या मंगळसूत्राची किंमत ४६ हजार ६४० रुपये असून, ते कोणीतरी अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याप्रकरणी विद्या प्रकाशराव भुकुसे (वय ५२, रा. जयभोले नगर, गडगडेश्वर मंदिराजवळ, अमरावती) यांच्या तक्रारीवरून खोलापुरी गेट पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भुकुसे या आपल्या मुलीसह जयभोले नगर परिसरात राहतात. त्यांनी सोन्याचे १४ ग्रॅम ५८० मिलीग्रॅम वजनाचे मिनी मंगळसूत्र बेडरूममधील टेबलावर काढून ठेवले होते. मात्र, कामाच्या गडबडीत त्या मंगळसूत्राकडे त्यांचे लक्ष राहिले नाही. काही वेळानंतर मंगळसूत्राची आठवण ☞(पान २ वर)

पाहिजेत
रात्रपाळीत पार्ट टाईम मशीनवर कामासाठी होतकरु मुले पाहिजे.
संपर्क
९९७५३१३५९६

ओडिशातून गांजाची खेप घेऊन येणारा आरोपी जेरबंद

गुन्हे शाखा युनिट-२ ची कारवाई; १० किलो गांजा जप्त

अमरावती/प्रतिनिधीः-

ओडिशातून गांजाची खेप घेऊन अमरावतीकडे येणाऱ्या एका



आरोपीला गुन्हे शाखा युनिट-२ च्या पथकाने मंगळवारी दुपारी सापळा रचून अटक केली. अब्दुल समीर सज्जाद हुसैन (वय ३०, रा. यास्मीन नगर, अमरावती) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून १० किलो गांजा जप्त करण्यात आला असून, त्याची ☞(पान २ वर)

नांदेड येथील युवकांच्या उपोषणाला यश

उपोषणाकर्त्यांच्या मागणीची प्रशासनाकडून दखल

खल्लार/प्रतिनिधीः-

नजिकच्या नांदेड बु.येथील ग्रामपंचायत अधिकारी सोनाली बूथ यांनी केलेल्या गैरप्रकाराबाबत तातडीची कारवाई करण्यासाठी गावातील चार युवकांनी काल (दि.२३) पासून ग्रामपंचायत समोर आमरण उपोषण सुरु केले होते. युवकांनी पुकारलेल्या उपोषण आंदोलनाला अखेर यश आले आहे. या आंदोलनाची प्रशासनाने अखेर दखल घेत महत्त्वपूर्ण कारवाई केली आहे.

ग्रामपंचायतीतील पाणी शुद्धीकरण यंत्र खरेदी करूनही ते प्रत्यक्ष बसविण्यात न आल्याचा



तसेच कचरा संकलन वाहन खरेदीसंदर्भातील अनियमितेचा चौकशी अहवालात उल्लेख करण्यात आला होता. या प्रकरणात जिल्हा परिषदेच्या मुख्य ☞(पान २ वर)

